अनुक्रम ... ३४४४४ वि: भू प्रवास
क्रमांक ... २२० नों दि:



# भारत दर्शन

• ३ •

दा. क्र. १२८

काका कालेलकर

REFBK-0012988

मूल्य : दीड रुपया



कुमार साहित्य माला

श्री : ३१६ [ १२–६२ ]
© १९६२
काका कालेलकर

●

कुमार साहित्य माला : ५३

●

आवृत्ति पहिली
शके १८८४
सन १९६२

●

मूल्य : रु. १–५०



प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्राय. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

●

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ,
पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 38444 वि:
क्रमांक 320 नों. दि.

# भा र त - द र्श न

## तिसरा खंड

## म ध्य व उ त्त र भा र त

१. उभयान्वयी नर्मदा
२. निशीथयात्रा
३. गंगामाई
४. यमुनाराणी
५. जीवनतीर्थ हरद्वार
६. नागीण नदी तीस्ता
७. देलवाड्याची धार्मिक कला
८. कामाक्षीच्या राज्यांत
९. अवन्तीची क्षिप्रा
१०. प्रयागराज
११. अमरपुरी वाराणसी
१२. गयेचें श्राद्ध
१३. बुद्धगया
१४. निर्वाणधाम कुशीनारा

---

टीप : पृष्ठें १–४ आणि पुढें पृष्ठ ९ ऐवजीं ५ पासून.

'भारतदर्शन' वाचल्यावर त्यासारखीं आणखी प्रवासवर्णनें
आहेत का, याची चौकशी तुम्ही करणारच – त्यासाठीं हीं कांहीं :

● **को न टि की**
तराफ्यावरून ३६०० मैलांची साहसी सागरी सफर
अनु. श्रीकान्तराय : रु. २–००

● **प्रवाळाच्या बेटांवर**
बोट फुटली नि मुलें निर्जन बेटाला लागलीं – मग घडली ती कादंबरी
रूपां. सुशील परभृत : रु. २–००

● **काल-प्रवासी**
एक विलक्षण प्रवास
अनु. प्रकाश रंजन : रु. १–२५

● **व न वि हा र**
वनांतील रोमांचकारी अनुभव
वि. वा. जोशी रु. १–५०

● **हि म वि श्व**
ध्रुवप्रदेशांतील साहसी प्रवास कादंबरी
अनु. श्रीकृष्ण हवालदार : रु. १–५०

● **द र्या ला ल**
आफ्रिकेच्या जंगलांतील रोमांचकारी वर्णन
अनु. निर्मला प्रधान : रु. २–००

● **देशासाठीं दर्यापार**
इंग्लंडच्या जेम्स कुकची सत्यकथा
द. के. बर्वे : ५० न. पै.

● **प्रणावरचा प्रवास**
घोड्यावरून १०००० मैल – शिफलेची सत्यकथा
द. वि. जोग : ५० न. पै.

● **प्रवासी पंडित**
ह्युएनत्संगचा साहसी चीन-भारत प्रवास
रा. चिं. ढेरे : ५० न. पै.

● **उदंड देशाटण करावें**
स्फूर्तिदायक रंजक पुस्तक
सुधाकर प्रभु : ५० न. पै.

---

**वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड**
**३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २**

# उभयान्वयी नर्मदा

आपला देश महादेवाची मूर्ति आहे. हिंदुस्थानचा नकाशा जर उलटा धरला तर त्याचा आकार शिवलिंगासारखा दिसतो. उत्तरेकडील हिमालय ही या शिवलिंगाची बैठक आणि दक्षिणेकडील कन्याकुमारीचा भाग हें त्याचें शिखर.

गुजराथचा नकाशा जरा फिरविला आणि पूर्वेकडील भाग खालीं घेतला व सौराष्ट्राचें टोंक – ओखामंडळ वरच्या बाजूस आणलें तर तो देखील शिवलिंगासारखाच दिसेल. आपल्याकडे जितकीं म्हणून पर्वतांचीं शिखरें आहेत तितकीं सर्व शिवलिंगेंच आहेत. कैलासाच्या शिखराचा आकार सुद्धां शिवलिंगासारखाच आहे.

आणि या पर्वतांच्या जंगलांतून जेव्हां एखादी नदी निघते तेव्हां कवि म्हणायचे की, ‘ शिवजीच्या जटेमधून गंगा निघाली. ’ कित्येक लोक पहाडांतून पुढें पुढें सरत येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाला अप्-सरा म्हणतात. कित्येक तर पर्वताच्या अशा सर्व कन्यकांना पार्वती म्हणतात.

अशाच एका अप्सरेसारख्या नदीविषयीं आज लिहावयाचें आहे. महादेवाच्या डोंगराजवळ माइकाल पर्वताच्या पायथ्याशीं अमरकंटक म्हणून एक तलाव आहे. त्यांतून नर्मदा नदी उगम पावते. जी नदी उत्तम गवताची पैदास करून गाईंची संख्या वाढविते तिला गो-दा म्हणतात. यश देणारी ती यशो-दा आणि जी नदी आपल्या प्रवाहाच्या आणि कांठावरील नैसर्गिक शोभेच्या द्वारां ‘नर्म’ म्हणजे आनंद देते ती नर्म-दा होय. या नदीच्या कांठाकांठानें भटकत

असतां ज्याला अतिशय आनंद झाला अशा एखाद्या ऋषीनें या नदीला हें नांव बहाल केलें.

ज्याप्रमाणें हिमालय पर्वतानें तिबेट व चीन यांच्यापासून हिंदुस्थानला वेगळें केलें आहे त्याचप्रमाणें आपल्या या नर्मदा नदीनें उत्तर भारत अथवा हिंदुस्थान आणि दक्षिण भारत अथवा दख्खन यांच्यामध्यें आठशें मैलांची एक चमकती नाचती धांवती जितीजागती रेषा काढली आहे. आणि ही नैसर्गिक रेषा कुणी पुसून टाकूं नये म्हणूनच कीं काय ईश्वरानें या नदीच्या उत्तरेस विंध्य व दक्षिणेस सातपुडा यांच्यासारखे लांबच लांब पर्वत उभे केले आहेत. अशा उमद्या भावांच्या संरक्षणाखालीं नर्मदा धांवत आणि उड्या मारीत अनेक प्रांतांमधून प्रसरण पावत भृगुकच्छ अथवा भरुचजवळ समुद्राला जाऊन मिळते.

अमरकंटकजवळील नर्मदेचा उगम समुद्रसपाटीपासून पांच हजार फूट उंचीवर आहे. आतां आठशें मैलांच्या आंत पांच हजार फूट खालीं उतरणें कांहीं सोपें तर नाहींच. म्हणून आपली नर्मदा ठिकठिकाणीं लहानमोठ्या उड्या घेते. त्यावरून आपल्या कविपूर्वजांनीं नर्मदेला दुसरें नांव दिलें आहे 'रेवा'. ( 'रेव' म्हणजे उडी मारणें. )

जी नदी पावलोपावलीं वरून खालीं उड्या टाकीत असते ती नौकानयना-साठीं अर्थात् नौकांत बसून दूर-दूरचा प्रवास करण्यासाठीं तितकीशी उपयोगी नसते. समुद्रांतून येणारें जहाज नर्मदा नदींत फार तर तीस-पस्तीस मैल आंत शिरूं शकतें; पावसाळ्याच्या अखेरीस फार तर पन्नास मैल.

ज्या नदीच्या उत्तरेस आणि दक्षिणेस दोन पर्वत खडे आहेत, त्या नदीचें पाणी कालवे खोदून दूरवर कसें नेतां येणार? म्हणून नर्मदा नदी जशी नौका-नयनासाठीं फारशी उपयोगी नाहीं तशीच शेतांच्या शिंपणीसाठीं देखील विशेष उपयोगी नाहीं. असें असलें तरी या नदीची अन्य प्रकारें सेवा कमी नाहीं. तिच्या पाण्यांत विचरणारे मगर आणि मासे, तिच्या किनाऱ्यावर संचरणारे शेतकरी आणि चरणारीं गुरेंढोरें व इतर तऱ्हेतऱ्हेचीं जनावरें आणि आकाशांत कलरव करणारे पक्षी या सर्वांची ती माता आहे.

भारतवासियांनीं आपला सगळा भक्तिभाव जरी गंगेच्या चरणीं ओतला असला, तरी आपल्या लोकांनीं नर्मदेच्या तीरीं पावलोपावलीं जितकीं देवालयें बांधलीं आहेत जितकीं दुसऱ्या कोणत्याहि नदीच्या तीरीं बांधलीं नसतील.

गंगा, यमुना, गोदावरी, कावेरी, गोमती, सरस्वती वगैरे नद्यांच्या स्नान-पानाचें आणि त्यांच्या कांठावर केलेल्या दानाचें माहात्म्य पुराणकारांनीं कितीहि वर्णिलें असो, पण त्यांची प्रदक्षिणा करण्याचा विचार एकाहि भक्ताच्या मनाला शिवलेला नाहीं. उलट नर्मदेच्या भक्तांनीं, कवींना सुचावेत असे नियम करून साऱ्या नर्मदेची परिक्रमा अथवा 'परिकम्मा' करण्याचा परिपाठ घालून दिला आहे.

नर्मदा नदीच्या उगमापासून दक्षिण किनाऱ्यावरून चालत चालत सागर-संगमापर्यंत जायचें. तेथें होडींत बसून उत्तर किनाऱ्यावर पोहोंचायचें आणि त्या किनाऱ्यावरून पुन्हां पायीं चालत चालत अमरकंटकपर्यंत जायचें म्हणजे एक परिक्रमा पुरी झाली. यांत नियम असा आहे कीं, परिकम्मा करीत असतांना नदीचा प्रवाह कुठेंहि ओलांडायचा नाहीं आणि तरी प्रवाहापासून फार दूरहि जायचें नाहीं. रोज नदीचें दर्शन झालेंच पाहिजे. पाणी प्यायचें तें नर्मदेचेंच. बरोबर पैसाअडका घेऊन, ऐषारामांत प्रवास करायचा नाहीं. नर्मदेच्या तीरीं जंगलांत रहाणाऱ्या आदिवासींच्या मनांत यात्रेकरूंच्या धन-दौलतीबद्दल विशेष आकर्षण असतें. गरजेपेक्षां अधिक कपडे, भांडींकुंडीं किंवा पैसाअडका असला तर त्या ओझ्यांतून ते तुम्हांला मुक्त केल्यावांचून रहाणार नाहींत.

आपल्या लोकांना अशा अकिंचन व उपाशी बांधवांवर पोलिसांकरवीं उपाययोजना करण्याचा विचार कधींकाळीं शिवला नाहीं. आणि आदिवासी बांधव देखील मानून चालतात कीं, यात्रेकरूंवर हा आपला हक्कच आहे. जंगलांत नागवलेले यात्रेकरू जंगलांतून बाहेर आले कीं, दानी लोक त्यांना नवे कपडे आणि शिधासामग्री देतात.

भाविक लोक सगळ्या नियमांचें पालन करून विशेषतः ब्रह्मचर्याचें आग्रहपूर्वक आचरण करून नर्मदेची परिक्रमा, हळूहळू करीत तीन वर्षांनी पुरी करतात. पावसाळ्याचे दोन-तीन महिने एके ठिकाणीं रहाण्याचा आणि साधु-संतांच्या सत्संगानें जीवनाचें रहस्य समजून घेण्याचा त्यांचा आग्रह असतो.

अशा परिक्रमेचे दोन प्रकार असतात. त्यांतील अवघड प्रकारच्या परि-क्रमेंत समुद्राजवळ देखील नर्मदा ओलांडायची नसते. उगमापासून मुखापर्यंत गेल्यानंतर त्याच रस्त्यानें परत उगमाकडे येऊन उत्तर किनाऱ्यानें समुद्रापर्यंत

पोहोंचायचें आणि पुन्हां त्याच उत्तर किनाऱ्यानें उगमापर्यंत परत यायचें. ही परिक्रमा अशा रीतीनें दुहेरी होते. तिचें नांव आहे जलेरी.

मौजमजा किंवा ऐषाराम सोडून तपस्यापूर्वक एकाच नदीचें ध्यान करायचें, तिच्या तीरावरील देवालयांचें दर्शन घ्यायचें, आसपास रहाणाऱ्या संत-महात्म्यांच्या वचनाचें श्रवण करायचें, आणि निसर्गाची शोभा व भव्यता यांचें सेवन करीत आयुष्याचीं तीन वर्षें व्यतीत करायचीं ही कांहीं साधीसुधी प्रवृत्ति नव्हे. त्यांत कणखरपणा आहे, तपस्या आहे, बहादुरी आहे. अंतर्मुख होऊन करावयाचें आत्मचिंतन, गरिबांशीं एकरूप होण्याची भावना आहे; निसर्गमय होऊन जाण्याची दीक्षा आहे आणि निसर्गाच्या द्वारां निसर्गांत विराजत असलेल्या भगवंताचें दर्शन घेण्याची साधना आहे.

आणि या नदीकिनाऱ्यावरील समृद्धि सामान्य कोटींतली नाहीं. युगानुयुगें उच्च कोटीचे संतमहंत, वेदान्ती संन्यासी आणि भगवंताच्या लीला बघून सद्गदित होणारे भक्त, आपआपला इतिहास या नदीच्या कांठीं पेरीत आले आहेत. आपल्या कुळाचा बाणा टिकवणाऱ्या आणि प्रजेच्या रक्षणासाठीं प्राण पणास लावणाऱ्या क्षत्रिय वीरांनीं आपले पराक्रम याच ठिकाणीं अजमावले आहेत. अनेक राजांनीं आपल्या राजधानीच्या रक्षणार्थ नर्मदेच्या काठीं लहान-मोठे किल्ले बांधले आहेत आणि ईश्वराच्या उपासकांनीं धार्मिक कलेच्या समृद्धीचें जणुं संग्रहालय तयार करण्यासाठीं कीं काय मुक्कामामुक्कामावर मंदिरें उभारलीं आहेत. आणि प्रत्येक मंदिर आपल्या कलेद्वारां तुमचें चित्त हरण करून शेवटीं आपलें कळसाचें बोट उंचावून अनंत आकाशांत प्रकट होणाऱ्या मेघश्यामाचें ध्यान करण्याची प्रेरणा देत असतें.

ज्याप्रमाणें बांगेचा पुकार खुदापरस्तांना निमाजची आठवण करून देतो, त्याचप्रमाणें दूरवरून दृष्टीस पडणारीं शिखररूपी चमकतीं बोटें स्तोत्रें गाण्याची प्रेरणा देतात.

आणि नर्मदेच्या कांठीं शिवाचें किंवा विष्णूचें, रामचंद्राचें किंवा कृष्णचंद्राचें, जगत्पतीचें किंवा जगदंबेचें स्तोत्र म्हणायचें असेल तर आधीं नर्मदाष्टकानें प्रारंभ करायचा असतो: **सबिंदुसिंधु सुस्खलत् तरंगभंगरंजितम्।** अशा थाटांत पंचचामरांचीं लघुगुरु अक्षरें जेव्हां नर्मदेच्या प्रवाहाचें अनुकरण करूं लागतात तेव्हां भक्त मस्तींत येऊन म्हणतात कीं, 'माते! तुझ्या पवित्र

जलाचें दर्शन झालें रे झालें कीं, या संसाराच्या सगळ्या बाधा दूर झाल्याच म्हणून समजावें : गतं तदैव मे भयं त्वदम्बु वीक्षितं यदा। आणि शेवटीं भक्तिलीन होऊन ते नमस्कार करतात : त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे।

आपण विसरतां कामा नये कीं, नर्मदा ही जशी आपली आणि आपल्या प्राचीन संस्कृतीची माता आहे तशीच ती आपले बंधु बांधव जे आदिवासी लोक यांचीहि माता आहे. नर्मदेच्या दोन्ही तटांवर या लोकांनीं हजारो वर्षें राज्य केलें होतें, कित्येक किल्लेहि बांधले होते आणि आपली एक विशाल आरण्यक संस्कृति विकसित केली होती.

मला नेहमीं वाटत आलें आहे कीं, हिंदुस्थानचा इतिहास प्रांतवार किंवा राज्यवार लिहिण्याऐवजीं जर नदीवार लिहिला गेला असता, तर त्यांत लोक-जीवन निसर्गाशीं विणलें गेलें असतें आणि प्रत्येक प्रदेशाची पुरुषार्थपूर्ण भरभराट नदीच्या उगमापासून — मुखापासून पसरलेली आढळून येती. जसे आपण सिंधूच्या कांठावरील घोड्यांना सैंधव म्हणतों, भीमेच्या तटाचें पोषण मिळवून पुष्ट होणाऱ्या भीमथडीच्या तट्टांची वाखाणणी करतों, कृष्णेच्या खोऱ्यांतील गाई-बैलांचें विशेष कौतुक करतों, त्याचप्रमाणें प्राचीन काळीं प्रत्येक नदीच्या कांठावर विकास पावलेली संस्कृति वेगवेगळ्या नांवांनीं ओळखली जात असे.

त्यांतून नर्मदा नदी ही भारतीय संस्कृतीच्या दोन मुख्य विभागांची सीमारेषा गणली जाई. रेवेच्या उत्तरेस पंचगौडांची विचारप्रधान संस्कृति आणि रेवेच्या दक्षिणेस द्रविडांची आचारप्रधान संस्कृति मुख्य मानली जाई. विक्रम संवताची कालगणना आणि शालिवाहन शकाची कालगणना या दोन्ही नर्मदेच्या तीरीं ऐकू येतात आणि बदलतात.

उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्यामध्यें एक रेषा काढण्याचें काम नर्मदा करते असें मीं म्हटलें खरें. पण तिच्याशीं स्पर्धा करणारी एक दुसरी नदी देखील आहे. नर्मदेनें मध्य हिंदुस्थानापासून पश्चिम किनाऱ्यापर्यंत सरळ रेषा काढली, हें जणुं काय बरोबर झालें नाहीं असें मानून गोदावरीनें पश्चिमे-कडील सह्याद्रि पर्वतापासून प्रारंभ करून पूर्वसमुद्रापर्यंत एक तिरकस रेषा काढली आहे. म्हणून उत्तरेकडील ब्राह्मण संकल्प बोलतांना म्हणतात — "रेवायाः उत्तरे तीरे." तर पैठणच्या राज्याचे अभिमानी आम्ही दक्षिणी लोक

" गोदावर्याः दक्षिणे तीरे " असें म्हणतों. ज्या नदीच्या तीरावर शालिवाहन अथवा शातवाहन राजांनीं मातीचीं माणसें बनवून त्या फौजेद्वारां यवनांचा पराभव केला, त्या गोदावरीला संकल्पांत स्थान न मिळून कसें चालेल ?

नर्मदा नदीची परिकम्मा कांहीं मीं केलेली नाहीं. अमरकंटकला जाऊन उगमाचें दर्शन घेण्याचा संकल्प फार जुना आहे. गेल्या वर्षी विंध्यप्रदेशाची राजधानी रीवापर्यंत गेलों सुद्धां होतों. पण अमरकंटकला जाणें जमलें नाहीं. तसें नर्मदेचें दर्शन मीं ठिकठिकाणीं घेतलें आहे; त्यांतील विशेष काव्य जर कुठें अनुभवलें असेल तर तें जबलपूरजवळील भेडाघाटामध्यें.

भेडाघाटांत होडींत बसून संगमरवरी पिवळ्यानिळ्या पाषाणांमधून जेव्हां आपण जलविहार करतों तेव्हां जसें काय योगविद्येंत प्रवेश करून मानवी मनाचीं गूढ रहस्यें आपण उकलीत आहोंत असेंच वाटतें. आणि त्यांतहि जेव्हां बंदरकूदपाशीं येऊन ठेपतों आणि पूर्वींचे सरदार घोड्याला टांच मारून एका उडींत पलिकडे पोहोंचत असल्याच्या गोष्टी ऐकतों तेव्हां तर जणुं काय मध्यकालीन इतिहास पुन्हां एकदां जिवंत होतो.

या गूढ स्थानाचें हें माहात्म्य ओळखूनच योगविद्येच्या कुणी उपासकानें जवळच्या टेकडीवर चौसष्ट योगिनींचें मंदिर बांधलें असेल आणि त्या योगिनींच्या चक्रामधोमध नंदीवर विराजणाऱ्या शिवपार्वतींची स्थापना केली असेल. त्या मूर्ति पाहून मूर्तिकलेपुढें मस्तक नम्र होतें आणि अशा मूर्ति ज्यांनीं खंडित केल्या त्यांच्या धर्मांधतेबद्दल मनांत खेद उत्पन्न होतो. पण खंडित मूर्ति पहाण्याचा तर आपल्याला कधींचा सराव पडून गेला आहे ! ! !

धुंवाधार प्रकृतीचें एक स्वतंत्र काव्य आहे. पाण्याला जर जीवन म्हटलें तर अधःपातामुळें खंड खंड झाल्यानंतर देखील जें सहज पूर्वरूप धारण करतें आणि जसें कांहींच झालें नाहीं अशा आविर्भावानें शांतपणें पुढें वाहूं लागतें तें खरोखर जीवनतम होय. पावसाळ्यांत जेव्हां सारा प्रदेश जलमय होऊन जातो तेव्हां नाहीं मिळत 'धार' कीं नाहीं निघत त्यांतून वाफेसारखा 'धुंवा.' पावसाळा संपल्यानंतरच धुंवाधारची मस्ती पाहून घ्यावी. धबधब्याकडे टक लावून ध्यान करणें मला पसंत नाहीं, कारण धबधबा ही कैफी वस्तु आहे. धबधब्याच्या पाण्याचें जेव्हां पुढें धोबीघाटावरील साबणाच्या पाण्यांत परिवर्तन होऊं लागतें आणि आसपास थंड वाफेचे लोटच्या लोट खेळ खेळूं लागतात तेव्हां जसजसें

पहावें तसतशा चित्तवृत्ति अस्वस्थ होऊं लागतात. तें दृश्य डोळे भरून पाहून घेऊन परत फिरतांना असेंच वाटतें कीं, जीवनाच्या एखाद्या आणीबाणीच्या प्रसंगांतून आपण बाहेर पडलों आहोंत आणि इतक्या अनुभवानंतर आपण पूर्वींचे तेच उरलों नाहीं.

इटारसी-होशंगाबादकडील नर्मदा अगदीं वेगळीच आहे. तिकडील दगड जमिनींत तिरकस तिरकस रुतलेले आढळतात. कोणत्या धरणीकंपामुळें दगडांचे थर असे विषम झाले हें कुणी सांगू शकत नाहीं. नर्मदेच्या तटीं ईश्वराची आकृति धारण करून बसलेले पाषाण सुद्धां कांहीं सांगू शकत नाहींत.

आणि तीच नर्मदा पगडीच्या पन्ह्याप्रमाणें निरुंद पण लांबलचक पसरलेल्या भरुचच्या किनाऱ्याला धुऊन काढते आणि अंकलेश्वरच्या खलाश्यांना अंगाखांद्यावर खेळवते, त्या वेळीं अगदीं वेगळीच दिसूं लागते.

कबीरवडापाशीं आपल्या कुशींत एका बेटाचें संगोपन करण्याचें स्वर्गीय सुख जिला एकदां लाभलें, तिनें सागर-संगमाच्या वेळीं सुद्धां अशाच एका बेटबालकाचें संगोपन आणि जोपासना करावी यांत नवल तें कसलें!

कबीरवड हें हिंदुस्थानांतील अनेक आश्चर्यांपैकीं एक आश्चर्य आहे. लक्षावधि लोक ज्याच्या छायेंत निवान्त बसूं शकतील आणि मोठमोठ्या फौजा ज्याच्या छायेंत तळ ठोकूं शकतील, असा एक वड नर्मदाप्रवाहाच्या मधोमध एका बेटांत पुराणपुरुषाप्रमाणेंच अनंतकाळाची प्रतीक्षा करीत आहे. महापूर आला कीं त्यांत बेटाचा एक भाग वाहून जातो. त्याबरोबरच वडाच्या अनेक फांद्या आणि पारंब्याहि वाहून जातात. कबीरवडाचे कितीदां तुकडे झाले याची नोंद इतिहासांत नाहीं. नदीचा प्रवाह वहात आहे आणि वडाला नवीनवी पालवी फुटतच आहे! सनातनकाल हा जसा वृद्ध आहे तसाच शिशुहि आहे. तो त्रिकालज्ञानी आहे तसाच विस्मरणशीलहि आहे.

त्या काल-भगवानाचें आणि कालातीत परमात्म्याचें अखंड ध्यान करणारे ऋषिमुनि आणि संतमहात्मे जिच्या कांठीं युगायुगानें वास करीत आले आहेत, ती आर्य-अनार्य या सर्वांची माता नर्मदा तिन्ही त्रिकाळ मानवमात्राचें कल्याण करो. जय नर्मदे हर!

# निशीथ-यात्रा

२

जबलपूरजवळील भेडाघाटपाशीं वाहणाऱ्या नर्मदेच्या प्रवाहाचें रक्षण करणारे संगमरवरी पहाड आम्ही रात्रीचे पाहून येऊं अशी कल्पना मध्यरात्रींच्या स्वप्नांत देखील आली नसती. परंतु ' सबिन्दु-सिन्धु सुस्खलत् तरंग-भंग-रंजितम् ', असें जिचें वर्णन एके काळीं संध्यावंदनाबरोबर आम्ही गात असूं, त्या शर्मदा नर्मदेचें दर्शन घेण्यासाठीं भेडाघाट हें एक सुंदर काव्यमय स्थान असलें पाहिजे असा एक अस्पष्ट विचार मात्र मनाच्या कोठारांत कुठें तरी सांठवलेला होता.

हिमालयाच्या यात्रेला जातांना रस्त्यांत मी जबलपूरला उतरलों होतों. पण त्या वेळीं भेडाघाटच्या नर्मदेचें स्मरण सुद्धां झालें नव्हतें. गंगोत्री आणि तिच्या वाटेवर येणारें श्रीनगर यांच्या चिंतनांत गढून गेलेल्याला नर्मदेचें स्मरण व्हावें तरी कसें ! नर्मदाकांठींच्या गहनतेच्या महादेवाला सोडून, मी गंगोत्रीच्या यात्रेला निघालों होतों.

फैजपूर कॉंग्रेसच्या वेळीं फक्त अजिंठ्याला जाण्याचें आम्हीं नक्की केलें होतें. पण रेल्वे कंपनीनें झोन-तिकिटें काढून आमच्यांत आडवळणें घेऊन देखील अधिक प्रवास करण्याची वृत्ति जागी केली. जबलपूरची यात्रा जर फुकट होत असेल, तर जायला हरकत काय ? — असा विचार करून आम्ही निघालों. आम्ही कसल्याहि खास कामानिमित्त जबलपूरला जात नव्हतों हें खरें; पण केवळ एक दिवस मौज करावी अशी देखील आमची वृत्ति नव्हती.

देशांतील भिन्न भिन्न धार्मिक स्थानें, ऐतिहासिक स्थळें, कलामंदिरें आणि निसर्गरमणीय दृश्यें पहाणें याला मीं निव्वळ नयन-तृप्ति कधींच मानलें नाहीं. मंदिरांत देवदर्शनाला जावें त्याचप्रमाणें भूमिमातेच्या विविध विभूतींचें दर्शन घेण्यासाठीं मी आलों आहें अशा भावनेनेंच मी आतांपर्यंतच्या माझ्या सगळ्या यात्रा करीत आलों आहें. माझ्या देशाची खडान् खडा माहिती मला

असली पाहिजे आणि त्या माहितीबरोबरच भक्तीचाहि विकास होत गेला पाहिजे अशी माझी अपेक्षा असते.

जसजसा मी प्रवास करतों आणि हृदय अभिमानानें आणि प्रेमानें भरून जावें अशीं दृश्यें पहातों, तसतशी एक गोष्ट मला सारखी अस्वस्थ करीत रहाते – इतका सुंदर आणि भव्य हा माझा देश परतंत्र आहे आणि त्याला मी जबाबदार आहें. पारतंत्र्याचें हें लांछन कपाळावर घेऊन मी या अद्भुत-रम्य देशाची भक्ति तरी कशी करूं अशी टोंचणी आंतून लागून रहाते. हा देश माझा आहे असें मी कोणत्या तोंडानें म्हणूं ? मी देशाचा आहें यांत शंकाच नाहीं. कारण या देशानें मला जन्म दिला आहे. तोच माझें पालनपोषण अखंड करीत असतो. तोच मला रहावयाला स्थान, खावयाला अन्न आणि विश्रांती-साठीं आसरा देत असतो. माझ्या मुलांबाळांना त्याच्याच आधारावर मी निश्चिंतपणें सोडूं शकतों. ज्या उज्ज्वल इतिहासामुळें मी जगांत वर मान करून वावरत असतों तो आर्यांचा प्राचीन इतिहास देखील याच देशानें मला दिला आहे. अशा रीतीनें माझें सर्वस्व मला देशाकडूनच लाभलें आहे. पण हा ' देश माझा आहे ' असें म्हणण्यासारखें या देशासाठीं मीं काय केलें आहे ? माझ्या जन्माबरोबरच मी या देशाचा झालों खरा, पण देश माझा आहे असें म्हणण्या-पूर्वी मला जन्मभर राबलें पाहिजे.

अशा प्रकारचे विचार-विवर्त मनांत उठून मी क्षणभर अस्वस्थ होतों, पण या अस्वस्थतेंतूनच धर्मनिष्ठा उत्पन्न होऊन बळकट बनते. या अस्वस्थते-मुळेंच स्वराज्यसंकल्प दृढ बनतो आणि देशासाठीं – देशांत असह्य कष्ट उपस-णाऱ्या गरिबांसाठीं – यत्किंचितहि कष्ट सहन करण्याची संधि मिळते तेव्हां उलट आपणच उपकृत झालों अशी भावना होते. आणि जसाजसा प्रवास करीत जातों तसतसा अंगांत नव्या शक्तीचा संचार झाल्यासारखें वाटूं लागतें. तरुणांना मी नेहमींच सांगत आलों आहें कीं, ' स्वदेशांत फिरून देशाचें आणि देशांतील लोकांचें दर्शन करण्याची एकहि संधि दवडूं नका. '

वरील प्रकारच्या उत्कट भावना जेव्हां हृदयांत उत्पन्न होतात, तेव्हां जवळ कुणी नसेल तर बरें असें वाटणें स्वाभाविक आहे. आपल्या नाजूक भावना लिहून काढून लोकांपुढें ठेवणें हें तितकेंसें कठीण काम नाहीं. पण त्या भावनांमुळें अस्वस्थ होऊन आपली जी विव्हळ आणि वेड्यासारखी अवस्था

होते ती कुणाच्या दृष्टीस पडणें आपल्याला सहन होत नाहीं. त्यामुळें जेव्हां जेव्हां मी भक्ति-यात्रेसाठीं निघतों तेव्हां तेव्हां आपण एकटेंच जावें आणि एकान्तांतच निसर्गाचा अनुनय करावा अशी इच्छा मनांत उद्भवल्यावांचून रहात नाहीं.

पण माझी जात पडली कावळ्याची; एकएकटें सेवन केलेलें मला कांहींच पचत नाहीं. त्यामुळें अनिच्छेनें कां होईना मी सगळ्यांना सांगून टाकतों कीं, 'माझ्याच्यानें आतां रहावत नाहीं. मी हा निघालोंच.' आणि परिणामीं कुणी ना कुणी तरी सोबत येतेंच. लोकांना वाटतें कीं, सोबत गेल्यानें आपल्या चर्म-चक्षूंना याच्या प्रेमचक्षूंची जोड मिळेल आणि आपला देश आपण चार डोळ्यांनीं यथेच्छ पाहून घेऊं शकूं. हीच स्थिति मीं माझ्या मित्राला एका वाक्यांत सांगितली होती कीं, 'मी शोधतों एकान्त पण साधतों लोकान्त.'

शेवटीं या सगळ्याचा परिणाम असा होतों कीं, मला समुदायाबरोबर प्रवास करावा लागतो. आणि त्यामुळें माझ्या उसळत्या भावना मला दाबून टाकाव्या लागतात. एका बाजूला मन अंतर्मुख होऊन चिंतनांत बुडून गेलें असतांहि दुसऱ्या बाजूला बाहेरच्या मंडळींच्या वातावरणाला अनुकूल व्हावें लागतें !

प्रवासांत काय किंवा वाटेल तितकें महत्त्वाचें काम करतांना काय मंगलाचरणांत जर एखादेंहि विघ्न आडवें आलें नाहीं तर मला अगदीं चुकल्या-चुकल्यासारखें होतें. निर्विघ्न प्रवृत्ति माझ्या स्वप्नसृष्टींतहि मीं पाहिली नाहीं, तर मग जागृतींत तर ती संभवेलच कोठून? मोठ्या उत्साहानें आम्ही भुसावळहून निघालों आणि इटारसीमधेंच पहिली ठेंच लागली. अगाऊ कळविलें असूनहि इटारसीचे स्टेशनमास्तर आमच्यासाठीं कांहींच व्यवस्था करूं शकले नव्हते. नवा डबा जोडावा तर तो खेंचण्याची शक्ति इंजिनमध्यें नव्हती, कारण इटारसीआधींच गाडीला अधिकांत अधिक डबे जोडण्यांत आले होते. आणि सगळ्या डब्यांत माणसें खचून भरलीं होतीं.

आतां येथूनच परतावें कीं काय? केवढी ही निराशा! एकदां विचार आला कीं मन आवरावें आणि डोळे पुसण्यासाठीं येथून होशंगाबादपर्यंत मोटारनें जाऊन नर्मदामातेचें दर्शन घ्यावें अन् फैजपूरला पोहोंचावें; पण इतका

धीर सोडण्याचाहि धीर न झाल्यामुळें शेवटीं आम्ही आलेल्या गाडींतच कसे-बसे घुसलों.

जबलपूरला जाऊन तेथल्या एका-दोघां स्थानिक सद्‌गृहस्थांच्या मदतीनें आम्ही जवळच्या एका धर्मशाळेंत जाऊन पोहोंचलों आणि मोटार मिळविण्याच्या खटपटीस लागलों.

एखादी मोठी टोळी बरोबर घेऊन प्रवास करण्यासाठीं जी व्यवस्था-शक्ति लागते तीच युद्धांत मोठमोठ्या सैन्यांच्या हालचाली करण्यासाठीं आवश्यक असते. एखादा आश्रम, एखादी संस्था, एखादें मंदिर किंवा लहान-मोठीं संस्थानें यांचा कारभार चालवितांना ज्या गुणांचा आणि शक्तींचा विकास होतो, तेच एखादें राज्य अथवा साम्राज्य चालविण्याच्या कामीं उपयोगी पडतात. एखादा हुशार, कसलेला शेतकरी संधि मिळतांच उत्तम कारभारी होऊं शकतो, आणि जबरदस्त कारखाने चालविणारा कल्पक व योजक कारखानदार एखाद्या साम्राज्याचीं सूत्रें अनायासें सांभाळूं शकतो. प्रवासांत माणसाच्या नानाविध कौशल्याची कसोटी होते आणि त्यांत योग्यता पावलेले पुरुष — आणि स्त्रिया देखील — अशा प्रकारें आपोआप पुढें येतात.

हा विचार येथें कसा सुचला हें समजावून सांगण्यासाठीं आतां थांबत नाहीं. आपल्याला वेळेवर भेडाघाटला पोहोंचावयाचें आहे आणि पाऊस तर अगदीं 'हा आलों' म्हणून भरून आला आहे. तसें पाहिलें तर हे कांहीं पावसाळ्याचे दिवस नाहींत. पण हिंदुस्थानच्या चारहि कोपऱ्यांतून लोक फैजपूरच्या महासभेंत चाललेले पाहून पावसाला वाटलें कीं, 'चला, आपणहि वेगवेगळीं स्थानें पहात फैजपूरला जाऊन यावें.' पण हिंवाळ्याच्या दिवसांत पावसाच्या पायांत जोर नसतो. त्यामुळें धांवतां धांवतां तो रस्त्यावर कोसळून पडला आणि फैजपूरपर्यंत पोहोंचूंच शकला नाहीं. त्याच्या हातीं स्वराज्याची ज्योत असती तर कदाचित् लोकांनीं उठून पुढें धांवण्यासाठीं त्याला मदत केली असती.

असो. आमच्या दोन्ही मोटारी तैल-वेगानें निघाल्या आणि संध्याकाळच्या वेळीं आम्ही भेडाघाटला पोहोंचलों. संगमरवराचे खडक पहाण्यासाठीं अशा वेळीं या आधीं कुणी आलें नसेल! पण निसर्ग-वेड्या माणसाचा मुळीं वेळेशीं संबंधच काय?

येथें येऊन आम्ही मोठ्या दुग्ध्यांत पडलों. जवळच एका टेकडीवर महादेवाच्या मंदिराला वेढून चौऱ्यांशीं योगिनी तप करीत बसल्या होत्या. तप करतां करतां अहल्येप्रमाणें त्या शिलारूप झाल्या असतील. रामाच्या चरणाचा स्पर्श होण्याएवजीं मुसलमानांच्या दंडुक्यांचा स्पर्श झाल्यामुळें त्यांतील बऱ्याचशा योगिनींची चांगलीच दुर्दशा झालेली आहे. या टेकड्यांच्या पल्याड धुंवाधार या नांवानें ओळखला जाणारा एक प्रसिद्ध धबधबा आहे. तो पहावयाला जावें कीं संगमरवरी खडक पहाण्यासाठीं नौकाविहार करावा ?

विहार करण्यासाठीं होड्या फक्त दोनच होत्या, त्यामुळें आम्हीं सर्वांनीं एका गोष्टीवर सहमत व्हावें यांत कांहीं लाभ नव्हता. म्हणून आम्हीं दोन तुकड्या केल्या. हें स्थान संगमरवरी खडकांसाठींच प्रसिद्ध असल्यामुळें मोठ्या तुकडीनें त्या बाजूस जाणें पसंत केलें. थोडा उजेड होता तोंवर ती बाजू पाहून घेण्यांत शहाणपण होतें यांत शंका नाहीं. आमच्या दुसऱ्या तुकडीनें योगिनींचें दर्शन घेऊन धुंवाधारला जाण्याचें नक्की केलें आणि आम्ही पायऱ्या चढूं लागलों. सगळ्या योगिनींचें दर्शन आम्ही आमच्या हातांतील एका विजेच्या लहानशा मशालीच्या साहाय्यानें घेतलें. मूर्तींचें कोरीव काम सुंदर आणि कलापूर्ण वाटलें. मंदिरांतील महादेव आणि त्यांचा नंदी देखील पहाण्यासारखा होता.

मनांत विचार आला कीं, जेव्हां एखाद्या लढाईंत आपण घायाळ होतों तेव्हां तावडतोब इलाज करून बरे होतों. गांवांत एखाद्या रोगराईनें माणसें मेलीं तर लगेच त्यांना जाळून किंवा गाडून टाकतों. जमिनीवर दूध सांडलें तर त्याचे अभद्र डाग जमिनीवर राहूं नयेत म्हणून आपण जमीन लिंपून टाकतों. मनुष्यस्वभाव हा असा असूनहि आपल्या खंडित मूर्ति तेवढ्या आपण अजून जशाच्या तशा कां राहूं दिल्या आहेत ? धर्मांध मुसलमानांचें स्मारक म्हणून ? कीं आपल्या भ्याडपणाचा आणि सामाजिक बेजबाबदारपणाचा कबुलीजबाब म्हणून ! अप्रतिम कलामूर्ति तयार करण्याचें कसब आपल्या देशांतून कायमचें नष्ट झालें असेल तर अशा प्राचीन अवशेषांचे नमुने सांभाळून ठेवणें सर्वथा योग्य होय. पण मीं पाहिलें आहे कीं, आबूच्या पहाडावरील देलवाडयाच्या मंदिरांत संगमरवरी पाषाणावरील कारीगरी करणाऱ्या कुटुंबांची कायमची नेमणूक करण्यांत आली आहे आणि मंदिराच्या कोणत्याहि भागांत कांहीं मोडतोड झाली तर लगेच मूळाबरहुकूम त्याची दुरुस्ती करण्यांत येते. आणि

त्याचप्रमाणें लाहोरच्या म्युझियममध्यें सुद्धां मी पाहिलें आहे कीं, मूर्तींचा एखादा कुशल सर्जन घायाळ झालेल्या मूर्तींचे हात, पाय, नाक, ओठ वगैरे सिमेंटच्या मदतीनें बेमालूम रीतीनें सांधूं-सुधारूं शकतात. परंतु आपलीं मंदिरें योग्य अथवा पुरुषार्थी लोकांच्या ताब्यांत आहेतच कुठें ! ‘ धनी नसलेलीं ढोरें ’ अशी आपल्या समाजाची अवस्था आहे.

योगिनींचा आशीर्वाद घेऊन आम्ही टेकडी उतरूं लागलों. अजूनहि अंधुक अंधुक प्रकाश होता त्यामुळें आम्ही हंसतखेळत पण लगबगीनें धुंवाधारच्या शोधांत निघालों. पुढें जाणाऱ्यांचा लगाम खेंचण्याचें आणि मागें रेंगाळणाऱ्यांवर चाबूक ओढण्याचें काम एकाच जिभेला करावयाचें होतें. माझा अनुभव आहे कीं, नव्यानें लाभलेल्या स्वातंत्र्याचें वारें कानांत शिरलेल्या मेंढरां-वासरांना जसजसें जवळ आणण्याचा प्रयत्न करावा तसतसें कळप सोडून दूर दूर भटकण्यांत त्यांना मोठी बहादुरी वाटूं लागते. आणि मग त्यांच्यावर रागावून त्यांना परत आणण्यांत जे कष्ट पडतात त्यामुळें मेंढपाळाला देखील आपलें महत्त्व वाढल्यासारखें वाटूं लागतें. परस्परांच्या खेचाताणींतून उद्भवणाऱ्या त्रासाची मौज दोघांनाहि सोडवत नाहीं.

जिकडे पहावें तिकडे पांढरे पांढरे दगड. जबलपूरचाच तो प्रदेश ! पण एके ठिकाणीं आम्हांला शंखजिऱ्याचें एक शेतच्या शेतच सांपडलें. शंखजिरें ही एक अद्‌भुत वस्तु आहे. दगड तर खराच, पण अगदीं मऊ. जणुं काय पेन्सिलींतलें शिसें. लहाणपणीं एकदां मला संग्रहणीचा विकार झाला होता त्या वेळीं या शंखजिऱ्याची पूड वस्त्रगाळ करून माव्याच्या बरफींतून खावयाला घातली होती. तेव्हांपासून शंखजिऱ्यावर माझी श्रद्धा बसली होती. आंतड्यांत आवेमुळें जेथें जेथें घाव झाले असतील तेथें तेथें ही पूड भरून, जखम भरून येण्यास मदत करते. आणि जखम भरून आली कीं पूड आपोआप पोटांतून बाहेर पडते. दगडाची पूड, ती पचणार थोडीच आहे ! पोटांत राहिली तर रोग व्हायचा. पण आपलें काम पुरें झाल्याबरोबर आभाराचीं वचनें वसूल करण्यासाठीं सुद्धां अधिक दिवस रहाण्याची चूक ती करीत नाहीं.

आतां तर चहूंकडे चांगलाच अंधार पसरला होता. सर्वत्र भयंकर एकान्त होता. आणि समुद्रांतून एखादें जहाज चालावें त्याप्रमाणें त्या एकान्ताला कापीत आमची तुकडी पुढें जात होती. हवा कांहींशी कुंद वाटत होती. पाऊस केव्हां

येईल त्याचा नेम नव्हता. आकाशांत पाहिलें तों काळ्या काळ्या ढगांमध्यें एका बाजूस एक चांदणी चमकत होती. चमकत कसली ? दुःखाकष्टानें बिचारी हळूच डोकावून बघत होती – एका मोठ्या विशाल वाड्यांत एखादी एकाकी वृद्धा झरोक्यांत बसून ओस पडलेल्या रस्त्यावर पहात असावी त्याप्रमाणें. आम्ही पुढें निघालों. येथून जमीन चांगलीच ओलसर होती. मधून मधून पाण्याचीं व चिखलाचीं डबकीं सुद्धां लागत.

अंधार चांगलाच वाढला होता. खड्डयाखळग्यांतून मार्ग काढणें कठीण होऊं लागलें. पुढें जाण्याचा उत्साह पार ओसरला. अशा अडचणींच्या जागीं अंधाऱ्या रात्रीं येथपर्यंत आलों त्यालाच प्रवासाचा आनंद मानून आम्हीं परत फिरण्याचा विचार केला. अशा निर्जन आणि भयानक जागीं चोर भेटले तर ? — अशी शंकाहि मनाला चाटून गेली.

कित्येक लोकांना एकट्यानें प्रवास करतांना चोरांचिलटांची भीति वाटते. मोठा समुदाय असला तर ही भीति जणुं काय सगळ्यांमध्ये विभागली जाऊन प्रत्येकाच्या वांट्याला फारच थोडी येते आणि एकमेकांच्या आधारानें प्रत्येक जण आपली भीति मनांतल्या मनांत दाबून देखील टाकूं शकतो. कित्येक लोकांचें याहून अगदीं उलट असतें. एकटें असल्यांवरें त्यांना स्वतः-बद्दल कसलीच पर्वा वाटत नाहीं. आपलें वाटेल तें होवो. मारामारीचा प्रसंग आला तर मनमुराद लढतां लढतां अब्रू राखून सगळ्या शरीरभर मार खाण्यांत कसलेंच विशेष नुकसान नाहीं; आणि वृत्ति अहिंसक असेल तर राग येऊं न देतां किंवा भयानें पळून न जातां मार खात रहाण्यांतहि कांहीं वेग-ळीच मौज आहे; सत्याग्रही वृत्तीनें खाल्लेला मार देणाऱ्यालाच बाधत असतो, कारण अहिंसक व्यक्तीला मारणारा प्रत्येक क्षणीं आपल्याच मनासमोर फजीत होत असतो.

परंतु जेव्हां मोठी टोळी सोबत असते तेव्हां त्यांच्यापैकीं प्रत्येकजण कसा काय वागेल याची आपल्याला खात्री नसते. मुलें किंवा बायका बरोबर असल्या तर वेगळ्याच रीतीनें विचार करावा लागतो. आपला जीव धोक्यांत घालण्यांत जी एक खुमारी असते ती येथें अनुभवास येत नाहीं. सगळेच सत्याग्रही असले तर गोष्ट वेगळी, पण मोठें खिचडी टोळकें बरोबर घेऊन संकटाच्या

जागीं कधींहि जाऊं नये. श्रीकृष्णाच्या कुटुंबपरिवाराला घेऊन जाणाऱ्या वीर अर्जुनाची देखील काय दशा झाली तें आपण पुराणांत वाचतोंच.

या अशा अंधारांत खडकांमधून मार्ग काढीत कोठवर जावयाचें आणि तेथें काय पहायला मिळणार, त्याची कल्पना नसल्यामुळें येथूनच परत जाणें चांगलें असा विचार मनांत आला. इतक्यांत उजव्या बाजूस एक लहानशी मोडकळीस आलेली झोंपडी दृष्टीस पडली. ही चोराची तर नसेल ? अशा निर्जन प्रदेशांत चोर चोरी तरी कसली करणार ? पण चोरी करून थकल्यानंतर शांत आणि निवान्तपणें बसण्यासाठीं ही जागा चांगली आहे. चोराच्या शोधांत निघालेल्या लोकांना येथपर्यंत येण्याची कल्पना सुद्धां शिवणार नाहीं.

अथवा या झोंपडींत निरंजनाचें ध्यान करणारा एखादा अलक्ष उपासक साधु रहात असेल ? आम्ही जवळ गेलों. आंत कुणीच नव्हतें ! तर मग ही झोंपडी साधूची असणें शक्य नाहीं. फकीर जसा सारा दिवस वाटेल तिकडे भटकला तरी रात्रीं मशिदींत परत आल्याशिवाय रहाणार नाहीं, तसेंच बाबा असेल तर त्याची रात्र बाहेर कुठेंहि न जातां, आपली सहचरी आगीची धुनी हिच्या सहवासांतच जावयाची.

तर मग ही झोंपडी मासे मारणाऱ्या कोळी लोकांची असली पाहिजे. कुणाची का असेना, आपल्याला त्याचें काय ? आपल्याला थोडीच आजची रात्र येथें काढावयाची आहे ? थोडेंसें पुढें गेल्यावर खात्री झाली कीं, रस्ता वगैरे ठीक नसल्यामुळें आतां अंधारांत पुढें जाणें म्हणजे केवळ कष्टांनाच आमंत्रण देण्यासारखें आहे. म्हणून मीं हुकूम सोडला कीं, ‘ चला, आपण आतां परत फिरूं या. ’ इतक्यांत जणुं काय आमची सत्त्वपरीक्षा पुरी झाली असावी त्याप्रमाणें मेघ थोडेसे पांगले आणि बरोबर डोक्यावर आलेल्या चंद्रानें ‘ पश्याश्चर्याणि भारत ’ म्हणून आसपासचा सगळा प्रदेश प्रकाशित केला. सूर्य सगळेंच प्रकट करून दाखवितो त्यामुळें त्याच्या प्रकाशांत कसलेंच काव्य नसतें. अंधाऱ्या रात्रीं आकाशांतल्या ताऱ्यांमध्येंच विचरणाऱ्या दृष्टीला चंद्र पृथ्वीवर धाडून देतो आणि म्हणतो, ‘ थोडें डोळ्यांनीं पहा आणि बाकीचें सगळें कल्पनेनें भरून काढा. ’

चंद्रानें मदत केली आणि दूरवरून धुंवाधारचा उद्घोषहि कानीं पडूं लागला. माझा हुकूम बाजूलाच राहिला आणि सगळीं पावलें जोरजोरानें पुढें

पडूं लागली. थोडेसेच पुढें गेलों आणि जणुं काय दुधाचा स्रोत उतरत असावा तसा धुंवाधार नजरेस पडला. सर-सर धब-धब ! सुळ्मुळ धब-धब ! कर्र्र्र धब-धब ! धब-धब; धब-धब ! उन्मत्त पाणी वहातच चाललें होतें आणि त्या पाण्यांतून बाहेर पडणारी सीकरवृष्टि सर्वत्र पसरत होती. वृष्टि कसली ? तुषारांचें कारंजेंच तें ! किती आतिथ्यशील ! सूक्ष्म जीवन-कणांनीं आमच्या जीवन-क्षणांचें सार्थक केलें. चंद्र हंसत होता, पाणी खेळत होतें, तुषार उडत होते, हवा झुलत होती नि आम्ही डोलत होतों. ' हें पहा ', ' हें पहा ', ' तिकडे बघा ', ' काय मौज आहे ! ' अशा उद्‍गारांचा धबधबा पहातां पहातां सुरू झाला. आमच्याबरोबर आलेल्या स्वयंसेवक वाटाड्यानें वेगवेगळ्या ऋतूंत धुंवाधार कसा दिसतो त्याचें वर्णन करायला सुरुवात केली. येथें लोक पोहायला कसे येतात, कुठून उड्या मारणें शक्य आहे, उन्हाळ्यांत धुंवावरची उंची किती असते वगैरे बरीचशी माहिती त्यानें आम्हांला ऐकवली आणि आपल्या माहितीबद्दल व रसिकतेबद्दल आमच्याकडून आपली पाठ थोपटून घेतली. आतां सगळे शांत झाले आणि टक लावून धुंवाधारशीं एकरूप होण्यांत गढून गेले. किती भव्य-पावन दर्शन तें ! अरणीच्या मंथनांतून प्रथम उष्णता उत्पन्न होते; त्यानंतर धूर निघूं लागतो. तो धूर वाढतां वाढतां त्यांतून ठिणग्या उडूं लागतात आणि नंतर ज्वाला निघूं लागतात. त्याचप्रमाणें निसर्गयात्रेंतून प्रथम कुतूहल जागृत होतें, त्यांतून अद्‍भुतता जन्म घेते आणि ती बरीचशी गोळा झाली कीं, एकाएकी भक्तीचा उमाळा बाहेर पडतो. ' चला, आपण येथें शिळेवर बसून प्रार्थना करूं या. ' प्रार्थनेसाठीं असलें पवित्र स्थान आणि असली शुभघडी नेहमीं मिळत नसते. सर्वजण पटापट जागा सांपडली तेथें बसले आणि ' यं ब्रह्मा वरुणेन्द्र... ' चा ध्वनि धुंवाधारच्या कानीं पडला.

वेगवेगळ्या वेळीं जसे वेगवेगळे राग आळविण्यांत येतात त्याप्रमाणें वेगवेगळ्या स्थळीं मला वेगवेगळीं स्तोत्रें सुचतात. हिंदुस्थानच्या दक्षिणेस कन्याकुमारीला तीनदां गेलों होतों त्या वेळीं मला गीतेचा दहावा आणि अकरावा अध्याय सुचला होता. विभूतियोग आणि विश्वदर्शन-योग यांचें पठन करण्यासाठीं तेंच स्थान योग्य आहे. आणि जेव्हां सिलोनच्या मध्यभागीं — अनुराधापुराजवळ — महेन्द्र पर्वताच्या शिखरावर दिवस मावळण्याच्या सुमारास पोहोंचलों होतों, त्या वेळीं पाटलिपुत्राहून आकाशमार्गानें येऊन, या शिखरावर उतरणाऱ्या

महेन्द्राचें स्मरण करून मीं ईशावास्योपनिषदाचा पाठ केला होता. अनात्मवादी बुद्ध-शिष्यांच्या आत्म्याला ईशोपनिषद ऐकून काय वाटलें असेल देव जाणे! आणि पुण्याहून शिवनेरीला गेलों होतों, त्या वेळीं किल्ल्यावरील मशिदीच्या उंच भिंतीच्या पायऱ्या चढून, श्रीशिवाजी महाराजांच्या बाल्यकाळाच्या क्रीडाभूमीचें दुरून दर्शन घेऊं लागलों आणि कसें कोण जाणें, मांडुक्योपनिषद योग्य वाटलें. तें उपनिषद समर्थ रामदासांचें आवडतें होतें असें मानण्यास कसलाहि पुरावा नाहीं; पण 'नान्तः प्रज्ञं न बहिःप्रज्ञं नोऽभयतः प्रज्ञं न प्रज्ञानघनम् न प्रज्ञं नाप्रज्ञम्।' ही कंडिका बोलत असतांना जणुं काय शिवकालीन महाराष्ट्र आणि आत्मारामाची अभेदभक्ति करणारे साधुसंत यांच्याशीं मी अगदीं तादात्म्य पावत होतों. 'जळो हें वेगळें व्यक्तित्व; एकरूप सर्वरूप होऊन जावें या समस्त दृश्याशीं': असें त्या वेळीं झालें होतें. धुंवाधारची मस्ती व त्याच्या तुषारांचें हास्य पाहून येथें स्थितप्रज्ञाचीं लक्षणें गाणें योग्य वाटलें.

उत्कट भावनेचें सेवन फार वेळपर्यंत सारखें करीतच राहिलें पाहिजे असें नाहीं. एखाद्या आलापांत एका समस्त भावसृष्टीचा समावेश करणें शक्य आहे. एका जलबिंदूत प्रचंड सूर्य प्रतिबिंबित होऊं शकतो. एका दीक्षामंत्रानें युगायुगांचें अज्ञान दूर करतां येतें. तसेंच एका घटकेंत धुंवाधारचें वातावरण आम्हीं आपलेंसें केलें. डोळ्यांची शक्ति किती विलक्षण आहे! धुंवाधारचें पान तोंडानें करणें अशक्य होतें. आम्ही थोडेच कुंभसंभव अगस्ति होतों! पण आमच्या डोळ्यांतील दोन लहानशा बाहुल्यांनीं त्या अखंड वाहणाऱ्या धबधब्याचें आकंठ पान केलें. मला वाटतें अशा दृक्‌पानाला 'आ-कंठ' न म्हणतां 'आ-पक्ष्म' म्हटलें पाहिजे. आम्ही सर्वांनीं आपापल्या डोळ्यांत ही लूट एका क्षणांत भरून घेतली; आणि परत फिरलों. आमची ही सगळी भुतावळ तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी करीत आणि गर्जना जागवीत मोटारीच्या अड्ड्यावर येऊन पोहोंचली.

येथें भेडाघाटाचे संगमरवरी पाषाण पाहून आलेली आमची तुकडी आम्हांला भेटली. एकमेकांच्या अनुभवांची आम्हीं देवाणघेवाण केली आणि त्या तुकडीला जाणत्या अनुभवी व्यक्तीच्या भूमिकेवरून सल्ला दिला कीं, 'इतक्या रात्रीं धुंवाधारला जाण्यांत कांहींच अर्थ नाहीं, म्हणून तुम्ही तैलवाहनांत बसून सरळ जबलपूरला जावें. आम्ही मात्र तुम्ही गेलेल्या ठिकाणीं थोडा नौकाविहार

करून लगेच परत येतों.' आमचा हा सल्ला त्या तुकडीला रुचला कीं नाहीं कोण जाणे. पण तो मानल्यावांचून गत्यंतर नव्हतें.

रस्त्याच्या कडेनें उतरत उतरत आणि अंधारांत अडखळत ठेचाळत आम्ही प्रवाहाच्या कांठापर्यंत पोहोंचलों. आणि पुन्हां आमच्या दोन तुकड्या करून आम्ही दोन होड्यांत जाऊन बसलों. आमची होडी पुढें निघाली. जिथें पहावें तिथें तुडुंब शांति भरलेली होती. आणि ती किती खोलवर पसरलेली आहे त्याचा ठाव घेण्यासाठीं कीं काय, मधून मधून आमच्या होडीचीं वल्हीं तालबद्ध आवाज करीत होतीं. चंद्र आपली मिणमिणती मशाल शिरावर धरून, 'आसपासची शोभा दिवसा कशी दिसत असेल याची कल्पना करा' असें जणुं कोडें घालीत होता. कित्येक ठिकाणीं केवळ अंधार होता. मधें मधें चांदण्याचे डाग पडलेले होते. आकाश निरभ्र नव्हतें त्यामुळें चांदणें ताकाप्रमाणें पातळ बनलें होतें. आणि आकाशांतील ढग अधूनमधून मलमलीप्रमाणें तलम आहेत ही गोष्ट लक्ष वेधून घेत होती. दोन्ही अंगाचे संगमरवरी पाषाण किती उंच दिसत होते! उंच आणि भीषण! जणुं एखादी राक्षसांची जमात येथें येऊन बसली असावी! आणि या खडकांमधून वळणें घेत घेत नर्मदेचा प्रवाह आपला चक्रव्यूह रचीत होता.

उंच उंच खडक अथवा पहाड जेथें अगदीं जवळ जवळ येतात, तेथें 'प्राचीन काळांत एका सरदारानें आपला घोडा टांच मारून या शिखरावरून समोरच्या शिखरावर फेकला,' अशा प्रकारची दंतकथा अस्तित्वांत यावयाचीच. वांदरें तर खरोखर अशा उड्या मारतातच. येथें सुद्धां अशा गोष्टी होडीवाल्या खलाशाकडून तुम्हांला ऐकायला मिळतील.

येथल्या या खडकांत कित्येक गुंफा देखील आहेत. या गुंफांमध्यें ऋषिमुनि ध्यानधारणेसाठीं रहात असलेच पाहिजेत, आणि मध्ययुगांत राजकुलांतील आपद्ग्रस्त लोक आणि स्वातंत्र्याची साधना करणारे देशभक्त सुद्धां येथेंच आत्मरक्षणासाठीं लपून राहिले असतील; आणि मग चिचुंद्रीप्रमाणें सरकणाऱ्या होड्या अशा लोकांना गुप्तपणें आहार, समाचार आणि आश्वासन आणून पोहोंचवीत असतील. या गुंफांना जर वाचा असती तर इतिहासांत नोंदला न गेलेला असा किती तरी वृत्तान्त त्यांनीं आपल्याला सांगितला असता.

होडींत बसून खिंडीच्या मधोमध जातां जातां आम्ही अशा एका ठिकाणीं येऊन पोहोंचलों कीं ज्याला शांतीचें गर्भगृह म्हणतां येईल. येथें आम्हीं वल्हीं मारणें बंद करवलें, श्वास सुद्धां ऐकूं येईल या भयानें मंद केला. प्रार्थनेचे श्लोक आम्हीं तेथें उच्चारले किंवा नाहीं तें आठवत नाहीं. पण मीं मात्र मनांतल्या मनांत सोळा ऋचांचें पुरुषसूक्त मोठ्या उत्कटतेनें बोलून घेतलें. नंतर वाटलें इतक्या शांतीमध्यें आपोआप समाधिच लागायला हवी. किती वेळ निघून गेला कोण जाणे. पण तेवढ्यांत डब डब डब करीत दुसरी होडी येऊन ठेपली. त्यांतल्या टोळीनें एक मंजुळ गीत गाण्यास प्रारंभ केला. आसपासच्या दरडी त्याचा पडसाद उमटवावा किंवा नाहीं या दुविधेंत अर्धेमुर्धे उत्तर देत होत्या.

आतां येथून पुढें जाणें शक्य नाहीं, येथूनच परत वळणें भाग आहे असें होडीवाल्यानें सांगितलें. त्यामुळें आम्ही धावणाऱ्या मनाला मागें खेचून म्हणालों, 'चला तर मग! पुनरागमनाय च!'

आतां जावयाचें तें वर्षाऋतूच्या शेवटीं, चांदण्याचे दिवस पाहून, दिवस-रात्र या मूर्तिमंत काव्यांत डुंबत रहाण्यासाठींच जावयाचें. खरोखर, तें रमणीय स्थान पाहून मनानें नक्की केलें कीं जर पुन्हां येथें येणें होणार नसेल तर येथून निघायचेंच नाहीं.

ऑक्टोबर १९३७

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 3888 दि. 25-8-
क्रमांक 320 नों. दि. 25-3-62

# गंगामाई

३

: १ :

गंगेनें दुसरें तिसरें कांहीं केलें नसतें आणि एकट्या देवव्रत भीष्माला जन्म दिला असता, तरी सुद्धां आर्य जातीची माता म्हणून आज ती प्रसिद्धीस आली असती. पितामह भीष्मांची प्रतिज्ञा, भीष्मांची निःस्पृहता, भीष्माचें ब्रह्मचर्य आणि भीष्माचें तत्त्वज्ञान हें आर्य लोकांचें नित्य आदरणीय ध्येय होऊन बसलें आहे. भारतीय संस्कृतीचा आधारस्तंभच अशा या महापुरुषाची माता म्हणून आपण गंगेला ओळखतों.

: २ :

नदीला एखादी उपमा समर्पक असेल तर ती मातेचीच. नदीच्या कांठीं राहिल्यावर दुष्काळाचें भय तर उरतच नाहीं. मेघराजानें दगा दिला तर नदीमाता आपलें पीक पिकवून देते. नदीचा कांठ म्हणजे शुद्ध व शीतल हवा. नदीच्या कांठाकांठानें फिरावयास निघालें असतां प्रकृतीच्या मातृ-वात्सल्याच्या अखंड प्रवाहाचें दर्शन होतें. नदी मोठी असली व तिचा प्रवाह धीरगंभीर असला म्हणजे तर अशा नदीमुळें कांठावर रहाणाऱ्या लोकांची चांगली भरभराट झालेली असते. खरोखरच नदी ही जन-समाजाची माता आहे. नदीकांठच्या शहरांतील गल्लीबोळांतून फिरत असतांना अकस्मात् एखाद्या कोपऱ्यांतून जेव्हां नदीचें दर्शन होतें तेव्हां आपल्याला किती आनंद होतो! कुठें हें शहरांतील गलिच्छ वातावरण आणि कुठें तें नदीचें प्रसन्न दर्शन! लगेच फरक जाणवतो. नदी ईश्वर नसो, पण ईश्वराचें स्मरण करून देणारी देवता आहे यांत शंका नाहीं. जर गुरूला वंदन करणें योग्य असेल, तर नदीलाहि वंदन करणें योग्यच ठरेल.

ही झाली सामान्य नदीची गोष्ट. पण गंगामाई तर आर्य जातीची माता. आर्यांचीं मोठमोठीं साम्राज्यें या नदीच्या तीरावरच स्थापलीं गेलीं. कुरुपांचाल देशांचा अंग-वंगादि देशांशीं असलेला संबंध गंगेनेंच घडवून आणला आहे. आज देखील हिंदुस्थानची लोकवस्ती गंगेच्या किनाऱ्यावरच सर्वांत अधिक प्रमाणांत आहे.

जेव्हां आपण गंगेचें दर्शन घेतों तेव्हां भरघोस पिकांनीं फुललेलीं शेतेंच आपल्या ध्यानांत येतात किंवा मालानें लादलेलीं जहाजेंच आपलें लक्ष वेधून घेतात असें नाहीं; तर वाल्मीकींचीं कवनें, बुद्ध महावीरांचे विहार; अशोक, समुद्रगुप्त किंवा हर्षासारख्या सम्राटाचा पराक्रम आणि तुलसीदास किंवा कबीर यांसारख्या संतजनांचीं भजनें – या सर्वांचेंच स्मरण होतें. गंगेचें दर्शन म्हणजे शैत्य-पावनत्वाचें हार्दिक आणि प्रत्यक्ष दर्शन होय.

परंतु गंगेचें दर्शन कांहीं एकाच प्रकारचें, एकविध नाहीं. गंगोत्रीजवळच्या हिमाच्छादित प्रदेशांतील तिचें लडिवाळ कन्या-स्वरूप, उत्तर काशीकडील चीड-देवदार वृक्षांच्या काव्यमय प्रदेशांतील तिचें मुग्धा-स्वरूप, देवप्रयागच्या पहाडी आणि अरुंद प्रदेशांत चमकदार अलकनंदेबरोबर चाललेली तिची क्रीडा, लक्ष्मणझूल्याच्या कराल दाढांतून सुटका झाल्यानंतर हरद्वाराजवळ तिचा अनेक धारांनीं चाललेला स्वच्छंद विहार, कानपूरला घासून जाणारा तिचा इतिहास-प्रसिद्ध प्रवाह, प्रयागच्या विशाल पटावर तिचा कालिंदीसमवेत त्रिवेणीसंगम – प्रत्येकाच्या शोभेचें म्हणून एक वेगळेंपण आहे, वैशिष्ट्य आहे. एक दृश्य पाहून दुसऱ्याची कल्पना येणें शक्य नाहीं. प्रत्येकाचें सौंदर्य वेगळें, प्रत्येकाचा भाव वेगळा, प्रत्येकाचें वातावरण वेगळें, प्रत्येकाचें माहात्म्य वेगळें.

: ३ :

प्रयागच्या पुढें गंगा वेगळेंच स्वरूप धारण करते. गंगोत्रीपासून प्रयागपर्यंतचा गंगेचा प्रवाह वर्धमान असला तरी त्याला एकजिनसी म्हणतां येईल. पण प्रयागजवळ तिला यमुना येऊन मिळते. पहिल्यापासूनच यमुना दुहेरी ह्याडांची. खेळते, नाचते, पण अल्लड वाटत नाहीं. गंगा शकुंतलेसारखी तपस्वी कन्यका वाटते, तर काळी यमुना द्रौपदीप्रमाणें मानिनी राजकन्या दिसते. शर्मिष्ठा आणि देवयानी यांची गोष्ट आपण ऐकतों तेव्हां सुद्धां प्रयागजवळील

गंगा आणि यमुना यांचे मोठ्या कष्टानें मिसळणारे शुक्ल-कृष्ण प्रवाह आठवतात. हिंदुस्थानांत असंख्य नद्या आहेत आणि म्हणूनच संगमांनाहि तोटा नाहीं. आपल्या पूर्वजांनीं या सर्व संगमांत गंगायमुनांचा हा संयोग सर्वांत अधिक श्रेष्ठ मानला, पसंत केला आहे आणि म्हणूनच त्याला प्रयागराज हें गौरवपूर्ण नांव देण्यांत आलें आहे. मुसलमानांच्या आगमनानंतर जसें हिंदुस्थानच्या इतिहासाचें रूप पालटलें, त्याचप्रमाणें दिल्ली-आग्रा व मथुरा-वृंदावन यांच्या सहवासांतून येणाऱ्या यमुनेच्या प्रवाहामुळें गंगेचें स्वरूपहि पार बदलून गेलें आहे.

प्रयागानंतर गंगा कुलवधूप्रमाणें गंभीर व सौभाग्यवती दिसूं लागते. यापुढें तिला मोठमोठ्या नद्या मिळत जातात. यमुनेचें पाणी मथुरा-वृंदावनांतील कृष्णाच्या आठवणी अर्पण करतें, तर अयोध्येहून येणारी शरयू आदर्श राजा रामचंद्राच्या प्रतापी पण करुण जीवनाच्या स्मृति घेऊन येते. दक्षिणेकडून येणारी चंबल रंतिदेवाच्या यज्ञयागाच्या गोष्टी सांगते, तर महान् कोलाहल करीत येणारा शोणभद्र गजग्राहाच्या दारुण संग्रामाची व गजेंद्रमोक्षाची आठवण करुन देतो. याप्रमाणें पुष्ट होत गेलेली गंगा पाटलीपुत्राजवळ मगध साम्राज्याप्रमाणें विस्तीर्ण बनते. तरी देखील गंडकी आपली अमूल्य खंडणी घेऊन येण्यास मागेंपुढें पहात नाहींच. जनक आणि अशोक, बुद्ध आणि महावीर यांच्या प्राचीन भूमींतून पुढें निघतांना गंगा जणुं ' आतां कोठें जावें ' अशा विचारांत पडलेली दिसते. एवढा प्रचंड जलसंचय आपल्या अदम्य अमोघ वेगानें पूर्वेकडे मुसंडी मारीत असतां त्याला दक्षिणेकडे वळवणें काय सोपी गोष्ट आहे ? तरी पण तो तसा वळला आहे. दोन सम्राट् किंवा जगद्गुरु जसे एकदम एकमेकांना भेटत नाहींत, तसाच कांहींसा प्रकार गंगा व ब्रह्मपुत्रा यांच्या बाबतींत झालेला दिसतो. ब्रह्मपुत्रा हिमालयाच्या पलीकडील सर्व पाणी घेऊन आसामांतून पश्चिमेकडे येते आणि गंगा या बाजूनें पूर्वेकडे धांव घेते. त्यांची समोरासमोर भेट कशी व्हावी ? कोण कोणापुढें प्रथम नमणार किंवा कोण कुणाला वाट करुन देणार ? शेवटीं उभयतांनीं ठरवलें कीं, प्रत्येकीनें दाक्षिण्य धारण करुन सरित्पतीच्या दर्शनास जावें आणि भक्तिनम्र होऊन जातां जातां जमेल त्या ठिकाणीं रस्त्यांत एकमेकींची भेट घ्यावी.

याप्रमाणें गोआलंदोजवळ जेव्हां गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांचे विशाल प्रवाह एक होतात तेव्हां समुद्र याहून वेगळा असूं शकेल काय अशी शंका येऊं लागते.

विजय संपादन केल्यानंतर शिस्तींत तयार झालेली सेना सुद्धां ज्याप्रमाणें विस्कळींत होते आणि विजयी वीर मनांत येईल तसे वागूं लागतात, तसेंच यापुढें या महान् नद्यांचेंहि झालें आहे. अनेक मुखांनीं त्या सागराला जाऊन मिळतात. प्रत्येक प्रवाहाचें नांव निराळें. आणि कांहीं प्रवाहांना तर एकापेक्षां अधिक नांवें आहेत. गंगा व ब्रह्मपुत्रा एक होऊन 'पद्मा' हें नांव धारण करतात आणि पुढें गेल्यावर तीच नदी 'मेघना' या नांवानें ओळखली जाते.

ही अनेकमुखी गंगा शेवटीं जाते कुठें ? सुंदरवनांत वेतांचीं बेटें उगवायला कीं सगरपुत्रांच्या वासना तृप्त करून त्यांचा उद्धार करायला ? आज जाऊन बघाल तर जुन्या काव्यापैकीं कांहीं सुद्धां येथें शिल्लक राहिलेलें आढळणार नाहीं. जिकडे पहावें तिकडे तागाचीं सणाचीं पोतीं बनवणाऱ्या गिरण्या आणि असेच दुसरे ओंगळ कारखाने ! जेथून पूर्वीं भारतीय कलाकौशल्यांच्या असंख्य वस्तु भारतीय जहाजांतून लंका किंवा जावा द्वीपापर्यंत जात, त्याच रस्त्यानें आज विलायती व जपानी आगबोटी परदेशी कारखान्यांत तयार झालेला तकलादु माल हिंदुस्थानांतील बाजारांत विकण्याकरितां घेऊन येतांना दिसतात. गंगामाई पूर्वींप्रमाणेंच सर्व प्रकारची समृद्धि अर्पण करीत आहे; पण आपले दुबळे हात ती पेलूं शकत नाहीं.

गंगामाई, अजून कोठवर हें असलें दृश्य पहाण्याचें तुझ्या नशिबीं आहे ?

फेब्रुवारी १९३६

# यमुनाराणी

४

हिमालय म्हणजे भव्यतेचें भांडार ! जिकडेतिकडे भव्यता विखरून देऊन भव्यतेची भव्यता कमी करणें हाच जणुं हिमालयाचा व्यवसाय आहे. तरी सुद्धां अशा हिमालयांत एक स्थान असें आहे कीं ज्याची ऊर्जस्विता हिमालयांत रहाणाऱ्यांच्याहि डोळ्यांत भरते. तें म्हणजे यमराजाच्या बहिणीचें उगमस्थान यमनोत्री.

उंचावरून बर्फ वितळून मोठा धबधबा खालीं पडत आहे. आसपास गगनचुंबी नव्हे, तर गगनभेदी महावृक्ष आडवे पडून कुजत आहेत. उत्तुंग पहाड यमदूतांप्रमाणें रक्षण करण्यास दोहों बाजूंनें उभे आहेत; घटकेंत पाणी थिजून त्याचें बर्फ बनत आहे; तर घटकेंत बर्फ वितळून त्याचें बर्फाइतकेंच थंडगार पाणी होत आहे. अशा ठिकाणीं जमिनींतून अद्भुत प्रकारें उकळतें पाणी वर उफाळून येतें. बाष्प यंत्रांतून क्रुद्ध झालेली वाफ बाहेर पडावी तसा आवाज जमिनींतून निघतो. आणि झऱ्यांतून पुरुषभर उंच उडणारे तुषार अशा थंडींतहि माणसाला भाजून काढतात. अशा लोकविलक्षण स्थानीं असित ऋषीनें यमुनेचें मूळ शोधून काढलें. या ठिकाणीं यमुनेच्या प्रवाहांत स्नान करणें अशक्यप्रायच आहे. थंडगार पाण्यांत स्नान करावें तर कायमचे थंडगार पडण्याची पाळी यायची. आणि गरम पाण्यांत आंघोळ करावी तर तेथेंच बटाट्याप्रमाणें उकडून निघण्याची भीति. एवढ्यासाठींच तेथें मिश्र पाण्याचीं कुंडें तयार केलीं आहेत. एका झऱ्यावर एक गुंफा आहे. तींत लांकडाच्या फळ्या टाकून झोपतां येतें. मात्र रात्रभर मधून मधून कूस बदलत राहिलें पाहिजे. कारण वरची थंडी आणि खालची उष्णता दोन्ही असह्य आहेत.

दोघी बहिणींत गंगेपेक्षां यमुना मोठी आहे, प्रौढ आहे, गंभीर आहे; कृष्णभगिनी द्रौपदीप्रमाणेंच कृष्णवर्णा व मानिनी आहे; गंगा जणुं काय गरीब

बिचारी मुग्ध शकुंतलाच; पण देवाधिदेव महादेवांनीं तिचा स्वीकार केला म्हणून यमुनेनें आपलें मोठेपण विसरून जाऊन गंगेलाच वडीलकीचा मान अर्पण केला आहे. या दोघी बहिणी एकमेकींना भेटण्यासाठीं अगदीं आतुर झाल्यासारख्या दिसतात. हिमालयांत एका ठिकाणीं तर त्या एकमेकींच्या फारच जवळ येतात. पण मत्सरी दंडाल पर्वत एखाद्या विघ्नसंतोष्यासारखा मधेंच आडवा येऊन पडल्यामुळें तेथें त्यांचें मीलन होत नाहीं. एक कवि-हृदय ऋषि येथें यमुनेच्या कांठीं राहून रोज गंगेंत स्नानाला जाई. पण पुन्हां जेवत असे यमुनेच्या घरीं येऊन. तो म्हातारा झाला ( ऋषिसुद्धां शेवटीं म्हातारे होतात ) तेव्हां त्याच्या थकलेल्या पायांची दया येऊन गंगेनें आपला प्रतिनिधि म्हणून एक लहानसा पांढुरका झरा यमुनेच्या कांठीं ऋषीच्या आश्रमापाशीं पाठवून दिला. आजहि तो लहानसा प्रवाह त्या ऋषीचें स्मरण करीत वहात आहे.

डेहराडूनजवळहि आपल्याला आशा वाटते कीं, आतां 'तरी या दोन नद्या एकमेकीस मिळतील. पण छे, आपल्या शैत्य-पावनत्वानें संपूर्ण अंतर्वेदीचा प्रदेश पुनीत करून सोडण्याचें कर्तव्य पार पाडल्यावांचून एकमेकींना भेटून रिकामपणच्या शिळोप्याच्या गोष्टी बोलण्याचें त्यांना सुचावें तरी कसें ! गंगा तर उत्तर काशी, टेहरी, श्रीनगर, हरद्वार, कनोज, ब्रह्मावर्त, कानपूर, वगैरे पुराण व इतिहासप्रसिद्ध स्थळांना स्तन्यदान करीत धांवत असते; इकडे यमुना कुरुक्षेत्र आणि पानिपतचा हिंसक भूप्रदेश न्याहाळीत भारताच्या राजधानीपाशीं येऊन पोहोंचते. यमुनेच्या पाण्यांत साम्राज्याची शक्ति असली पाहिजे. पांडवांपासून तों थेट मोंगल साम्राज्यापर्यंतचा आणि बंडाच्या काळापासून तों अगदीं स्वामी श्रद्धानंदजींच्या खुनापर्यंतचा सारा इतिहास तिच्या स्मरण-संग्रहालयांत सांठवलेला आहे. दिल्लीपासून आग्र्यापर्यंत बाबराचे वंशज आपल्याशीं वार्तालाप करूं इच्छित आहेत असा भास होतो. दोन्ही नगरांचे किल्ले साम्राज्याच्या रक्षणासाठीं नव्हे, तर यमुनेची शोभा पहाण्यासाठींच बांधले असावेत असें वाटतें. मोंगल साम्राज्याचे नगारे आतां शांत झाले, पण मथुरा-वृंदावनांतली मुरली मात्र अजून वाजत आहे.

मथुरा-वृंदावनाची शोभा कांहीं आगळीच आहे. हा प्रदेश जितका रमणीय तितकाच समृद्धहि आहे. हरियाणीच्या गाई आपल्या रसमधुर, सकस दुधाविषयीं साऱ्या हिंदुस्थानांत विख्यात आहेत. यशोदामाता किंवा गोपराज

नंद यांनीं स्वतः हें स्थान पसंत केलें होतें, ही गोष्ट जणुं काय इथली भूमि विसरूंच शकत नाहीं. मथुरा-वृन्दावन म्हणजे बाळकृष्णाची क्रीडाभूमि, वीर कृष्णाची विक्रमभूमि. एक द्वारकावास सोडला तर श्रीकृष्णाच्या जीवनाशीं जास्तींत जास्त सहकार कालिंदीनेंच केला आहे. ज्या यमुनेनें कालियामर्दन पाहिलें त्याच यमुनेनें कंसाचा शिरच्छेद बघितला. ज्या यमुनेनें हस्तिनापुराच्या दरबारांत श्रीकृष्णाची शिष्टाई ऐकली, त्याच यमुनेनें युद्धकुशल श्रीकृष्णाची योगमूर्ति कुरुक्षेत्रावर संचार करीत असतांना डोळे भरून बघितली. ज्या यमुनेनें वृन्दावनांतील प्रणयबांसरींत आपला कलरव मिसळला, त्याच यमुनेनें कुरुक्षेत्रा-वर रोमहर्षण गीतावाणीचा पडसाद उमटवला. यमराजाच्या भगिनीचें बंधुत्व श्रीकृष्णालाच शोभतें.

भारतवर्षांतील क्षत्रियकुळांचा संहार जिनें अनेक वेळां उघड्या डोळ्यांनीं बघितला, त्या यमुनेला पारिजातकाच्या फुलाप्रमाणें सुकुमार अशा ताजबीबीचा मृत्यु कितीसा मर्मभेदक वाटणार? पण तरासुद्धां प्रेमसम्राट् शहाजहानच्या थिजलेल्या अश्रूंना प्रतिबिंबित करण्याचें काम तिनें आपल्या अंगावर घेतलें आहे.

भारतकाळीं विख्यात झालेल्या चर्मण्वती नदीचा करभार घेऊन यमुना पुढें निघते तोंच चिमुकली सिंधु नदी मध्ययुगीन इतिहासाचें ओझरतें दर्शन घडवीत पुढें येऊन उभी रहाते.

आतां यमुना अधीर झाली आहे. किती तरी दिवस झाले, गंगाताईचें दर्शन नाहीं. सांगावयाच्या गोष्टी पोटांत मावत नाहींत, विचारायचे प्रश्न मनांत किती गोळा झाले आहेत त्याला कांहीं सुमारच नाहीं. कानपूर आणि काल्पी कांहीं फारशी दूर नाहींत. येथें गंगेची खुशाली कळली या आनंदाच्या भरांत तोंडांत साखर टाकून यमुना जी धांवत सुटली ती थेट प्रयागराजाला एकदम गंगेच्या गळ्याला जाऊन बिलगली. काय तो दोघींचा उन्माद! भेट झाली तरी आपण भेटलों हें त्यांना जणुं खरेंच वाटेना! भारतवर्षांतील एकूण एक साधुसंत हा प्रेमसंगम पहाण्यासाठीं गोळा झाले आहेत. पण या बहिणींना त्याचें भानच नाहीं. अंगणांत अक्षयवट उभा आहे त्याची त्यांना पर्वा नाहीं. वृद्ध अकबर छावणी टाकून बसला आहे त्याला पुसतो कोण? आणि अशोकचा शिलास्तंभ तेथें आणून उभा केला तरी या बहिणी थोड्याच त्याच्याकडे ढुंकून पहाणार आहेत?

प्रेमाचा प्रवाह अखंड वहातच आहे आणि त्याला साथ देत कविसम्राट कालिदासाची सरस्वती अखंड स्रवत आहे —

क्वचित् प्रभा-लेपिभिर् इंद्रनीलैर् मुक्तामयी यष्टिम् इवानुविद्धा ।
अन्यत्र माला सितपंकजानाम् इंदीवरैर् उत्खचितान्तरेव ॥
क्वचित् खगानां प्रियमानसानां कादंबसंसर्गवतीव पंक्तिः ।
अन्यत्र कालागरुदत्तपत्रा भक्तिर् भुवश् चन्दनकल्पितेव ॥
क्वचित् प्रभा चांद्रमसी तमोभिश् छायाविलीनैः शबलीकृतेव ।
अन्यत्र शुभ्रा शरद्अभ्रलेखा-रन्ध्रेष्विवालक्ष्यनभःप्रदेशा ॥
क्वचित् च कृष्णोरगभूषणेव भस्मांगरागा तनुर् ईश्वरस्य ।
पश्यानवद्यांगि ! विभाति गंगा भिन्नप्रवाहा यमुनातरंगैः ॥

[ हे निर्दोषतनु सीते ! या गंगेच्या प्रवाहांत यमुनेचे तरंग घुसून त्याला खंडित करीत आहेत, तें दृश्य कसें दिसत आहे पहा. कोठें कोठें असा भास होतो कीं, मोत्याच्या माळेंत ओवलेले इंन्द्रनीलमणि मोत्यांच्या प्रभेला झांकाळून टाकीत आहेत. कोठें असें भासतें कीं, श्वेतकमलांच्या हारांत नीलकमलांची गुंफण केली आहे. कोठें मानस-सरोवराकडे जाणाऱ्या शुभ्र हंसांबरोबर काळे कादंब पक्षी उडत आहे तसें वाटतें, तर कोठें शुभ्र चंदनानें सारवलेल्या भूमीवर कृष्णागरूचीं चित्रें काढलीं आहेत असें दिसतें. कोठें असें वाटतें कीं चंद्राच्या प्रभेबरोबर छायेंत पहुडलेल्या अंधकाराची क्रीडा चालू आहे, तर कोठें जणुं शरद्-ऋतूंतील शुभ्र मेघांच्या फटींतून आकाश थोडें थोडें दिसत आहे. आणि कोठें असें दिसतें कीं, जणुं काय महादेवाच्या भस्मचर्चित देहावर कृष्ण सर्पांचीं आभूषणें चढवलीं गेलीं आहेत. ]

किती सुंदर देखावा ! वर पुष्पक विमानांत मेघश्याम रामचंद्र आणि धवलशीला जानकी चौदा वर्षांच्या दीर्घ विरहानंतर अयोध्येस पोहांचण्यास आतुर झालीं आहेत आणि खालीं इंदीवरश्यामा कालिंदी व सुधाजला जाह्नवी एकमेकींचा परिरंभ न मोडतां, आलिंगन ढिलें न होऊं देतां नामरूपाचा त्याग करून सागरांत विलीन होण्यासाठीं धांवत आहेत.

हें दृश्य पाहून स्वर्गांतून पुष्पवृष्टि झाली असेल आणि भूतलावर कवींच्या प्रतिभासृष्टीचीं कारंजीं थुई थुई नाचूं लागलीं असतील.

सप्टेंबर १९२९

# जीवनतीर्थ हरद्वार

५

त्रिपथगा गंगेचे तीन अवतार आहेत. गंगोत्री अथवा गोमुखापासून ते हरद्वार-पर्यंतची गंगा हा तिचा पहिला अवतार. हरद्वारपासून प्रयागराजपर्यंतची गंगा हा तिचा दुसरा अवतार. पहिल्या अवतारांत पहाडांच्या बंधनांतून — शिवाच्या जटेंतून — मुक्त होण्यासाठीं ती धडपडत असते. दुसऱ्या अवतारांत आपली मैत्रीण यमुना आपल्याला केव्हां एकदां भेटते असें तिला झालेलें असतें. प्रयागराजनंतर गंगा यमुनेला भेटून आपल्या विशाल प्रवाहासह सरित्पति सागरांत विलीन होण्यासाठीं अगदीं आतुर होते तो तिचा तिसरा अवतार. गंगोत्री, हरद्वार, प्रयाग आणि गंगासागर हीं गंगापुत्र आर्यांचीं मोठ्यांत मोठीं तीर्थस्थानें होत. जसजसें वर जावें, तसतसें तीर्थाचें माहात्म्य अधिक असें मानलें जातें. एका दृष्टीनें तें खरेंहि आहे. पण माझ्या दृष्टीनें भारतीयांसाठीं सर्वांत आकर्षक स्थान जर कोणतें असेल तर तें हरद्वारच होय. हरद्वारांतहि पांच तीर्थें प्रसिद्ध आहेत. प्रत्येकाच्या माहात्म्याचें पुराणकारांनीं श्रद्धापूर्वक रसभरीत वर्णन केलें आहे. पण हें सारें महत्त्व ठाऊक नसून देखील मनुष्य सांगूं शकेल कीं, 'हरिकी पायडी 'मधेंच गंगेचें माहात्म्य म्हणायचें असेल तर माहात्म्य, आणि काव्य म्हणायचें असेल तर काव्य सर्वांत अधिक दिसून येतें.

तसें पाहिलें तर प्रत्येक नदीच्या लांबींत कोठें ना कोठें काव्यमय भूमि-भाग हा असतोच. गंगेच्या कांठावर हरद्वारपेक्षां अधिक सुंदर स्थान दुसरें असणारच नाहीं असा माझ्या सांगण्याचा आशय नाहीं. हरिकी पायडीच्या आसपास काशी-बनारसच्या शोभेचा शंभरावा भाग देखील सांपडणार नाहीं. तरी सुद्धां येथें निसर्ग आणि मानव यांनीं एकमेकांचे वैरी न बनतां, एकमेकांच्या सहकार्यानें गंगेच्या शोभेंत भर टाकण्याचें काम केलें आहे. गंगेचा तो साधा, स्वच्छ प्रवाह, मंदिराजवळचा तो धांवता घाट, घाटाखालचा लहानसा

वांकडा-तिकडा डोह. या बाजूस हजारों लोक आरामांत बसूं शकतील असा पट-सदृश घाट. आणि पलीकडे लहानशा बेटाची उणीव भरून काढील असा जमिनीचा तुकडा आणि दोन्ही बाजूंस जोडणारा जुना पूल. हें सारेंच काव्यमय आहे. कांठावरील मंदिरें आणि धर्मशाळांचे साधेसुधे कळस यांपैकीं एकहि गंगेवर जडलेलें आपलें ध्यान स्वतःकडे आकर्षून घेत नाहीं आणि तरीहि ते सर्व गंगेच्या शोभेला साजतील असेच आहेत. बनारसच्या बाजारांत फतकल मारून बसणारे आळशी पोळ वेगळे आणि शांतपणें रवंथ करणारे येथले पोळ वेगळे. येथें गंगेंत कोठेंहि नांवाला देखील चिखल सांपडणार नाहीं. अनंतकाळा-पासून एकमेकांवर आपटून घासून गरगरीत गोल बनलेले पांढरे दगड सर्वत्र पाहून घ्यावे.

हरिकी पायडीवरील सर्वांत आकर्षक वस्तूकडे आपलें ध्यान जात नाहीं; आपण तिचा केवळ प्रभाव अनुभवतों. ती वस्तु म्हणजे येथली हवा. हिमालयाच्या दूरदूरच्या हिमाच्छादित शिखरांवरून दक्षिणेकडे वहात येणारा वारा सर्वप्रथम इथल्या मनुष्यवस्तीलाच स्पर्श करतो. इतका पावन पवन अन्यत्र कसा मिळणार ? हरिकी पायडीजवळील पुलावर उभें राहिलें कीं, फुप्फुसें आणि हृदय केवळ आल्हादानें भरून जातात. उन्मादकारी नव्हे, पण प्राणदायी आणि तरीहि प्रशम-कारी.

जितक्या वेळां म्हणून मी येथें आलों तितक्यांदां तीच ती पूर्वीची शांति, तोच तो पूर्वीचा आल्हाद आणि तीच ती पूर्वीची स्फूर्ति मीं अनुभवली आहे. मुंबईच्या चौपाटीबरोबर कांहीं लोक या घाटाची तुलना करतात. आत्यंतिक विरोधाचें सादृश्य या दोघांत आहे खरें ! येथें यात्रेकरू माशांना आहार देतात, तर तेथें कोळी लोक आहारासाठीं माशांना पकडतात.

हरिकी पायडी बघायला जायचें असेल तर संध्याकाळीं सूर्यास्तानंतरच जावें. चांदणें आहे किंवा नाहीं याचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं. चांदणें असेल तेव्हां एका प्रकारची शोभा पहायला मिळेल, नसेल तेव्हां दुसऱ्या प्रकारची. या दोहोंत निवड करायला बसेल तो खरा कलाप्रेमीच नव्हे. संध्या-काशांत एकामागून एक तारे डोकावूं लागले आहेत आणि खालून एकामागून एक पेट घेणारे दिवे त्यांना साद देत आहेत. या साऱ्या दृश्याची गूढ शांति मनावर कांहीं अद्भुत परिणाम करूं लागते, तोंच टिंग टांऽग, टिंग टांऽग

आवाज करीत मंदिरांतील घंटा आरतीसाठीं बोलावूं लागतात. या घंटानादाला जणुं अंतच नाहीं. टिंग टांऽग, टिंग टांऽग असा नाद चालूच असतो आणि भक्तगण नाना प्रकारच्या आरत्या गातच असतो. पुरुष गातात, स्त्रिया गातात, ब्रह्मचारी गातात. आणि संन्याशी देखील गातात; स्थानिक लोक गातात आणि भिन्न भिन्न प्रांतांतून आलेले यात्रेकरूहि गातात. कुणी कुणाची पर्वा करीत नाहीं, कुणी कुणाचा संकोच बाळगीत नाहीं. प्रत्येक जण आपल्या भक्तिभावांत तल्लीन. सनातनी स्तोत्रें गातात. आर्यसमाजी उपदेश करतात. शीख ग्रंथसाहेबांतील एखाद्या 'महोल्ला'तून आसा-दि-वार ललकारत असतात. गोरक्षा प्रचारक तुम्हांला येथें समजावतात कीं, जगांत पांढरा रंग आहे कारण गाईचें दूध पांढरें आहे. गाईच्या पोटांत तेहतीस कोटि देव आहेत; फक्त तेथें पोटापुरता चारा नाहीं. कांहीं नास्तिक या जनसंमर्दाचा फायदा घेऊन ईश्वर नसल्याचें सप्रमाण सिद्ध करून देतात आणि उदार हिंदु धर्म सद्भावपूर्वक हें सगळें चालूं देतो. गंगा-माईच्या वातावरणांत कुणाचाच तिरस्कार नाहीं, सर्वांचा स्वीकार-सत्कार आहे. भगवीं वस्त्रें चढवून स्वतः मुक्त असल्याचा आव आणणारे मुक्तिसेनेचे मिशनरी जर उद्यां उठून येथें हिंदु धर्माच्या विरुद्ध प्रचार करूं लागले तर आपले यात्रे-करू त्यांचेंहि शांतपणें ऐकून घेतील आणि म्हणतील ईश्वरानें जशी बुद्धि दिली तसा बिचारा बोलतोय्; त्यांत त्याचा काय दोष ?

हिंदु समाजांत अनेक दोष आहेत आणि त्या दोषांमुळें हिंदु समाजानें सोसलेंहि बरेंच आहे. परंतु उदारता, सहिष्णुता आणि सद्भाव हीं हिंदु समाजाचीं वैशिष्ट्यें दोषरूप खचितच नाहींत. उदारतेमुळें हिंदु धर्माला पुष्कळ सहन करावें लागलें असें म्हणणारे लोक हिंदु धर्माच्या मूळावरच कुठाराघात करतात.

अजूनहि ती घंटा वाजत आहे आणि आरतीची वेळ अजून ओसरली नाहीं असें आळशी लोकांना सांगून मानवकुडीचें सार्थक करण्यासाठीं त्यांच्या विनवण्या करीत आहे.

आणि त्या बालिका जणुं काय आपल्या भाग्याची परीक्षा करीत असा-व्यात त्याप्रमाणें, पळसाच्या पानांच्या मोठमोठ्या द्रोणांत फुलांमध्यें तुपाचे दिवे ठेवून त्यांना प्रवाहांत सोडून देत आहेत आणि ते द्रोणहि लगेच होडीप्रमाणें डोलत डोलत, स्वतःमध्यें असलेल्या ज्योतीचें महत्त्व जणुं ओळखून असावेत तसे डोलत, जीवनाची यात्रा सुरू करीत आहेत.

चालली! ती जीवनयात्रा निघाली! एकामागोमाग एक, एकामागोमाग एक, दिवे स्वतःचें भाग्य जीवन-प्रवाहांत सोडून देत आहेत. मनुष्य-जीवनांत व्यक्तींचें जें होतें तेंच येथें दिव्याचें देखील होतें. कुणी कुणी अभागी यात्रेच्या प्रारंभींच वाऱ्याला शरण जातात आणि चौफेर विषाद पसरवतात. कित्येक मोठी आशा दाखवून निराशा करतात. कांहीं सदाच्याच दुखणेकऱ्यांप्रमाणें टिमटिमत टिमटिमत दूरवर पोहोंचतात; कधीं कधीं दोन द्रोण जवळ जवळ येऊन एकमेकांना बिलगतात आणि मग ही जोडगोळी दंपतीप्रमाणें दूर-दूरचा प्रवास करते. त्यांना गोल गोल फिरतांना पाहून मनांत प्रकट होणारे भाव व्यक्त करणें कठीण आहे. कित्येक जण तर त्यांची जीवनज्योति मालवण्याच्या आधींच दृष्टिआड होतात. मृत्यु आणि अदृष्ट हे मनुष्यजीवनांतले अंतिम अध्याय आहेत. या दोघांपुढें कुणाचेंच कांहीं चालत नाहीं आणि म्हणूनच माणसाला ईश्वराचें स्मरण होतें. मरण नसतें तर कदाचित् हें स्मरणहि झालें नसतें.

हिंमत असेल तर एखाद्या दिवशीं पहांटे चार वाजतां उठून या घाटावर येऊन बसा. वेगळ्याच प्रकारचे भक्त तुम्हांला येथें आढळतील. तीन वाजल्यापासून सूर्योदय होईपर्यंत विशिष्ट प्रकारचे लोकच येथें येणार. वाजिनीवती उषा सूर्यनारायणाला जन्म देते आणि लगेच व्यवहारी दुनिया या घाटाचा कब्जा घेते. तसें होण्यापूर्वीच आपण येथून पाय काढलेला बरा!

मार्च १९३६

# नागीण नदी तीस्ता

६

काहीं वर्षांपूर्वीं दार्जिलिंग – कालिंगपांगच्या बाजूस गेलों असतांना तीस्ता नदीचें प्रथम दर्शन घडलें होतें. प्रथमदर्शनींच तिच्याबद्दल असाधारण प्रेम वाटूं लागलें. जर तीस्तेविषयीं कांहीं पौराणिक कथा किंवा माहात्म्य मला ठाऊक असतें तर तिच्याबद्दल मनांत भक्ति उत्पन्न झाली असती. परंतु ही तुफानी नदी हिमालयाच्या पहाडांमधून मार्ग काढीत, खडकांशीं टक्कर देत, प्रवाहांत पडलेल्या लहानमोठ्या दगडांचें मंथन करीत आणि विविध प्रकारच्या गर्जना करीत जेव्हां धांवत येते, तेव्हां तिचा उत्साह, तिचा दृढनिश्चय आणि अमर्ष पाहून तिच्याबद्दल भक्ति वाटण्याऐवजीं प्रेम व आदरच उत्पन्न होतात.

जेव्हां तीस्तेचें प्रथमदर्शन झालें, त्या वेळीं मनांत संकल्प उठला कीं या नदीचें पहाडी जीवन थोडें तरी पाहिलेंच पाहिजे.

जोरांत वहाणाऱ्या पहाडी नदीवर जे वेताचे किंवा दोरखंडाचे पूल बांधलेले असतात, त्यांवर उभे राहून प्रवाहाकडे पहातांना एक विचित्र अनुभव येतो. वाटतें कीं हा पूल नदीच्या प्रवाहाशीं सामना करीत वरच्या दिशेनें जोरांत धांवत चालला आहे. जितका अधिक वेळ आपण ध्यानपूर्वक पहावें, तितकी ही प्रतीप-गामी भ्रांति वाढतच जाते.

एके दिवशीं मीं मनांत म्हटलें कीं, याला आपण भ्रांति कां मानावें ? ही एक प्रकारची दीक्षा आहे. या अनुभवाच्या द्वारां निसर्ग आपणांला सांगतो, " जितक्या बेपर्वाईनें हें पाणी पहाडांतून येऊन मैदानाकडे धांवत आहे आणि सागराचा शोध घेत आहे, तितक्याच बेपर्वाईनें आणि अदम्य कुतूहलानें या प्रवाहाच्या किनाऱ्या-किनाऱ्यानें सगळे धोके पत्करून वरच्या दिशेनें जा व या नदीचें उगम-स्थान शोधून काढा. "

जेव्हां एखादी पहाडी नदी सरोवरांतून उगम पावते, तेव्हां तिला सर-यू किंवा सरो-जा म्हणतात. जेव्हां पर्वत-शिखरांच्या कुशींत जमा झालेल्या हिमराशींतून तिचा जन्म होतो तेव्हां तिला हैमवती म्हटलें पाहिजे. एरवीं पर्वतांतून उगम पावणाऱ्या सर्व नद्यांचें सामान्य नांव पार्वती आहेच. जन्मदात्या हिमालयाच्या या सर्व मुलींचीं नांवें जर एकत्र केलीं तर त्यांची संख्या हजारांनीं भरेल.

तीस्तेचें मूळ नांव त्रिस्रोता आहे. उत्तर-पूर्व आफ्रिकेंत नील नदीचे दोन वेगवेगळे उगम आहेत आणि दोन्ही प्रवाह दूरदूरच्या दोन सरोवरांतूनच निघतात – धवलरंगी नील व नीलरंगी नील. दोघांच्या संगमानें मिश्र देशाची माता नील नदी बनते. त्याचप्रमाणें तीस्ता देखील तीन स्रोतांच्या संगमानें बनली आहे. एका स्रोताचें नांव आहे 'लाचुंग चू'. (चू म्हणजे नदी.) ही नदी 'कान् चेन झौंगा' (कांचनगंगा) शिखराच्या दक्षिणेकडून उगम पावते. दुसऱ्या स्रोताचें नांव आहे 'लाचेन् चू'. ही नदी पाव हुन् री शिखराच्या उत्तरेकडून उगम पावून, चो ल्हामो व गोरडामा या दोन सरोवरांचें पाणी घेऊन मार्ग काढीत काढीत प्रथम पश्चिमेकडे वहाते व मग हळूहळू दक्षिणेकडे वळते. या दोघींचा जेथें संगम होतो तेथें चुंग थांगचें बौद्धमंदिर आहे. लाचून् चू व लाचेन चू या दोन नद्यांच्या संगमानें जी नदी बनते, तिला पंचहिमाकर (कान् चेन् झौंगा), सीम् व्हो व सिनो लोचू या तीन गगनभेदी शिखरांच्या कुशींतील हिमराशींचें पाणी घेऊन येणारी ताल्लुंग चू येऊन मिळते, तेव्हां हे तीन स्रोत. मिळून तीस्ता बनते. आणि मग ती सरळ दक्षिणेकडे वाहूं लागते. थोडें पुढें गेल्यावर तिला उजवीकडून व डावीकडून अनेक लहानमोठ्या नद्या येऊन मिळतात. त्यांपैकीं दिक् चू, रोरो चू, रोंगनी चू, रंगपो चू व मोठी रंगीत चू या महत्त्वाच्या होत.

जेथें जेथें दोन नद्यांचा संगम होतो, तेथें तेथें एखादें बौद्धमंदिर आढळायचेंच. अशा मंदिराला येथले लोक गोम्पा म्हणतात.

तीस्तेच्या आकर्षणानें जेव्हां सर्वप्रथम मीं या पहाडांत प्रवेश केला होता, त्या वेळीं रंगीत नदीचा संगम व रंगपो नदीचा संगम मीं पाहिला होत. संगमाच्या दोन्ही प्रवाहांचे रंग येथें वेगवेगळाले आहेत. या खेपेस हे दोन संगम तर डोळे भरून पाहिलेच, त्याशिवाय सिक्कीमची राजधानी गंगटोकच्या पूर्वेकडील नदी रोरो चू व रोंगनी चू नदीचा संगम सुद्धां मीं सिंगटंगमध्यें पाहिला. संगम म्हणजे जिवंत काव्य!

महान् विजय प्राप्त करण्यासाठीं अनेक राजांच्या सेना जशा एकत्रित होतात व त्यांची संकल्प-शक्ति वाढते, त्याचप्रमाणें या सर्व नद्यांच्या जल-भारानें तीस्ता नदी जलवती, वेगवती व संकल्पशालिनी बनते आणि पहाडांशीं लढत लढत मैदानांत येऊन पोहोंचते. येथें ती शिलीगुडीला न जातां जलपाय-गुडीच्या रस्त्यानें पाकिस्तानांत प्रवेश करते व रंगपूरचें दर्शन घेऊन शेवटीं ब्रह्मपुत्र नदाला जाऊन मिळते.

आपल्या पूर्वजांनीं नद्यांचे दोन भाग केले आहेत. जेव्हां एखादी नदी अनेक नद्यांचें पाणी घेऊन पुष्ट बनते, तेव्हां तिला युक्तवेणी म्हणतात. गोरी गंगा, सांवळी यमुना व ‘ मध्ये गुप्ता ’ सरस्वती मिळून प्रयागराजापाशीं त्रिवेणी बनते. पंजाबमध्यें सिंधु सात नद्यांच्या प्रवाहांनीं युक्तवेणी बनते. पुढें जेव्हां ती नदी स्वतः अनेक प्रवाहांत विभक्त होते आणि समुद्राला जाऊन मिळते, तेव्हां तिला मुक्तवेणी म्हणतात. नद्यांचे आपण एका वेगळ्या तऱ्हेनें सुद्धां दोन विभाग करूं शकतों. पहाडांतील बद्ध जीवन आणि मैदानांतील मुक्त जीवन. गंगानदीचें पार्वत-जीवन हरद्वारपाशीं समाप्त होतें. त्यानंतर जेथें मजबूत जमीन सांपडली तेथें तिचा प्रवाह एका धारेंत वाहूं लागतो; परंतु जेथें भूमि बंगालसारखी दगड नसलेली व समतल असते, तेथें तिच्या अनेक धारा सुद्धां होतात. नदीच्या पार्वत-जीवनाला कुमारिकेचें अल्लड जीवन म्हणतां येईल. मैदानांत पोहोंचतांच अनेक शेता-मळ्यांना स्तन्यपान करतां करतां ती प्रजांची माता बनते. दार्जिलिंग व कालिंगपोंगच्या पहाडांमधून बाहेर पडल्यावर तीस्तेला फक्त एकदोन बंधनेंच सहन करावीं लागतात आणि तीं म्हणजे — आसामकडे जाणाऱ्या रेल्वेच्या पुलाचीं. एक आहे भारतानें नवीनच बांधलेला आसामलिंकचा पूल व दुसरा आहे आम्हींच बांधलेला पण पाकिस्तानच्या हातीं गेलेला रंगपूरजवळील दुसरा पूल.

तीस्ता नदीचें मैदानी जीवन कांहींसें विचित्र आहे. तिबेटांतील बहुपति-प्रथेचें बहुधा तिला स्मरण असावें. एके काळीं तीस्ता नदी गंगेला मिळत होती. या शंभर-दोनशें वर्षांत तिनें अनेक पराक्रम केले आहेत व तेथल्या लोकांकडून ‘पागला’ नामाभिधानहि प्राप्त करून घेतलें आहे. आज सुद्धां तिचा एक प्रवाह छोटी तीस्ता या नांवानें ओळखला जातो. दुसरा प्रवाह आहे वूढी तीस्ता आणि तिसरा आहे मरा तीस्ता. तिनें आपला जलभार करतोया नदीला देऊन

पाहिला, घाघातलाहि अर्पण केला. मैदानांत ती युक्तवेणीहि बनते, मुक्तवेणीहि. तीस्ताचा चंचल स्वभाव ओळखून तिचा अनुनय करणें माणसाला तितकेंसें सोपें नाहीं. ती इतकीं कांहीं स्थलांतरें करते कीं, तिच्या अनेक प्रवाहांना स्थायी नांव देणें व तीं सर्व लक्षांत ठेवणें सुद्धां कठीण आहे. 'कालिकापुराणां'त तीस्तेचा उल्लेख आहे असें म्हणतात. तेथें अशी कथा आहे कीं, देवी पार्वती कुणा एका असुराशीं लढत होती. त्या उद्दाम असुराचें म्हणणें होतें कीं, "मी शंकराची उपासना करीन, पार्वतीची करणार नाहीं." पार्वतीचें व त्या असुराचें घोर युद्ध जुंपलें. लढतां लढतां त्या असुराला फार तहान लागली. त्यानें शंकराची प्रार्थना केली कीं, "प्रभो माझी तहान भागवा!" आणि काय आश्चर्य! प्रार्थना शिवाच्या चरणांपाशीं रुजू होतांच पार्वतीच्या स्तनांतून स्तन्यधारा वाहूं लागली. तीच आपली तीस्ता होय. असें सांगतात कीं, असुरेश्वराची तृष्णा शमवण्याचें काम या नदीनें केलें म्हणून तिचें नांव पडलें तृष्णा आणि तृष्णेचेंच प्राकृत रूप आहे तीस्ता. नदीला कुणी तृष्णा कसें काय म्हणूं शकेल, हें कांहीं आपल्या ध्यानांत येत नाहीं. शिवाय 'तृष्णा'चें 'तण्हा' होऊं शकतें. परंतु णकाराचा अजिबात लोप होऊन जाणें कांहीं योग्य वाटत नाहीं.

कसेंहि असो, तीस्तेचा जीवनक्रम सुरुवातीपासून शेवटपर्यंत आकर्षक व संस्मरणीय आहे. पहाडांत जेथें या नद्या वहातात तेथें ऊष्मा बराच असतो. त्यामुळें मलेरियाचे मच्छरहि पुष्कळ असतात. कदाचित् याच कारणामुळें तीस्तेच्या नांवाचें एकहि लोकगीत सांपडत नसावें.

परंतु आतां आपण विज्ञान-युगांत प्रवेश केला आहे. मलेरियाच्या मच्छरांवर इलाज होऊं शकतो. जेथें नदी जोरानें वहाते तेथें तिच्यावर यंत्राचें जीन कसून तिच्याकडून भरपूर कामहि करून घेतां येणें शक्य आहे. तीस्तेचा उगम अंदाजें पांच-सात हजार फूट उंचीवर असावा. जेव्हां ती डोंगराळ प्रदेश सोडते, तेव्हां तिची उंची समुद्रसपाटीपासून फक्त सातशें फूट असते. पहातां पहातां जी नदी सहा हजार फुटांची उंची उतरून येते, तिच्याकडून हवीं तीं कामें करवून घेणें शक्य आहे. करवतीनें लांकडें कापणें व जात्यावर पीठ दळणें हीं कामें तर या नद्या करीतच असतात. यापुढें यांच्यांकडून वीज उत्पन्न करण्याचें मोठें काम घेतलें जाईल. मग तर साऱ्या सिक्कीम राज्याचा नूरच पार बदलून जाईल.

 

आपल्यां धर्मप्राण पूर्वजांची यंत्रबुद्धि देखील धर्मकार्यांतच चालत असे. एके ठिकाणीं आम्हीं पाहिलें कीं, पहाडाच्या प्रवाहासमोर एक चक्र ठेवून त्याच्या द्वारा 'ओम् मणिपद्मे हुं' हा जप ज्याच्यावर कोरला आहे अशी एक लांकडाची मोठी नळी गोल फिरवली जाते. आणि अशा प्रकारें जो यांत्रिक जप होतो, त्याचें पुण्य यंत्राच्या मालकाला मिळतें.

माझ्या मतें अशा पुण्याचा मोठा वांटा नदीलाच मिळाला पाहिजे.

७-१०-५६

# देलवाड्याची धार्मिक कला

७

आपण देलवाड्याचे* फोटो घेत आहांत हें ऐकून आनंद वाटला. प्रतिबिंबावरून फोटो घेण्याची कल्पना मजेदार आहे. फोटो पातळ फिल्मवर घेतला असेल तर ठीक. नाहीं तर उलट येईल. कपड्यांची तऱ्हा त्यांत उलटी दिसेल. दोन आरशांचा उपयोग करून उलटें प्रतिबिंब सुलटें केल्यास चालण्यासारखें आहे; पण दोन आरसे पुष्कळसा प्रकाश खाऊन टाकतात व त्यामुळें फोटो अंधुक निघतो. जेथें डाव्या-उजव्याचा प्रश्न नसेल, तेथें प्रतिबिंबाची युक्ति उत्तम आहे.

लाहोर म्युझियमनें ‘ स्टोरी ऑफ बुद्ध इन् स्टोन ’ नांवाचें एक लहानसें चोपडें प्रसिद्ध केलें आहे. बुद्धाच्या जीवनांतील निरनिराळ्या प्रसंगांचे कोरलेल्या शिल्पकामाचे नमुने जीवनक्रमानुसार त्यांत सांपडतात. विजयनगर-हम्पी येथील एका देवळांत रामायणांतील प्रसंग अनुक्रमानें दाखविले आहेत. देलवाडा येथें ओसरीच्या छतावर किती तरी पौराणिक प्रसंग कोरलेले आहेत. उभ्यानें पहातां पहातां मान दुखली, म्हणून जमिनीवर उताणा पडून सगळें पाहून घेतलें व मुलाप्रमाणें तसाच सरकत सगळी ओसरी मी पुरी केली होती. या सर्व चित्रांचे जर स्वस्त फोटो मिळूं शकतील, तर मुलांवर संस्कार करण्यासाठीं एक चांगली चित्रमंजूषा तयार होऊं शकेल. चित्रागणिक प्रसंगाचा आणि चित्रांचा सोप्या भाषेंत परिचय दिला कीं पुरे. देलवाड्याच्या मंदिरांचीं दोन शिखरें दोन प्रकारचीं आहेत. दुरून जर पाहिलें तर एकांत मर्दानी ओज ( Masculine Strength ) दिसतें, तर दुसऱ्यांत जनानी नाजुकपणाचें लावण्य ( Feminine Grace )

---

* ‘ देलवाडा ’ गुजरात व राजपुताना यांच्यामध्यें असलेल्या अबूच्या पहाडावर आहे. तिथें जैन स्थापत्याची परिसीमा झाली आहे असें म्हणतां येईल. प्रधान वस्तुपाल आणि सेनापति तेजपाल यांनीं तीं बांधवलीं.

आढळते. तुमच्याहि लक्षांत हें आलेंच असेल. ‘अबू’ पर्वताचा सारा प्रदेश देवभूमीसारखा भासतो. ‘गुरुशिखरा’चें पवित्र आध्यात्मिक वातावरण, ‘अचलगड’चीं ऐतिहासिक संस्मरणें, देलवाड्याची श्रद्धाभक्ति, अर्बुदा देवीची एकान्त उपासना, नखी तलावाचें गंधर्व-राज्य, त्याच्या आसपासची वन्य शोभा आणि वसिष्ठ आश्रमांतील तपोभूमि — सारेंच कसें मोठें रमणीय आहे! अबू रोड स्टेशनपासून ज्या मोटारच्या रस्त्यानें आपण वर जातों, तो खरें पाहतां मागच्या बाजूचा रस्ता आहे. पुढच्या बाजूचा रस्ता नखी तलावाचें जास्तीचें पाणी ज्या दिशेला वहातें, त्या दिशेला आहे.

अबूमध्यें मी खूप भटकलों आहें. तेथें मीं खूप पाहिलें आहे. पहातांना व भटकतांना भावना खूप उचंबळल्या आहेत! इतका भटकलों, इतकें पाहिलें कीं तें सारें लिहूं म्हणेन तर थकून जायला होईल.

या वेळचें तुमचें पत्र नेहमींच्या पत्रापेक्षां वैशिष्ट्यपूर्ण आहे. अबूमधें तुम्हांला विशेष आल्हाद आणि शांति मिळाली असें तुमच्या पत्रांवरून वाटतें. हीं मंदिरें बांधणाऱ्याच्या भक्तीविषयीं तुम्ही जें लिहिलें आहे, तें यथार्थ आहे. ताजमहालचें वातावरण निराळें व देलवाड्याचें निराळें. ताजमहालबद्दल माझ्या मनांत फार कदर आहे. अनेक प्रकारें मीं त्याचें कौतुक केलें आहे. परंतु त्याच्यामागची वेठ आणि जबरदस्तीची साम्राज्यसत्ता मी विसरूं शकत नाहीं. उलट देलवाड्याच्या सांघिक कलाकुसरीच्या मागें धर्मभाव व धर्मप्रेम स्पष्ट दिसून येतें. ताजमहालमध्ये अमीरी साधेपणा आहे. देलवाड्यांत धर्मपरायण संघाची बंधुभावना आणि सहकारमय स्वात्मार्पण-आत्मनिवेदनाचा उद्रेक विशेष आहे. ताजमहालच्या पाठीशीं एकट्या अद्भुत कलाधराची सृजनशक्ति दिसते, तर देलवाड्यांत अनेक कलाधरांचा मधमाशांसारखा एकराग प्रतीत होतो. अजिंठ्यांतहि हीच वस्तुस्थिति आहे. देलवाड्यांत साधन-संपत्ति जास्त आहे. पण अजिंठ्याचें सारें काम जणूं काय पूर्वाश्रमींच्या कलाधरांनीं स्वेच्छया आपली कलाशक्ति धर्मजीवनाच्या चरणीं अर्पण करण्यासाठीं अंगिकारलें असावें असें वाटतें. वेरूळचें वातावरण या दोहोंपेक्षां कांहीं अंशीं निराळें आहे. लोकोत्तर शक्ति आणि पराक्रम यांची प्रचीति तेथें येते. देलवाड्यांत प्रत्येक कलाधरानें आपलें शक्तिसर्वस्व ओतण्याचा संकल्प केलेला दिसतो. कोणाला

किती वेतन द्यावें व कोणी किती घ्यावें हा विचारहि त्यांच्या मनांत आलेला दिसत नाहीं.

शिवाजी महाराजांविषयींची एक दंतकथा मीं लहानपणीं ऐकली होती. ती आहे दंतकथाच, पण तिच्यांत अद्भुत बोध भरला आहे. किल्ले बांधण्यासाठीं जमलेल्या कारागिरांना शिवाजी राजे रोज मजुरी म्हणून दर सायंकाळीं एकेक गवताची काडी स्वतः देत असत. ज्यानें दिवसभर आपलें चित्तसर्वस्व ओतून काम केलें असेल त्याची काडी रातोरात सोन्याची होई. ज्याची एकाग्रता नसेल त्याची चांदीची होई. सामान्य माणसाची तांब्याची आणि ज्यानें चित्तशाठ्य व श्रमशाठ्य केलें असेल त्याची काडी मात्र गवताचीच राही.

राजा सगळ्यांना सारखेंच देत होता. ज्यानें जितका आत्मा ओतला असेल तितकें त्याचें फळ आपोआप मिळे. अशा प्रकारच्या दंतकथा जनमनाला समजूं शकेल अशा सोप्या रीतीनें सामाजिक धर्मबोध करीत असतात.

देलवाड्यांत धर्मप्रेम व्यक्त होतें तर गुरुशिखरावर प्रत्यक्ष धार्मिकताच अजूनहि स्फुरण पावत असल्याचें जाणवतें. एक सायंकाळ, एक सबंध रात्र आणि दुसऱ्या दिवशींची सकाळ जर गुरुशिखरावर घालवाल तर त्याचा प्रत्यक्ष अनुभव तुम्हांला येईल. पण तेथील साधु आणि त्यांच्या गोष्टी मात्र विसरल्या पाहिजेत. देलवाड्याचीं मंदिरें बांधलीं जाण्यापूर्वी अनेक जैन साधूंनीं गुरुशिखरावर तप केलें असावें असें मला वाटतें. अचलगडावरील गोपीचंदाची गुहा तुम्ही पाहिली आहे काय? वैरागी राजाचें तें स्थान पहाण्यासारखें आहे.

देलवाड्याच्या भद्राकृतींकडे ( Symmetrical Geometrical designs ) माझें लक्ष वेधलें गेलें होतें. कांहीं सोप्या आकृत्या मीं कागदावर काढूनहि घेतल्या होत्या; पण अहमदाबाद ते अबू आणि अबू ते अहमदाबाद हा प्रवास पायींच केला होता. कपडे रोज हातानें धूत असें. एक दिवस कपड्याबरोबर तो कागदहि धुतला गेला व कागदावरच्या त्या कलाकृति पुसल्या गेल्या. मी कागदावर केवळ कल्पनाच काढल्या होत्या. अनेक नियमांपैकीं 'प्रत्येक मुलाला ड्रॉइंग आलेंच पाहिजे' असाहि एक नियम आमच्या लहानपणीं असता तर किती बरें झालें असतें. एखादें सुंदर दृश्य आज

मी जेव्हां पहातों, तेव्हां माझें हृदय व्यथित होतें; कारण मनाजोगें असें कांहींच मला काढतां येत नाहीं.

मंदिरें बांधवणाऱ्या लोकांच्या मूर्ति हत्तीवर असोत किंवा भित्तीवर असोत, त्यांची मुद्रा किती शांत व वीतराग दिसते!

# कामाक्षीच्या राज्यांत

८

## ( आसामचें एक दर्शन )

हिंदुस्थानच्या तांत्रिक त्रिकोणाचीं काश्मीर, केरळ आणि कामरूप हीं तीन टोंकें आहेत. आणि प्रकृतिमातेनें ह्या तीन्ही प्रांतांना अप्रतिम सौंदर्याची देणगी दिली आहे. ह्या तिहींत अधिक रमणीय कोण असें आज जर मला कोणी विचारलें तर त्याचें उत्तर देणें सोपें नाहीं. कामरूपचें अति प्राचीन नांव 'प्राग्ज्योतिष' असें होतें. आज तो 'असम' या नांवानें ओळखला जातो.

गंगा आणि ब्रह्मपुत्र यांच्या अनेकमुखी पंख्यामुळें सुंदरवनाचें सौंदर्य वाढलें आहे. त्याचें प्राचीन नांव 'समतत' असें होतें. 'समतत' म्हणजे सपाट भूमीचा प्रदेश. ह्याच्या उलट 'असम'! हिमालयापासून 'डफला' पर्वतापर्यंतच्या आणि दक्षिणेकडील चेरापुंजी ते 'गारो' पर्वतापर्यंतच्या साऱ्या प्रदेशांत जिकडे नजर टाकाल तिकडे डोंगरच डोंगर! ह्यामुळें कदाचित् ह्या प्रदेशास 'असम' हें नांव मिळालें असावें.

ज्या प्रदेशांतून ब्रह्मपुत्र वाहतो त्याच्या दोन्ही तीरांवर लागवडीलायक जी जमीन आहे त्या भूभागावरच असमची वस्ती आहे. 'ब्रह्मपुत्र'च आसामी लोकांचा मातापिता आहे. ईशान्येकडे 'सदिया'पासून, पश्चिमेकडे धुब्री अथवा 'ढुब्री'पर्यंत १५ अंशांच्या भागांत 'असम' प्रांत पसरला आहे.

ह्या प्रांतावर निसर्गाची अनन्यसाधारण कृपादृष्टि आहे असें एका दृष्टीनें म्हणतां येईल. सर्वांत मोठी आणि लांब नदी ह्या प्रांतांतून वहाते. ह्या नदींतून वाहून येणारा गाळ आणि पर्वतावरील वृक्षांच्या पानांचें खत विचारांत

घेतलें तर येथल्यासारखी सुपीक जमीन कोठेंच आढळायची नाहीं. केरोसिन आणि दगडी कोळशाच्या खाणी शेजारीं शेजारीं जर कोठें सांपडत असतील तर त्या येथेंच. वनसमृद्धि आणि खनिज पदार्थांच्या बाबतींत तर हा प्रदेश असामान्य संपन्न आहे. भात, कापूस, बटाटे, भाजीपाला, चहा, नीळ — जी वस्तु आपण मागूं ती देण्याला येथली भूमि तयार ! येथलीं नारळी-पोफळींचीं झाडें पाहून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याची आठवण होते. मत्स्याहारी लोकांच्या दृष्टीनें हें नंदनवनच आहे. आणि फलाहारी लोक देखील हवें असल्यास आपलें सारें आयुष्य येथें सुखानें कंठूं शकतील.

कच्च्या मालाच्या बाबतींत हा प्रांत जितका श्रीमंत आहे तितकाच 'कच्च्या' लोकवस्तीच्या बाबतींतहि आहे. नागा, खसी, मिकीरी, गारो, मिटडी, आभोर, मिसमी आदि अनेक पर्वतीय आणि वन्य लोकांची वस्ती ह्या प्रांतांत अधिक आहे. कच्च्या मालाची किंमत तेच लोक करूं जाणे कीं ज्यांना त्यापासून पक्का माल करता येतो. त्याचप्रमाणें ह्या पहाडी वनौकसांची किंमत संस्कृति-धुरीणच करूं शकतील. इतिहासपूर्वकालीन मनुष्य-जातीचें अध्ययन करणाऱ्या नृ-वंश-शास्त्रज्ञांना अध्ययनाच्या दृष्टीनें 'असम' प्रांत चांगलें क्षेत्र आहे. समाज-शास्त्रज्ञांच्या दृष्टीनें ती एक अप्रतिम प्रयोगभूमि आहे. गोव्यांतले, कोकणांतले आणि केरळमधले थोडेसे साहसी लोक जर येथें येऊन राहिले आणि येथल्या लोकांत मिसळून गेले तर ह्या प्रांतांत एका नव्या युगाचा प्रारंभ होईल. कारण भात, सुपारी, नारळ, मासळी आणि केळीं ह्यांचा हा प्रांत आहे. पश्चिम भारतांत जी कांहीं कारागिरी आहे, जीवनकला आहे तिचा लाभ येथल्या लोकांना मिळाला तर त्यांना आपल्यांतील शक्तीचा साक्षात्कार करून घेतां येईल. येथल्या आरण्यकांना आपल्यांत घेतल्यानें असमिया लोकांची शक्ति कमींत कमी दसपट तर होईलच. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि निसर्गाशीं कसें झगडावें व जिवंत रहावें ही कला ह्या 'वनचरांना' जितकी अवगत आहे तितकी फारच थोड्या शहरी व ग्रामीण जनतेला असेल. पाद्री लोकांनीं ह्या लोकांवर आपला धर्म आणि आपली संस्कृति लादण्याचा बराच प्रयत्न केलेला आहे. ह्या प्रयत्नाच्या बुडाशीं कोणकोणते हेतु आणि आदर्श लपलेले आहेत तें सांगणें कठिण आहे. धर्माच्या नांवावर हे प्रचार करतील आणि वेळ आली म्हणजे आपल्या प्रचाराच्या योगें लष्करी फायदे करून घ्यावयालाहि ते मागेंपुढें पहाणार नाहींत.

त्यांच्या ओठीं आणि पोटीं धर्म-शास्त्र असलें तरी त्यांच्या मेंदूत आणि आच-णांत साम्राज्यवादी समाजशास्त्र भरलेलें असणार ! हिंदुस्थानाचें सामाजिक, आर्थिक आणि भाषिक ऐक्य नष्टभ्रष्ट करण्याच्या बाबतींत ह्या पाद्र्यांनीं चांगलेंच यश मिळविलें आहे. ' असम ' च्या इंग्रज सरकारनें ह्या अरण्यबंधूंच्या शिक्षणाचें सारें ' मिशन ' पाद्र्यांच्या हातीं सोपविलें आहे. इतकेंच नव्हे तर कोठें कोठें मिशनऱ्यांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाहि ह्या पर्वतीय प्रदेशांत जाऊं न देण्याचें धोरण अगदीं उघड चालविलें होतें. आज देखील ही नीति सोडली गेली नाहीं.

ह्या गिरिजनांत राहून त्यांची सेवा करणाऱ्या आणि आपलें भरण-पोषण करणाऱ्या मारवाडी लोकांची आपण जितकी कदर करतों त्यापेक्षां जास्त कदर त्यांची व्हायला हवी. इंग्रज लोक येथें येऊन जितका नफा मिळवितात तितका नफा ह्या बिचाऱ्या मारवाड्यांच्या स्वप्नींहि येत नसेल. पण मारवाड्यांना धन-लोभी आणि लुटारू म्हणण्याचा रिवाजच पडून गेला आहे. येथील सर्व प्रकारचे कष्ट अत्यंत समाधानानें सहन करणारे हे मारवाडी जर ह्या पर्वतीय लोकांत येऊन राहिले नसते तर या निसर्गाच्या लेकरांचें जीवन अशक्यप्राय झालें असतें, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

जेव्हांपासून येथें केरोसिनच्या आणि कोळशाच्या खाणी सांपडल्या आणि चहाचे मळे उठले तेव्हांपासून इंग्रज लोक निरनिराळ्या प्रान्तांतील मजुरांना येथें घेऊन आले. येथें येऊन ते लोक अत्यंत परिश्रमानें आपली गुजराण करतात; परंतु ते येथील मूळ रहिवाशांशीं अजून एकरूप होऊं शकलेले नाहींत. येथल्या लोकांशीं मिसळून जाणें तसें कांहीं फार कठीण नाहीं. असमिया लोक पिढ्या-नुपिढ्यांपासून शेतकरी आहेत. परंतु बंगालच्या मैमनसिंग जिल्ह्यांतील लाखों मुसलमान येथें जेव्हांपासून वस्तीला येऊं लागले तेव्हांपासून त्यांच्या जीवन-शक्तीसमोर हे लोक अगदीं फिके पडले आहेत. हे नवे लोक गुरें पाळतात, बटाटे पेरतात, भाजीपाला विकतात आणि येथल्या सुपीक जमिनींत हवी तेवढी अंगमेहनत करून लाखों रुपये कमावतात.

' नौगांव ' जिल्ह्यांत ह्या लोकांना वाटेल तेथें तळ ठोकण्याची परवानगी नाहीं. असमिया लोकांशीं तंटेबखेडे होऊं नयेत म्हणून सरकारनें ह्या जिल्ह्यांत एक सीमारेखा आंखून दिली आहे. तिच्या अलीकडील भागाला असमिया लोकच

शेती करूं शकतात. मैमनसिंगच्या मुसलमानांना येथें वाव नाहीं. सीमारेषेच्या असमिया भागांतील जमिनींची किंमत दर एकरीं जर ५० रु. असेल तर त्याच दर्ज्याच्या तितक्याच जमिनींची मुसलमान भागांत ५०० रुपयांपेक्षां अधिक किंमत आहे. ह्यावरून दोन्ही समाजांतील शक्तीचा बोध होऊं शकतो.

हिंदुस्थानचा ईशान्य कोपरा जेथें आहे तेथें एक छोटासा हिंदुस्थानच आपणांस आज पाह्यला मिळतो. 'डिग्बोई' आणि 'तिनसुखिया'च्या आसमंतांतील तेलाच्या आणि कोळशाच्या खाणी अहोरात्र चालू असतात. आणि आपल्या हिंदुस्थानच्या सगळ्या प्रांतांतले ३०।४० हजार लोक मिळून निढळाच्या घामानें इंग्रजी कंपन्यांच्या खिशांत नफ्याचे हजारों रुपये दररोज भरत असतात !!

प्राचीन काळीं मानवांनीं गाय, म्हैस, घोडा, गाढव, उंट, हत्ती यांच्याकडून काम करून घेण्याची आणि त्यांच्या मेहनतीवर जगण्याची विद्या प्राप्त करून घेतली होती. तर अर्वाचीन काळीं पाश्चात्य भांडवलदारांनीं आशिया आणि आफ्रिका खंडांतील जनतेला राबवून त्यांच्या मेहनतीवर जगण्याचें कसब शोधून काढलें आहे. पशूंकडून श्रम करवून घेण्याची संवय लागतांच मानवी स्वभावांत आणि मानवी जीवनांत मोठीच क्रांति घडून आली आहे. गुलामीची प्रथा, गिरमिटिया प्रथा, 'दूबळा' शेतकऱ्यांची पद्धति ( आत्तांपर्यंतहि गुजरातच्या सुरत जिल्ह्यांत होती ) आणि कारखान्यांत मजुरांकडून काम करवून घेण्याची प्रथा यांच्यामुळेंहि मनुष्यजीवनांत, त्याच्या सामाजिक आदर्शांत फारच मोठी घडामोड झाली आहे, व त्यामुळें वर्गविग्रह आणि समाजसत्तावादाचें तत्त्वज्ञान निर्माण झालें आहे.

पशुंकडून काम घेण्याची मानवांनीं जेव्हां सुरुवात केली असेल तेव्हां सिंह, लांडगे, हरिण, रानडुक्कर वगैरे प्राण्यांकडूनहि काम करवून घेण्याचा प्रयत्न झाला असेल. परंतु ह्या पशूंनीं इतक्या सफाईनें काम करण्याचें नाकारलें असेल कीं मनुष्यप्राण्यानें त्यांचें नांवच सोडून दिलें. "आम्ही मरूं परंतु तुमची गुलामी पत्करणार नाहीं" हेंच त्यांचें आव्हान असावें. तें त्यांनीं पूर्णपणें अमलांत आणलें. ह्या पशूंचा आणि मानव समाजाचा झगडा आजहि आघाड्यांवर रोज चालू आहे.

असम प्रान्तांत गाई आहेत, म्हशी आहेत, हरिणादि वन्य पशु आहेत आणि विशेष म्हणजे खड्गविषाण गेंडेहि येथें आहेत. गेंड्याकडून काम करवून घेण्याची कला मानव कधीं ना कधीं हस्तगत करील अशी माझी खात्री आहे. हत्ती हें हिंदुस्थानचें प्रतीक आहे. ब्रह्मदेशचा मोर, दक्षिण आफ्रिकेचा शहामृग तसें आसामचें प्रतीक म्हणजे हा गंभीरवेदी गेंडा !

आणि जर नव्या दृष्टीनें पहायचें म्हटलें तर गाईच्या बरोबरच आणखी एका प्राण्याचा विचार केला पाहिजे. गाईला पवित्र म्हणायचें तर हा प्राणीहि तितकाच पवित्र आहे. गाय मनुष्यजातीला जर अमोल आहार पुरवीत असेल तर हा प्राणीहि तितकाच महत्त्वाचा आहार तयार करून देतो. मनुष्याच्या सहवासामुळें गाय पाळीव आणि सौम्य बनली आहे तर हा प्राणीहि तितकाच पाळीव आणि सौम्य बनूं शकतो. असा हा प्राणी म्हणजे मधमाशी ! गाईला प्रेमानें वागविलें, निसर्गाच्या कोपापासून तिचें संरक्षण केलें, तिला योग्य खानपान घातलें तर ती अधिक दूध देते. त्याप्रमाणें मधमाशाहि मनुष्याची मदत मिळाली असतां मध बनविण्याची आपली शक्ति अनेक पटींनीं वाढवूं शकतात. आसाम प्रातांत जिकडे पहाल तिकडे असंख्य पुष्करणी, विहिरी, तळीं आणि सरोवरें दिसून येतात. त्यांत जीं असंख्य बरीवाईट फुलें उगवतात त्यांच्यांतलें अमृत टिपून टिपून त्यांचा मध बनविणाऱ्या मधमाशा असम प्रांतांत असंख्य आहेत. ह्या प्रान्तांतील मध दूर दूर जात असतो.

कामरूपचा इतिहास महाभारत-कालापासून सुरू होतो. महाभारतांत तेथल्या भगदत्त राजाचा आणि त्याच्या हत्तींचा उल्लेख आहे. अनेक राजांच्या कन्यांचें हरण करून त्यांना आपल्या अंतःपुरांत कोंडून ठेवणारा नरकासुर येथेंच राज्य करीत होता. श्रीकृष्णानें जेव्हां या देशावर स्वारी केली, त्या वेळीं सत्यभामेकडे धुरिणत्व होतें. याचें रहस्य काय ? श्रीकृष्णाच्या काळीं येथें स्त्री-राज्य होतें काय ? मध्य-पांडव अर्जुनाची चित्रांगदा ह्याच प्रांतांतली – मणिपूरची – होती ! कृष्णाच्या नातवाला देखील असें वाटलें कीं, आपल्यालाहि एखादी वधू मिळावी आणि तोहि बिचारा येथेंच येऊन फसला. अनिरुद्ध असून उषेच्या प्रेमांत तो 'रुद्ध' झाला ! द्वारकेच्या अनिरुद्धानें कामरूपच्या उषेशीं विवाहबद्ध होऊन हिंदुस्थानचीं दोन टोकें जोडून टाकलीं.

आपल्या पौराणिक काळीं पद्धीचे असे तीन भटके प्रवासी होऊन गेले. अमर वार्ताहर नारद, शीघ्रकोपी बलराम आणि क्षत्रिय ब्राह्मण परशुराम! दुर्वास, दत्तात्रेय, हनुमान वगैरे मंडळीहि कमी भटकी नव्हती. परंतु त्यांच्या तीर्थाटनाचा इतिहास उपलब्ध नाहीं. परशुरामानें पश्चिम किनाऱ्यावर एक मोठा यज्ञ केला आणि सारी भूमि ब्राह्मणांना देऊन टाकली. पण जेव्हां त्याला असें आढळून आलें कीं आपणांस रहायला देखील जागा उरली नाहीं तेव्हां त्यानें समुद्र हटवून स्वतःसाठीं थोडीशी भूमि तयार केली. ह्याच परशुरामाचें एक कुंड या प्रांतांत सदिया स्टेशनपासून पूर्वेकडे पन्नास मैलांवर आहे, येवढें समजल्यावर त्याचें दर्शन घेण्याची प्रबळ इच्छा कोणत्या आर्यहृदयाला होणार नाहीं? परंतु तेथें जाण्यासाठीं अनुकूल मुहूर्त हवापाण्याला विचारावा लागतो.

परशुरामकुंड अथवा ब्रह्मकुंड हें फारच आरोग्य-प्रद स्थळ आहे आणि तेथली नैसर्गिक सृष्टि देखील निसर्गप्रेमी मनुष्याला उन्माद चढविणारी आणि विलासी माणसाला प्रशम-शांति देणारी आहे. परशुरामाच्या काळीं आम्हां लोकांत निसर्गप्रेम, धर्मप्रचाराची वृत्ति आणि आपल्या सीमान्त प्रदेशांतून सैन्य-शिबिरें स्थापन करण्याची लष्करी दृष्टि होती. आज आम्ही निराशावादी, संकोचप्रिय आणि जडतेचे उपासक बनलों आहोंत. मग आम्हांला ह्या कुंडाचा पत्ता तरी कोठून लागणार? तसें असतें तर आम्हीं लोकांनीं पूर्वेकडच्या आणि पश्चिमेकडच्या सीमान्त प्रदेशांतून पराक्रमी, पुरुषार्थी आणि दीर्घदर्शी नवयुवकांचे मोठमोठे आश्रम नेहमींकरितां स्थापून ठेवले असते. एकटा चाणक्यच असा होऊन गेला कीं, ज्याला वायव्य सरहद्द संभाळण्याचें महत्त्व समजून आलें होतें. त्याच्या वंशजांनीं अटकेची 'अटक' निर्माण करून भारतीय विकासाला अटकाव केला.

असम प्रांताच्या सौंदर्य-समृद्धीची आणि तेथल्या भाग्यलक्ष्मीची कथा ही अशी आहे. पण त्याचबरोबर पक्षपाताचा आरोप टाळण्यासाठीं सृष्टिमातेनें आपला कोप ह्या भूमीवर प्रकट केला आहे त्याचेंहि थोडेसें वर्णन येथें करणें उचित आहे.

असम प्रांत भूकंपासाठीं प्रसिद्ध आहे. जणूं काय ही भूमि न मेलेल्या गयासुराच्या कलेवरावरच बसली आहे. भूमि जेव्हां मृत किंवा सुप्त झालेली नसते तेव्हां चलनवलन करण्याची तिला इच्छा होतच असते. असम प्रांतांत

आजवर इतके धरणीकंप झाले आहेत कीं त्यांचें वर्णन ऐकून मनापुढें एक प्रश्न उभा रहातो. जेथली जमीन वारंवार हादरे देते आणि ठिकठिकाणीं उत्पात करते तेथें एक तर भूकंपाचें वैज्ञानिक कारण शोधण्याचा प्रयत्न करण्यांत येतो; अथवा मनुष्य आपल्या कवि-कल्पना चालवून पौराणिक कथा रचत असतो. महाभारतादि प्राचीन ग्रंथांत भूकंपाचे उल्लेख आणि कथा आहेत तर जपान-सारख्या देशांत सिस्माग्राफीचा विचार होत असतो. परंतु असममध्यें ह्या दोन्ही गोष्टी नाहींत. ज्या प्रदेशांत वारंवार भूकंप होतात तेथले लोक एकतर तो प्रदेश सोडून तरी जातात किंवा जीवन क्षणभंगुर आहे असें मानून मृत्यूचें भय टाकून देतात. ते दोन्ही मार्ग स्वाभाविक आणि मनुष्योचित आहेत. परंतु दैववाद ही एक अशी विषारी वस्तु आहे कीं, ती मनुष्यास जड बनवून टाकते. 'नशीबवादी' समाज स्थानान्तर करणार नाहीं, नैसर्गिक शक्तीशीं संगर देणार नाहीं आणि पुरातन काळापासून चालत आलेल्या आपल्या जीवन-प्रणालींत कांहीं परिवर्तनहि करणार नाहीं. असममध्यें भूकंपविज्ञानशास्त्राचें कोठें नांवहि ऐकूं येत नाहीं. नदाला पूर येतो तो माणसें, घरें आणि गुरेंढोरें वाहून नेतो. लोक दुःखी होतात. पण ह्या सगळ्या आपत्तींचें रसाळ वर्णन करून आणि सगळें विसरून हे लोक 'जैसे थे' म्हणून आपली जीवनयात्रा चालवीत असतात.

असम प्रांतांतलें हवापाणी हवें तसें आल्हाददायक नाहीं. उंच उंच पर्वतावरील ठिकाणें त्याला अपवाद आहेत. लोकांतील जीवनशक्ति यामुळें फारच कमी आहे. असममधले सगळे डॉक्टर आणि आरोग्यमंत्री मिळून व्यक्तिगत आरोग्याच्या नव्हे तर सामाजिक आरोग्याच्या बाबतींत, तसेंच लोकांच्या रहाणींत, त्यांच्या आहार-विहारांत आणि गृहरचनेंत काय काय परिवर्तन करतां येण्यासारखें आहे ह्याचा जर विचार करतील तर सबंध प्रांताचा कायाकल्प होईल. पाण्याचा प्रश्न देखील कांहीं सरळ नाहीं. पर्वतीय लोकांना आणि शेतकऱ्यांना कमींतकमी खर्चांत जर शुद्ध पिण्याचें पाणी मिळूं लागलें तर केवळ असमच्या आरोग्यावरच नव्हे पण त्याच्या पुरुषार्थावरहि इष्ट आणि सखोल परिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं.

'आमच्या हातून कांहीं घडणार नाहीं' हा जो न्यूनगंड लोकांच्या मनांत खोल रुतून बसला आहे त्याच्या ऐवजीं 'आम्ही मनुष्य आहोंत, आणि

आम्ही सर्व कांहीं करू शकतों ' ही वृत्ति त्यांच्यांत निर्माण झाली पाहिजे. निसर्गावर विजय मिळविणें हें मनुष्याचें सर्वांत मोठें कार्य आहे. त्यानें विज्ञान व रसायन-शास्त्र ह्यांत संशोधन करून लहानमोठीं यंत्रें बनविलीं, प्रवासाचीं साधनें निर्माण केलीं, आहार वाढविण्याचे प्रयत्न केले; परंतु अद्याप नद्यांना ताब्यांत ठेवण्याच्या, मोठमोठ्या जंगलांत परिवर्तन करण्याच्या, वातावरणांत आणि पर्जन्यांत अनुकूल बदल घडवून आणण्याच्या, समुद्राच्या प्रवाहापासून फायदा करून घेण्याच्या, सूर्याच्या शक्तीपासून प्राणशक्ति वाढविण्याच्या व्यापक कार्यांना अजून त्यानें हात घातलेला दिसत नाहीं. हीं कामें मानवी शक्तीच्या पलीकडचीं नाहींत. असम प्रांताची समृद्धि इतकी विशाल आहे कीं तेथें साऱ्या विपत्तींवर इलाज करण्याचा 'मसाला' सांपडलाच पाहिजे.

असम प्रांताच्या सरकारनें मानवविज्ञानाचें ( anthropology ) एक खातें उघडून व त्यांत एतद्देशीय लोकांची नेमणूक करून नवे नवे शोध करविले पाहिजेत. दक्षिणेकडे आर्य आणि द्रविड लोकांच्या सान्निध्याची, संघर्षाची आणि संमिश्रणाची हकीगत सांपडते. सिंध, पंजाब आणि सीमान्त प्रदेशांत आर्य, सीथियन, पल्लव इत्यादि जातींच्या मूळ इतिहासाचा शोध आपण करूं शकतों. प्राचीन इतिहासाच्या दृष्टीनें असम प्रांतांत ब्रह्मदेश, चीन, तिबेट आदि देशांत ज्या अनेकविध जाती आहेत त्यांच्या जीवनसत्त्वांचा खूप सखोल अभ्यास व्हायला पाहिजे. आम्ही ज्यांना ॲबॉरिजीन ( मूळ निवासी ) म्हणूं लागलों आहोंत त्या सर्व जातींचा विचार श्रीकृष्णाच्या काळीं वैष्णव धर्माच्या प्रचार-कालांत हिंदुस्थानांत बराच झाला होता. बौद्ध कालांत त्यांच्यांत सेवाकार्यहि झालें असेलच. परंतु आजकाल आम्ही लोकांनीं अध्ययन आणि सेवेचा मक्ता परदेशीयांकडे सोपविला आहे !

आणि आतां चिनी लोकांचें विश्वविद्यालय समुद्रकिनारा सोडून असमच्या सरहद्दीपासून शंभर मैलांवर येऊन वसलें आहे. डोंगरी रस्ते, मोटारी आणि विमानें ह्यांच्या द्वारा चीनशीं आमचा संपर्क बराच वाढणार आहे. असें झालें कीं आमच्या ईशान्य सीमान्त पहाडी जातींचें वर्णन आणि त्यांच्याविषयींचीं सूक्ष्म माहिती आम्हांला चिनी प्राध्यापकांकडून घ्यावी व शिकावी न लागो म्हणजे झालें !

( ऑक्टोबर १९३९ )

# अवन्तीची क्षिप्रा

१

भूगोलाच्या दृष्टीनें ज्या नदीला कांहीं महत्त्व असूं शकत नाहीं अशी नदी कधीं कधीं इतिहासांत चांगलें स्थान मिळवते व आपल्या आदरयुक्त स्मरणाला पात्र ठरते. महाराष्ट्राची इन्द्रायणीच घ्या. लोणावळ्याजवळ डोंगरांत उगम पावून देहू-आळंदीच्या मार्गें ती शेवटीं भीमेस जावून मिळते. भीमा आपल्या चंद्राकार वळणामुळें चंद्रभागा बनून कृष्णेंत उडी घेते. आणि कृष्णा अशाच अनेकानेक नद्यांचा जलभार घेऊन महाराष्ट्र व आंध्र पालथे घालीत आणि मनुष्य व पशुपक्षी यांचें कल्याण करीत पूर्व-समुद्राला आपलें जीवन-सर्वस्व अर्पण करते. कुठें सागरकामिनी कृष्णा आणि कुठें छोटीशी इंद्रायणी! परंतु तुकाराम-ज्ञानेश्वरांसारख्या लोकोत्तर संतांच्या सान्निध्यामुळें ही नदी इतिहास-प्रसिद्ध झाली आहे. तिची पावनता निर्विवादपणें कबूल करण्यांत येते.

अशीच एक छोटीशी नदी माळव्यांत पुराण-विश्रुत, इतिहासप्रसिद्ध व काव्यगीतांचा विषय बनली आहे. तिचें नांव आहे सिप्रा, शिप्रा किंवा क्षिप्रा. कोण जाणें कोणत्या ऋषीकडून तिला हें नांव मिळालें. आपले पुराणकार कोणतेंहि नांव संस्कृतव्युत्पन्न बनविण्यांत मोठे पटाईत आहेत. नव्हे तर तें नांव सिद्ध करण्यासाठीं एखादी वेडी-वाकडी आख्यायिकाहि बनविण्यास ते मागेंपुढें पहात नाहींत. शिप्रा नांवांतील शि, प व र हीं तीन अक्षरें घेऊन त्यांनीं सांगितलें कीं, शिवशंकरानें पाडलेल्या, वाहवलेल्या रक्तापासून बनलेली नदी ती शिप्रा. भगवान् विष्णूच्या बोटांत आपल्या त्रिशुळानें शंकरानें छेद केला

आणि बोटांतून निघणाऱ्या रक्ताच्या धारेपुढें आपला कमंडलू धरला. कमंडलू भरून वाहूं लागला. तीच शिप्रा नदी होय. मला तरी ही कथा मुळींच आवडली नाहीं. आपण महाराष्ट्रियांनीं शिप्राचें केव्हांच क्षिप्रा करून टाकलें आहे. मला हेंच नांव चांगलें वाटतें. क्षिप्रा म्हणजे वेगानें धांवणारी. नर्मदा नदीचें खरें नांव आहे रेवा. ती नर्म म्हणजे आनंद देते म्हणून तिचें गुणगान करण्याच्या निमित्तानें नर्मदा नांव मागाहून प्रचलित झालें. रेवाचा अर्थ आहे उड्या मारणारी. जिच्या प्रवाहांत अनेक लहान-मोठे धबधबे आहेत तिला रेवाच म्हटलें पाहिजे. त्याचप्रमाणें जी पर्वतांतून द्रुतगतीनें धांवत येते तिला क्षिप्रा हें नांवच साजेसें आहे. कसेंहि असो, पुराणांत व काव्यांत क्षिप्रा नांव आढळत नाहीं, सिप्रा किंवा शिप्रा नांवच सांपडतें.

या नदीचें कितीहि वर्णन केलें तरी पुराणकार आणि कवि कधीं थकत नाहींत. तपस्या, ज्ञानोपासना, रसिकता आणि विलासिता – मनुष्यजीवनाच्या या सर्व अंगांचा उत्कर्ष या नदीच्या किनाऱ्यावर झाला आहे. हिरण्यकशिपूचा मुलगा भक्त प्रह्लाद याची गोष्ट आपण सोडून देऊं. श्रीकृष्ण व त्यांचे थोरले बंधू बलराम दोघांनींहि जोपर्यन्त वसुदेव-देवकी दास्यमुक्त होत नाहींत तोंपर्यन्त अध्ययनाचा विचार करण्याचें नाकारलें होतें. पितृऋणांतून अशा प्रकारें मुक्त होतांच त्यांनीं मथुरा-वृंदावन सोडून उज्जयिनीला जाऊन सांदीपनि ऋषींच्या आश्रमांत विद्याभ्यास करण्याचा निश्चय केला. आज देखील सांदीपनि ऋषींचा आश्रम उज्जयिनीजवळ क्षिप्रा नदीच्या कांठीं दाखविला जातो. नदीचें दर्शन करतांच कृष्ण, सुदामा वगैरे ब्रह्मचारी येथें पाण्यांत कसे आंघोळ करीत असतील, पोहत असतील, आणि एकमेकांच्या तोंडावर पाण्याचा मारा करून एकमेकाला कसे गुदमरून टाकीत असतील याचें सारें चित्र अन्तःचक्षूंसमोर उभें रहातें.

जेव्हां मीं पहिल्यांदा इन्दूरहून ऊज्जैनला गेलों होतों, त्या वेळीं शिप्रेचें दर्शन महाकालेश्वराच्या मंदिरापाशींच सर्वप्रथम घडलें होतें. सुभगसलिला शिप्रा क्षीण-स्रोता बनली होती. भारतांतील विख्यात अशा द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं महाकालेश्वर एक आहे, त्यामुळें असंख्य यात्रेकरू येथें येतच असतात. शिवाय कुंभमेळ्याच्या चार स्थानांमध्यें उज्जयिनीचाहि समावेश होत असल्याकारणामुळें साऱ्या भारतांतून असंख्य साधू येथें येतात. क्षिप्रा नदीचें स्वतःचें असें माहात्म्य

नसतें तरी देखील भारतांतील लक्षावधि संत-महंतांच्या व भक्तांच्या स्नान-पान-दानानें या नदीला अपूर्व माहात्म्य लाभलें असतें.

अत्यंत भक्तिभावानें शिप्रेला प्रणाम करून आम्ही महाकालाचें दर्शन घेतलें होतें. परंतु शिप्रेची विशेष आठवण मनांत राहिली ती उज्जैनजवळील कालियादहामुळें. नैसर्गिक सौंदर्य आणि पुरुषार्थी राजांची विलासिता या दुहेरी कारणांमुळें हें स्थान आकर्षक बनलें आहे. असें सांगतात कीं, पुराणांत या स्थानाला ब्रह्मकुण्ड म्हणत असत आणि एक सूर्यमंदिरहि येथें बांधलेलें होतें. कुणा एका विलासी राजानें तें मंदिर तोडून त्याचे दगड नदीवर पूल बांधण्याच्या कामीं वापरलें आणि येथें एक विलासगृह बांधलें.

खरी गोष्ट ही आहे कीं, येथें नदीचा एक प्रवाह दुभंग पावून बऱ्याच दूरपर्यन्त दोन धारांनीं वाहतो आणि पुन्हां या दोन धारा एकत्रित येऊन पुढें वाहूं लागतात. हीच या दोन धारांमधील बेटाची नैसर्गिक शोभा आहे. या बेटावर आनंदांत रहाण्यासाठीं बादशहानें दोन महाल बांधले. इतके उंच कीं, वर चढल्यावर साऱ्या बेटाची, आसपासच्या प्रदेशाची व नदीच्या दोन्ही धारांची शोभा पाहून दृष्टि निवून जाते.

बादशहांचें एवढ्यानें समाधान झालें नाहीं. त्यांनीं पुलाखालून वाहणाऱ्या धारेला मोठमोठ्या दगडांच्या अनेक कुंडांत सांठवलें आणि मग पुढें वाहूं दिलें. कुंडांपाशीं बसण्यासाठीं चांगले चांगले मंडप बनवले, जेथें उन्हाळ्याच्या दिवसांत दुपारीं सुद्धां चांगला गारवा मिळावा. या कुंडांत बादशहा व त्यांच्या बेगमा दुपारीं येऊन स्नान करीत आणि हंसत-खेळत आसपासच्या उष्म्याला विसरून जात.

असें सांगतात कीं, कुणा बादशहानें आपली विलास-शक्ति वाढविण्यासाठीं पाऱ्याचें एक औषध घेतलें. त्यामुळें त्याच्या शरीराची फार आग होऊं लागली. तिच्यावर उपाय म्हणून तो या कुंडांत तासन् तास झोंपून राही. एके दिवशीं राजा या कुंडांत बेशुद्ध होऊन पडला असतां एका नोकरानें धावरून जाऊन त्याच्या शरीराला कुंडांतून बाहेर काढलें. राजा शुद्धीवर आला तेव्हां नोकरावर फार रागावला आणि राजाच्या शरीराला स्पर्श करण्याच्या अपराधाबद्दल दोन्ही हात कापून टाकण्याची शिक्षा त्यानें नोकराला सुनावली. त्यानंतर पुढें जेव्हां राजा खरोखरीच पाण्यांत बुडाला, तेव्हां आसपासचे नोकर बघतच राहिले

कुणीहि त्याला वांचविण्याची हिम्मत केली नाहीं! जेव्हां राजाचें प्रेत वर येऊन तरंगूं लागलें, तेव्हां मग मात्र लोकांनीं त्याला बाहेर काढण्याची व्यवस्था केली.

कालियादहाच्या दोन विलासगृहांमध्यें जें बरेंच अंतर आहे तें चालून जाण्यासाठीं भूगर्भांतून एक गुप्त रस्ता होता, असें म्हणतात. दोन विलासगृहांतून रहाणारे राजे लोक, यजमान व पाहुणे याच रस्त्यानें गुपचूप एकमेकांना भेटूं शकत असत.

या खेपेस आम्ही कालियादह पहायला गेलों होतों, तेव्हां क्षिप्रेंत पाणी बरेंच होतें. बहुतेक कुंडें प्रवाहांत बुडून गेलेलीं होतीं. राण्यांना कपडे बदलण्यासाठीं म्हणून भिंतीचा आडोसा केलेलें जें कुंड होतें तेथवर आम्ही जाऊंहि शकलों नाहीं.

अवन्तीचा हा सारा प्रदेश प्राचीन राजांच्या शौर्यामुळें, संस्कारितेमुळें व विलासितेमुळें देखील फारच प्रसिद्ध आहे. परंतु या स्थानाचें वास्तविक महत्त्व वेगळेंच आहे. पृथ्वीचें मकरवृत्त जें साडेतेवीस अक्षांशाचें असतें, या उज्जयिनवरून जातें. गुजरातचें कडीपाटण, माळव्याची उज्जयिनी, रतलाम, भोपाळ, जबलपूर, सोनहाट, रांची वगैरे सर्व स्थानें या मकरवृत्ताच्या जवळपासच आहेत. आणि ज्याप्रमाणें आज पृथ्वीवरील रेखांश लंडनजवळील ग्रीनीच येथील विश्वविख्यात वेधशाळेपासून मोजले जातात, त्याचप्रमाणें प्राचीन काळीं भारताच्या विद्यावैभवाच्या जमान्यांत उज्जयिनीलाच शून्य रेखांश मानून तेथून सर्व रेखांश मोजले जात. आणि महाकालेश्वरहि काल-गणनेच्या हिशेबानेंच उज्जयिनींत येऊन वसले होते. महाकालाच्या मंदिरांत एक असें छिद्र आहे कीं, जेथून अमुक तिथीला सूर्याचे किरण सरळ लिंगावर येऊन पडतात. उज्जयिनी ज्योतिर्लिंगासाठीं विख्यात होतीच, परंतु ज्योतिर्विद्येच्या वेधशाळेमुळें देखील उज्जयिनी नगरीचें भारतांत प्राधान्य आहे. ही वेधशाळादेखील शिप्रा नदीच्या किनाऱ्यावरच राजा मानसिंहानें बांधवली व ती आजहि आपलें काम नियमितपणें करीत असते.

या नदीच्या किनाऱ्यावर कुठल्या तरी अनुकूल गुहेंत राजा भर्तृहरिसारखे अनेक योगीहि राहिलेले आहेत. एखाद्या भक्त-हृदयी इतिहास-संशोधकानें क्षिप्रा नदीच्या आणि तिच्या घडलेल्या घटनांचा अद्यतन इतिहास आणि क्षिप्रेशीं निगडित दंतकथा जर एकत्रित केल्या तर किती चांगलें होईल!

# प्रयागराज

१०

वैशाख महिना होता. उन्हाळा कडक होता. आमची गाडी मध्य हिंदुस्थानच्या विस्तीर्ण प्रदेशांतून जात होती. डबे इतके गरम झाले होते कीं, जणुं काय पावरोटी भाजण्याची भट्टीच! दरेक स्टेशनवर पाणी पीत होतों, तरीहि जीव कसा सुकून जात होता. तरी पण एका गोष्टीमुळें शांति वाटत होती. प्रत्येक स्टेशनवर मराठी भाषा ऐकूं येत होती; आणि पुंडलिकाच्या पुण्यक्षेत्राच्या रस्त्यानें जात असल्याप्रमाणें रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बाभळीचीं झाडें नजरेला पडत होतीं. मराठी भाषा आणि बाभळीचीं झाडें जोंवर होतीं तोंवर मी महाराष्ट्रांतच आहें या जाणिवेनें मनाला समाधान वाटत होतें. जवळ जवळ जबलपुरापर्यंत असें चाललें.

जबलपुरांत माझे एक मित्र रहात होते. त्यांना शोधून काढून भेटलों आणि त्यांच्यायेथेंच जेवण केलें. माझ्या मनांत विचार आला कीं, हें माझें शेवटचें महाराष्ट्रीय भोजन. विचित्रता अशी कीं, हें भोजन सुद्धां मला गुप्तवेषानें करावें लागलें! कित्येक वर्षांपूर्वी माझे हे मित्र एल्‌एल्‌. बी.चा अभ्यास करीत होते. त्या वेळीं मीं त्यांना समजावून दिलें होतें कीं, वकिलीचा धंदा घाणेरडा आहे. त्यापेक्षां राष्ट्रीय शिक्षक होणें चांगलें. या कटांत मी सफळ झाल्यामुळें माझ्या मित्राचे सारे आप्तइष्ट माझ्यावर जळफळत होते. मला त्यांनीं पाहिलें नव्हतें, पण माझें नांव ऐकलें होतें. मला बघून माझे मित्र इंग्रजींत मला म्हणाले, "गृहस्था, तूं कोण आहेस हें माझ्या आईला जर

कुणीहि त्याला वांचविण्याची हिम्मत केली नाहीं ! जेव्हां राजाचें प्रेत वर येऊन तरंगूं लागलें, तेव्हां मग मात्र लोकांनीं त्याला बाहेर काढण्याची व्यवस्था केली.

कालियादहाच्या दोन विलासगृहांमध्यें जें बरेंच अंतर आहे तें चालून जाण्यासाठीं भूगर्भांतून एक गुप्त रस्ता होता, असें म्हणतात. दोन विलासगृहांतून रहाणारे राजे लोक, यजमान व पाहुणे याच रस्त्यानें गुपचूप एकमेकांना भेटूं शकत असत.

या खेपेस आम्ही कालियादह पहायला गेलों होतों, तेव्हां क्षिप्रेंत पाणी बरेंच होतें. बहुतेक कुंडें प्रवाहांत बुडून गेलेलीं होतीं. राण्यांना कपडे बदलण्यासाठीं म्हणून भिंतीचा आडोसा केलेलें जें कुंड होतें तेथवर आम्ही जाऊंहि शकलों नाहीं.

अवन्तीचा हा सारा प्रदेश प्राचीन राजांच्या शौर्यामुळें, संस्कारितेमुळें व विलासितेमुळें देखील फारच प्रसिद्ध आहे. परंतु या स्थानाचें वास्तविक महत्त्व वेगळेंच आहे. पृथ्वीचें मकरवृत्त जें साडेतेवीस अक्षांशाचें असतें, या उज्जयिनवरून जातें. गुजरातचें कडीपाटण, माळव्याची उज्जयिनी, रतलाम, भोपाळ, जबलपूर, सोनहाट, रांची वगैरे सर्व स्थानें या मकरवृत्ताच्या जवळपासच आहेत. आणि ज्याप्रमाणें आज पृथ्वीवरील रेखांश लंडनजवळील ग्रीनीच येथील विश्वविख्यात वेधशाळेपासून मोजले जातात, त्याचप्रमाणें प्राचीन काळीं भारताच्या विद्यावैभवाच्या जमान्यांत उज्जयिनीलाच शून्य रेखांश मानून तेथून सर्व रेखांश मोजले जात. आणि महाकालेश्वरहि काल-गणनेच्या हिशेबानेंच उज्जयिनींत येऊन वसले होते. महाकालाच्या मंदिरांत एक असें छिद्र आहे कीं, जेथून अमुक तिथीला सूर्याचे किरण सरळ लिंगावर येऊन पडतात. उज्जयिनी ज्योतिर्लिंगासाठीं विख्यात होतीच, परंतु ज्योतिर्विद्येच्या वेधशाळेमुळें देखील उज्जयिनी नगरीचें भारतांत प्राधान्य आहे. ही वेधशाळादेखील शिप्रा नदीच्या किनाऱ्यावरच राजा मानसिंहानें बांधवली व ती आजहि आपलें काम नियमितपणें करीत असते.

या नदीच्या किनाऱ्यावर कुठल्या तरी अनुकूल गुहेंत राजा भर्तृहरिसारखे अनेक योगीहि राहिलेले आहेत. एखाद्या भक्त-हृदयी इतिहास-संशोधकानें क्षिप्रा नदीच्या आणि तिच्या घडलेल्या घटनांचा अद्यतन इतिहास आणि क्षिप्रेशीं निगडित दंतकथा जर एकत्रित केल्या तर किती चांगलें होईल !

# प्रयागराज

१०

वैशाख महिना होता. उन्हाळा कडक होता. आमची गाडी मध्य हिंदुस्थानच्या विस्तीर्ण प्रदेशांतून जात होती. डबे इतके गरम झाले होते कीं, जणुं काय पावरोटी भाजण्याची भट्टीच! दरेक स्टेशनवर पाणी पीत होतों, तरीहि जीव कसा सुकून जात होता. तरी पण एका गोष्टीमुळें शांति वाटत होती. प्रत्येक स्टेशनवर मराठी भाषा ऐकूं येत होती; आणि पुंडलिकाच्या पुण्यक्षेत्राच्या रस्त्यानें जात असल्याप्रमाणें रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बाभळीचीं झाडें नजरेला पडत होतीं. मराठी भाषा आणि बाभळीचीं झाडें जोंवर होतीं तोंवर मी महाराष्ट्रांतच आहें या जाणिवेनें मनाला समाधान वाटत होतें. जवळ जवळ जबलपुरापर्यंत असें चाललें.

जबलपुरांत माझे एक मित्र रहात होते. त्यांना शोधून काढून भेटलों आणि त्यांच्यायेथेंच जेवण केलें. माझ्या मनांत विचार आला कीं, हें माझें शेवटचें महाराष्ट्रीय भोजन. विचित्रता अशी कीं, हें भोजन सुद्धां मला गुप्तवेषानें करावें लागलें! कित्येक वर्षांपूर्वी माझे हे मित्र एल्‌एल्. बी.चा अभ्यास करीत होते. त्या वेळीं मीं त्यांना समजावून दिलें होतें कीं, वकिलीचा धंदा घाणेरडा आहे. त्यापेक्षां राष्ट्रीय शिक्षक होणें चांगलें. या कटांत मी सफळ झाल्यामुळें माझ्या मित्राचे सारे आप्तइष्ट माझ्यावर जळफळत होते. मला त्यांनीं पाहिलें नव्हतें, पण माझें नांव ऐकलें होतें. मला बघून माझे मित्र इंग्रजींत मला म्हणाले, "गृहस्था, तूं कोण आहेस हें माझ्या आईला जर

समजलें, तर लागलीच तुझ्यावर पुष्पवृष्टि होईल. अर्ध्या तासांत तुला परत जायचें आहे. तेवढ्यांत ही शोभा कोठें करून घ्या?" मलाहि त्यांचें बोलणें पटलें आणि चोरासारखें गुपचूप स्नान करून मीं जेवून घेतलें. नाम आणि रूप यांचा संयोग झाला नव्हता म्हणून बिचाऱ्या आईनीं अतिशय प्रेमानें स्वयंपाक करून मला गरमागरम महाराष्ट्रीय जेवण खाऊं घातलें. निघायच्या वेळीं त्यांच्यापुढें डोकें टेकून मीं नमस्कार केला आणि त्या प्रेमळ आईच्या साऱ्या शुभ आशीर्वादांसह मीं निरोप घेतला. परशुरामापासून कर्णानें अस्त्रविद्या मिळवावी, तसेच हे आशीर्वाद मी मिळविले होते.

प्रयागराज हें आमच्या हिमालयाच्या यात्रेचें पहिलें धाम. येथें इतिहास-पुराणांत प्रसिद्ध असा गंगा-यमुनांचा रमणीय संगम आहे. एका बाजूकडून दोन्ही कांठची सफेत रेती प्रवाहांत पाडत पाडत स्वर्धुनी वाहत येते. दुसऱ्या बाजूनें यमराजाची बहीण आपलें महत्त्व आणि प्रतिष्ठा सांभाळीत शांतपणें पुढें येते. संगमापासून दूरवर या दोन नद्यांचे धवल आणि श्याम प्रवाह जणुं वेगळे वेगळे असल्यासारखे वाहतात. प्राचीन काळापासून आपल्या कविवर्यांनीं संगमाच्या या काव्यमय ठिकाणीं आपली सरस्वती वाहविली आहे. धर्मनिष्ठ प्रजेनें अतिशय प्राचीन काळापासून या त्रिवेणी संगमाची असाधारण उत्साहानें पूजा केली आहे. गंगेचें नांव घेतांच हरद्वार आणि ब्रह्मावतीची आठवण होते; आणि यमुनेचें नांव ऐकतांच केव्हां कुंजविहारीच्या मथुरा-वृंदावनाचें स्मरण होतें, तर केव्हां शहाजहानाची दिल्ली व आग्रा आठवतात. हिंदु आणि मुसलमान संस्कृतीच्या ऐक्याचें ओझरतें दर्शन करून देणाऱ्या सम्राट् अकबरानें येथें संगमापाशीं असलेल्या सनातन अक्षयवटाच्या आसपास एक मजबूत किल्ला बांधला आहे.

आम्ही किल्ला पहावयास गेलों; त्या वेळीं किल्ल्यांत गोऱ्या लोकांची फौज रहात असे. किल्ल्याच्या संगमाकडील दरवाजाकडे जेव्हां पुष्कळ यात्रेकरू गोळा होत, तेव्हां आंतून एक शिपाई येऊन साऱ्यांना आंत घेऊन जाई आणि अक्षय-वटाचें दर्शन करवून दुसऱ्या दरवाजानें बाहेर सोडी. अक्षयवट हा एका भुयारांत आहे. वट कसला, एक भलें मोठें खोडच आहे तें. भाविक लोक सांगतात कीं खोड येथें आहे व फांद्या बोधिगयेंत आहेत. याचा अर्थ समजणें कठीण आहे. काय, एके काळीं बौद्धधर्म बोधिगयेपासून अलाहाबादपर्यंत पसरला होता असा याचा अर्थ करावा? हिमालयांत सुद्धां महादेवाच्या महालिंगाचें एक टोंक केदारनाथ

येथें आणि दुसरें टोंक नेपाळांत असलेल्या पशुपतिनाथ या ठिकाणीं आहे असें म्हणतात, याचाहि अर्थ काय? एवढेंच काय, हिंदु लोक असें सुद्धां म्हणायल कमी करीत नाहीत कीं, गदाधर विष्णूचा एक पाय गयेंत आणि दुसरा पाय मक्केंत आहे! कल्पनेच्या साम्राज्यांत संयम कसला? अक्षयवट असलेलें भुयार बरेंच लांबरुंद आहे आणि त्यांत अनेक मूर्ति आहेत. कुबेराच्या आणि कपिल-महामुनीच्या मूर्तीकडे माझें लक्ष अधिक गेलें. एका वेळीं गंगा-यमुनांचा प्रवाह अक्षयवटाला जवळ जवळ लागून जात होता. त्या काळीं कित्येक हिंदु लोक य अक्षयवटावरून प्रवाहांत उडी घेऊन देहत्याग करीत असत. अशा रीतीनें अक्षयवटावरून उडी घेऊन केलेल्या आत्महत्येंत कांहीं पाप नाहीं, उलट मोक्ष आहे, असें मानीत असत. जणुं काय लोकांच्या या अघोर साधनेला कंटाळूनच संगमानें आपलें स्थान बदललें आणि अकबरानें वडाच्या आसपास किल्ला बांधून अशा आत्महत्येचा संभव कायमचा बंद करून टाकला. लष्करी दृष्टीनें तर किल्ल्याचें महत्त्व आहेच.

याच किल्ल्यांत बौद्धधर्मी अशोकाचा एक शिलास्तंभ आहे. त्यावर अशोकाची धर्मलिपि कोरलेली आहे. समद्रगुप्ताचा राजकवि हरिषेण यानें लिहिलेले कित्येक श्लोक सुद्धां याच स्तंभावर कोरलेले आहेत. इतिहासतज्ज्ञ दोन्ही लेख मोठे महत्त्वाचे मानतात.

बरोबरीच्या शिपायाची थोडी खुशामत करून अशोकाच्या या स्तंभा-जवळ जाण्याची परवानगी मीं मिळविली. शिपाई बिचारा होता पंजाबी. तो म्हणे, 'तेथें दर्शन करण्यासारखें कांहीं नाहीं. दर्शन सारें इकडे भुयारांतच आहे.' बिचारा भोळा पंजाबी! माझ्यासाठीं दर्शनीय काय, हें त्याला काय समजणार? या दगडी गोल खांबावर दिग्विजयाचे आणि धर्मविजयाचे दोन स्वतंत्र आणि अमर लेख आहेत याची जागती जाणीव त्याला केव्हां होईल? हिंदुस्थानांत शिक्षण सक्तीचें आणि सार्वत्रिक होईल तेव्हां? राष्ट्रीयतेची स्फूर्ति घरोघर पोंचेल तेव्हां? कीं कुणी लोककवि प्रजेच्या भाषेंत त्यांचा महिमा गाईल तेव्हां?

किल्ल्याच्या नजरेखालीं संगमापुढें रेतीचा विस्तीर्ण पट आहे. त्यांत प्रयागचे पंडे आपापले डेरे ताणून पडलेले असतात. तंबूंच्या या दाटींत आपल्या पंड्याचा तंबू कोणता हें ओळखतां यावें यासाठीं प्रत्येक तंबूवर विशिष्ट चिन्ह

असलेली ध्वजा लावलेली असते. कोणी कपिध्वज, कोणी मकरध्वज, तर कोणी नौकाध्वज. नव्या युगाचें सूचन करणाऱ्या 'हवाई गाड्या', मोटारी, आगगाड्या याहि ध्वजावर दिसून येत.

प्रख्यात कुंभमेळा दर बारा वर्षांनीं येथें भरतो. दरसाल फक्त माघमेळाच भरतो. अशा मेळ्यांना निरनिराळ्या प्रांतांचे साधू, संन्यासी, तपस्वी आणि संत-महंत येतात. धर्मचर्चा होते, तत्त्वज्ञानाचे सामने होतात, नव्या नव्या मुद्यांची देवघेव होतें. आतुर शिष्यांना गुरूंचा लाभ होतो आणि शिष्यवेड्या गुरूंना चेल्यांची प्राप्ति होते. दरएक वादवाविदांत प्रमाणें किती मानावीं याविषयीं तासन् तास चर्चा चालत असते. कोणी प्रत्यक्ष आणि अनुमानालाच मानणारे. पुष्कळसे उपमान आणि शब्दप्रमाणाला मान देणारे. नंगे बैरागी वादविवाद करूं लागले म्हणजे न्यायशास्त्रांत न सांगितलेलीं अशीं दोन प्रमाणें – सोटा आणि शिव्या – यांचा बऱ्याच प्रमाणांत उपयोग होतो ! या नंग्यांना मरणाचें भय नाहीं. पण पोलिसांची त्यांना भारी भीति; कारण पोलिनांनीं पकडून चौकींत नेलें तर तेथें आपला धर्म पाळतां येणार नाहीं ना ! दंडाबाजींत दहा-पांच साधू कामीं आले तर पोलिस येण्याच्या पूर्वी त्यांचे मुडदे रेतींत पुरून रेती सारखी करून ते वर बसून जातील ! हजारों बैरागी तेथें उभे असले, तरी पोलिसाला साक्षीदार एकहि मिळायचा नाहीं. गुन्हेगारांना शिक्षा झाल्यामुळें समाजांतील गुन्हे कमी झाले नाहींत, आणि अशा साधूंना शिक्षा न झाल्यामुळें त्यांच्यांत गुन्हे वाढले नाहींत, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

प्रयागराज येथें मला माझ्या वडिलांच्या अस्थी त्रिवेणी-संगमांत सोडावयाच्या होत्या. तें काम पुरें करून मीं श्राद्ध केलें. नदीकांठीं मिशा काढलेले पुष्कळ लोक पहाण्यांत येत असल्यामुळें उत्तर हिंदुस्थानांत मद्रासी लोकांनीं तळ ठोकला असावा असें वाटत होतें. सिंधी लोकांना आपण पहातों तेव्हां तेव्हां ते अर्धे इंग्रजासारखे, अर्धे पारशासारखे दिसतात; पण तीर्थक्षेत्रांत अत्यंत भाविकता दाखविणाऱ्या आणि भक्तीनें सद्गदित होणाऱ्या यात्रेकरूंत सिंधचा पहिला नंबर. महाराष्ट्रीय लोक थोड्या वेळांत आणि थोड्या खर्चांत जास्तींत जास्त किती पहातां येईल, आणि किती पुण्याचा संचय होईल, इकडेच दृष्टि ठेवणारे असतात. गुजराथी लोक नेहमीं खाण्यापिण्याची सोय शोधीत फिरत असतांना दिसतात; आणि बंगाली आपल्या भक्तीचा उमाळा साऱ्या दुनियेच्य

नजरेला बरोबर पडेल अशाविषयीं अधिक उत्सुक दिसतात. मद्रासी तोंडावरून दिसतात हुषार; पण त्यांना हिंदी समजत नसल्यामुळें आणि त्यांच्या विचित्र चालीरीति आणि पोषाख यांमुळें रोझप्रमाणें* इकडे तिकडे फिरत असलेले दिसतात. मजूर व गाडीवाले यांच्याबरोबर त्यांचे जमतच नाहीं.

उत्तर प्रदेशांतील लोकांना प्रयाग कांहीं परका मुलूख नव्हे. ते आपले रीतसर रुभरू अंगरखे घालून, डोक्यावर टोपी जरा तिरपी ठेवून, पान खात खात पोळासारखे सर्वत्र फिरत असतात. त्यांना पाहून कुणीहि म्हणेल कीं, 'आत्मन्येव च संतुष्टः अस्य कार्यं न विद्यते।' इंग्रजी शिकलेला माणूस वाटेल त्या प्रांताचा असो, त्याची जात वेगळीच पडायची. असल्या यात्रेच्या ठिकाणीं आपण आलों यांत आपल्या शिक्षणाला कांहीं कमीपणा तर आला नाहीं ना, अशी मुखमुद्रा धारण करून तो एकलकोंडा फिरतो. आणि या सर्वांचे चित्र-विचित्र स्वभाव, पोषाख आणि रीतिरिवाज यांकडे पूर्ण दुर्लक्ष करून गंगा-यमुनांचा सनातन प्रवाह अमरपुरी वाराणसीकडे अखंड अविरत वाहतच चाललेला असतो.

---

* रोझ – काळविटासारखें एक गुजराथमधील जंगली जनावर.

# अमरपुरी वाराणसी

११

काशीला पूर्वी एक वेळा मी आलों होतों. तरी परिचंयामुळें उत्पन्न होणारी अवज्ञा माझ्यांत अवतरली नव्हती. गाडींत बसून गंगेच्या पुलावरून ज्या वेळीं मी पार होत होतों त्या वेळीं काशीचें तें अद्‌भुत दृश्य पाहून मी गद्‌गदित झालों. मोहोळावर बसलेल्या माश्या गुणगुणत असाव्यात तसा आवाज काशीमध्यें नेहमीं दुरून ऐकूं येतो. 'वारणा' नदीपासून 'असी' नदीपर्यंतच्या दृश्यांत औरंगजेबाच्या मशिदीच्या दोन गगनस्पर्शी मनोऱ्यांकडे सर्वांत अधिक लक्ष जातें. हे मनोरे पाहून एक विचारपरंपरा मनांत जागृत झाली. मी मनांत म्हटलें, 'या दोन मनोऱ्यांमागें हिन्दुस्थानच्या इतिहासाचें परम रहस्य — चरम रहस्य लपलेलें आहे. औरंगजेबानें धर्मवेडाच्या आवेशांत काशीचें केंद्र, हिंदुधर्माचा तिलक असें विश्वनाथाचें देवालय फोडून टाकलें आणि त्याच्या जागीं एक मशीद उभारली. अजूनहि या मशिदीच्या मागच्या भागांत मूळ देवालयाचे अवशेष पहावयास मिळतात. औरंगजेब मरण पावला. मोगल साम्राज्याला उतरती कळा लागली. हिंदु-पद-पादशाही स्थापन करण्याची इच्छा असणाऱ्या मराठ्यांची दृष्टि दिल्लीवर फिरली. मराठे सरदार पंड्यांना भूमिदान करूं लागले. तरी पण काशीसारख्या पवित्र धर्मक्षेत्राच्या ठिकाणीं इस्लामी झेंड्याप्रमाणें विराजणारी औरंगजेबाची मशीद फोडून टाकण्याचा विचार सुद्धां या हिंदूंच्या मनांत आला नाहीं. आज ही मशीद तेथें इस्लामी धर्माच्या विजयाची पताका म्हणून नसून हिंदु लोकांचें साम्राज्य जवळ जवळ सर्व देशभर व्यापलेलें होतें,

अशा वेळीं त्यांनीं त्यांनीं दाखविलेल्या परधर्मसहिष्णुतेची जणुं ती ध्वजाच आहे.'

अशा विचारांच्या प्रवाहांत मी बराच वाहत गेलों असतों, पण पुलाखालच्या गंगेच्या प्रवाहानें मला शांत केलें; पण ही शांति फार वेळ टिकूं शकली नाहीं. स्टेशनजवळ येतांच माझ्या छातींत धस्स झालें. पंड्यांची झुंड माझ्यापाठीं लागणार असें वाटून माझीं गात्रें ढिलीं पडलीं ! रशियाच्या जंगलांत चालणारा एखादा प्रवासी सुद्धां आपल्यामागें अस्वलांची झुंड लागलेली पाहून इतका घाबरून जात नसेल ! भीत भीत मी आगगाडींमधून उतरलों आणि गाडीवानाजवळ जाऊन त्याला सांगितलें, " बाबा, जें भाडें घ्यायचें असेल तें घे; पण एकदम मला येथून दुर्गाघाटाकडे घेऊन चल." गाडीवानानें गाडी हांकली, तरी दोन पंडे आपल्या चोपड्या बगलेंत मारून माझ्या पाठीमागें धांवत सुटलेच. कसाबसा मी त्यांच्या पंजांतून निसटलों आणि अनंतभटजींच्या येथें येऊन पोंचलों.

अनंतभट फार सज्जन माणूस. आपलें कर्मकाण्ड ते चांगल्या रीतीनें चालवीत असत. यजमानाची व्यवस्था आपल्या खानदानीला साजेल अशा रीतीनें करीत आणि आपली प्राप्ति वाढवीत. ते व्याजबट्टयाचा धंदाहि करीत. निजण्यापूर्वी माझ्या मनांत पंड्यांचा विचार आला. मला वाटलें, अनंतभट हे एक प्रकारचे पंड्येच नव्हेत का ? ते येथें नसतील, तर माझी यात्रा चांगल्या प्रकारें व्हायची नाहीं. विलायतेंत दरेक मोठ्या शहरांत हॉटेल्स असतात, ' हाऊस एजंट ' असतात, टॉमस कुकसारख्या कंपन्या असतात. दरेक बंदरावर ' शिपिंग एजंट्स् ' भेटतात. आपले हे पंड्ये हेंच काम आपल्या भारतीय जीवनाला साजेल अशा ढबीनें करीत नाहींत काय ? पंड्याला पत्र टाकावें, कीं तो तुम्हांला न्यायला स्टेशनवर येतो. घरीं घेऊन जाऊन रहाण्याची सोय करून देतो, पहाण्यासारखीं देवळें आणि स्थळें दाखवितो. त्या सर्वांचें माहात्म्यहि सांगतो. तुमच्याबरोबर बाजारांतहि येतो. आणि या साऱ्या कामासाठीं घेतो काय ? तुम्ही द्याल तें. इतकी स्वस्त आणि साधी व्यवस्था जगांत दुसरीकडे कोठेंहि मिळणार नाहीं. टॉमस कुकसारखे एजंट प्रवाशांना राजकैद्याप्रमाणें फिरवितात आणि त्यासाठीं मोठा कर घेतात.

तर मग या पंड्यांचा आपल्याला त्रास कां वाटूं लागतो ? याचें कारण इतकेंच कीं, या पंड्यांना आपण आतां गुरुजी किंवा पुरोहित न रहातां ' हाऊस

एजंट ' किंवा 'हॉटेलकीपर' बनलों आहोंत, याचें पुरतें भान नसतें. दोन धर्म – दोन आदर्श – सांभाळतां सांभाळतां त्यांची ही दशा झाली आहे. लोभ आणि निर्लज्जपणा हे दोन त्यांचे मुद्दाम अंगीं बाणवून घेतलेले गुण होऊन बसले आहेत. पंड्ये हे खरें पाहिलें तर यात्रेकरूंचे गुरू म्हणायचे. आपला भलेपणा आणि आतिथ्यधर्म यांना अनुसरून आपल्या यजमानांची रहाण्या-जेवण्याची सोय त्यांनीं सुरुवातीला केली असेल. मग धनवान यात्रेकरूंना पाहून ब्राह्मणांचें हृदयहि लोभानें वेधून टाकलें असेल. ब्राह्मण म्हणतात कीं, पंड्याच्या लोभ हा त्यांना सीतेचा शाप आहे. आपल्या गलिच्छ दोषाला सुद्धां व्यास किंवा शौनक ऋषींच्या नांवांचा पौराणिक आधार काढून दाखविणाऱ्या ब्राह्मणांची धन्य आहे म्हणायची ! या गंगापुत्रांपैकीं कांहीं जर आधुनिक पद्धति स्वीकारून ' हाऊस एजंट ' आणि ' ट्रॅव्हेलर्स गाईड ' बनतील आणि तो धंदा करून सुद्धां स्वतःची प्रतिष्ठा सांभाळतील, तर त्यांचें चांगलें चालेल आणि ते यात्रेकरूंचा दुवा घेतील.

दुसऱ्या दिवशीं आम्ही मणिकर्णिका घाटावर स्नानाला गेलों. तेथें गंगेचेंच पाणी घेऊन गंगेला अभिषेक केला. चक्र-पुष्करिणी तीर्थावर आलों. जवळ उभा असलेला एक गंगापुत्र म्हणाला, " आइये महाराज, स्नान कीजिये. " मीं त्याला 'नाहीं' म्हटलें. माझे मित्र अनंतबुवा चकित झाले. " या तीर्थाचें कांहीं फारसें माहात्म्य नाहीं वाटतें ? " त्यांनीं विचारलें. मी उत्तरलों, " वाः, माहात्म्य कां नाहीं ? यांत एकदां स्नानाला पडल्यावर पुनः नरकांत जायचं उरतच नाहीं ! " बुवा उमजले. तरी बुवांचें कुतूहल तृप्त करण्यासाठीं आम्ही तीर्थाजवळ गेलों. तीर्थावर एक संगमरवरी दगड होता. त्यावर इंग्रजींत व्हिक्टोरिया राणीचें नांव आणि दुसरें कांहीं लिहिलें होतें. आणि तीर्थांत ? पांच फूट रुंद आणि पंचवीस-तीस फूट लांब असा खड्डा. पाण्याचा रंग आम्हांला दिसला नाहीं. कारण या कुंडांत रोज स्नान करणाऱ्या हजारों यात्रेकरूंच्या घामाचा जाड थर पाण्यावर जमला होता. तरीहि आमच्या डोळ्यांसमोर शेंकडों यात्रेकरू मेल्यानंतरचा नरक टाळण्यासाठीं या नरकांत मोठ्या हौसेनें डुबक्या मारीत होते. माझ्या मनांत विचार आला कीं, शरम वाटूनच कीं काय, ईश्वर या लोकांना नरकवासांतून माफी देत असावा; कारण या कुंडांत स्नान करणाऱ्याला ज्याची शिसारी येईल असें कुंड नरकांत तरी ईश्वर कोठून आणणार ?

आम्ही स्मशानघाटाकडे चाललों. तेथें फोडलेल्या लाकडांची रास करून ठेवण्यांत आली होती. मला वाटलें, माझ्यासाठीं तर ही रचून ठेवली नसेल ? काशीमध्यें जो मनुष्य मरतो त्याच्या कानांत स्वतः महादेव तारस्वरानें मंत्र जपतात आणि काशी-विश्वेश्वर नेहमीं त्याच्या शरीराला चिताभस्माचा लेप करतात. त्याग आणि वैराग्याचा हा राग अद्भुत आहे !

पुढें जाऊन आम्ही बिंदुमाधवाचे दर्शन घेतलें. शिंदे-होळकरांचीं अन्नछत्रें पाहिलीं. पुण्यश्लोक अहल्याबाईंचें स्मरण झालें. त्यांच्या व्यवस्थेमुळें रोज काशीहून रामेश्वरला जाणाऱ्या कावडीचें चित्र माझ्या दृष्टीपुढें उभें राहिलें. आम्ही विश्वनाथाचें दर्शन घेतलें. तेथील गर्दी, जमिनीवरचा चिखल आणि कुजलेल्या बेलाच्या पानांचा वास हें सर्व कसें जरी असलें तरी काव्यमयच वाटत होतें आणि भक्तिभावांत भरच टाकीत होतें. विश्वेश्वराच्या येथें भेदभाव नाहीं. सर्वजण सारखे. दर्शन घ्यायला वाटेल त्यानें जावें, वाटेल तेव्हां जावें. 'मत जावो 'चें नांव नाहीं. मंदिराच्या गर्भगृहाच्या भिंतींत बिळासारखें एक भोंक ठेवलेलें आहे. हें भोंक ठेवण्याचें कारण प्रथम मी समजूं शकलों नाहीं. पण मंदिराची प्रदक्षिणा करतांना मला दिसून आलें कीं, जगाचा प्रवास करणाऱ्या गोऱ्या 'ग्लोब ट्रॉटर 'ना ( तरंग-प्रवाशांना ) विश्वेश्वराचें दर्शन घेतां यावें एवढ्याच-साठीं हें भोंक ठेवलेलें आहे. आम्ही गेलों त्या वेळीं त्या झरोक्यापुढें टॉमस कुकचा एक एजंट दोन-तीन मडमांना मंदिराविषयीं माहिती देत होता. देवळाच्या शिखराला जडविलेला सोन्याचा पत्रा हें पंजाबकेसरी रणजितसिंहाच्या श्रद्धेचें एक चिह्न आहे, असें मला कोणीसें सांगितलें. जवळच औरंगजेबाची मशीद आहे आणि मध्यें ज्ञानवापी आहे. असें सांगतात कीं, जेव्हां यवन लोक मूळ देऊळ भ्रष्ट करण्यासाठीं आले, तेव्हां कलियुगाचें माहात्म्य जाणून विश्वेश्वराच्या मूर्तीनें या विहिरींत उडी घेतली; ही विहीर थेट पाताळापर्यंत गेलेली आहे.

तेथून पुढें ज्या मठांत राहून एकनाथ महाराजांनीं आपला 'नाथभागवत' ग्रंथ पुरा केला होता, तो मठ पहाण्यासाठीं आम्ही गेलों. संस्कृत भाषेचें सामर्थ्य आणि पावित्र्य माझ्या मराठींतहि आहे, हें या ठिकाणीं सिद्ध झालें. ती आठवण होतांच हृदय भक्तीनें भरून आलें. त्या स्थानाला मीं साष्टांग नमस्कार घातला, एकनाथ स्वामींचें स्मरण केलें आणि त्रिलिंग स्वामींच्या

मूर्तींचें दर्शन घ्यायला गेलों. त्रिलिंग स्वामी हे एक सुविख्यात दक्षिणी संन्यासी होते. त्यांनीं काशींतील पुष्कळ देवळांचा व इमारतींचा जीर्णोद्धार करविला होता. तरी एकहि नवीन देऊळ किंवा इमारत बांधण्याचें तें नाकारीत असत. असें करण्याचें कारण उघड आहे. काशीमधील लहान-मोठ्या देवळांची आणि त्यांतील मूर्तींची गणति केली, तर त्यांची संख्या तेथील लोकसंख्येपेक्षां फारशी कमी भरणार नाहीं. तेथें नव्या देवळाची भरती आणखी कशाला पाहिजे?

हिंदुस्थानांत अनेक साम्राज्यें होऊन गेलीं. अनेक राजधान्या झाल्या. आज त्या राजधान्या एक तर नामशेष झाल्या आहेत, किंवा त्यांचें रूपान्तर लहान लहान खेडेगांवांत होऊन गेलें आहे. तरीहि ही देवनगरी अनेक साम्राज्यांची चढती आणि पडती यांची साक्षी होऊन अजून जशीच्या तशी टिकून राहिली आहे. भूतकाळ जर सजीव पहायचा असेल, तर तो काशींत पहायला मिळेल. गंगा नदी आपलें घाटरूपी बंधन वारंवार तोडीतच असते, आणि आईची लाथ खाऊन सुद्धां वासरू जसें गाईला प्यायला धांवतच असतें, तसे लोक सुद्धां पुनः पुनः घाट बांधीतच असतात.

वाराणसींत आजहि पूर्वमीमांसावादी कर्मकाण्डी लोकांचे यज्ञयाग चालत असतात; वेदान्ती द्वैत-अद्वैताचा झगडा चालवून श्रोतृवृंदाला खंडन् खंड खाद्य देत असतात. वैयाकरणी शब्दन् शब्दाचा कीस पाडीत असतात; बंगाली आणि दक्षिणी नैयायिक 'गदाधरीचा'चा अर्थ करण्याची धडपड करीत असतात. ख्रिश्चन आणि आर्यसमाजी वाग्युद्धें माजवितात; वेदाभ्यासी दशग्रंथाचा घोष करतात; कारागीर टाकी मारमारून दगडांचे देव बनवितात; आणि कित्येक भूदेव अन्नछत्रांत जेऊन आळशीपणें बसून राहून जिवंत दगड बनतात!

याच नगरींत सत्यसंध हरिश्चंद्राला विश्वामित्राच्या ऋणांतून सुटण्यासाठीं अग्रजांनीं आणि अंत्यजांनीं मदत केली होती. याच नगरींत तुलसीदासांनीं रामकथा गायिली होती. आणि याच ठिकाणीं कबीरांनीं हिंदु आणि मुसलमान संस्कृति एकत्र विणली होती.

बनारसला कित्येक लोक The city of the dead and the dying – मेलेल्या किंवा मरणासन्न झालेल्या लोकांची नगरी म्हणतात. पण वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानचीं अनेक शहरें नामशेष झालीं, तरीहि वाराणसी अजून अमरपुरीच राहिली आहे. कारण काशीमध्यें सनातनधर्माचा वास आहे.

एके दिवशीं आम्ही दशाश्वमेध घाटापासून पुलापर्यंत होडींत बसून फिरावयास गेलों. गंगामाईच्या स्पर्शामुळें शीतल आणि पावन झालेला वारा मंद मंद वहात होता. अनेक प्रकारचीं देवळें 'मला पहा, मला पहा' म्हणत डोळ्यांपुढें येऊन उभीं रहात होतीं. सर्वांना मी श्रद्धापूर्वक नमस्कार करीत होतों. चकमकीच्या दगडाचे वांकडेतिकडे पैलू जसे सुशोभित दिसतात, त्याच-प्रमाणें काशीच्या घरांची विशृंखल शोभा दृष्टीला आकर्षक वाटते. सकाळ-संध्याकाळ असंख्य स्त्री-पुरुष, मुलें आणि वृद्ध माणसें गंगामाईच्या कडेवर खेळत असलेलीं नजरेस पडतात.

दशाश्वमेध घाटावर एक परमहंस रहात होते. ते नग्न रहात. पहिल्या खेपेला बनारसला आलों तेव्हां त्यांचा फोटो घेण्याचा मी प्रयत्न केला; पण तो निष्फळ ठरला. जसजसा मी फिरें, तसतसे ते माझ्याकडे पाठ फिरवीत. त्या वेळीं मी फार खिन्न झालों होतों; पण मागाहून मला वाटलें कीं, अशा परम-हंसाच्या शरीराचा फोटो घेणें हा रानटीपणा आहे. या खेपेला मी त्यांच्या दर्शनाला गेलों; पण ते तेथें नव्हते. कोणी सांगितलें कीं, थोड्या दिवसांपूर्वी गंगेला पूर आला होता त्यांत ते वाहून गेले. कित्येक मंडळींनीं त्यांना वांचविण्याचा प्रयत्न केला पण त्यांनीं वांचवून घेण्याचें साफ नाकारलें आणि गंगेमध्यें जलसमाधि घेतली.

काशींत ज्याप्रमाणें अनेक धर्म आणि अनेक संप्रदाय आहेत त्याप्रमाणें तेथें स्थापत्य आणि शिल्पकलेचे प्रकारहि अनेक आहेत. ते पहाण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं आम्ही बाहेर पडलों. सर्व पाहून संध्याकाळीं थिऑसॉफिस्ट लोकांच्या सेंट्रल हिंदु कॉलेजकडे आलों. तेथें सरस्वतीचें एक लहानसें देऊळ पाहिलें. एक-दोघे बंगाली विद्यार्थी अंगावर चादर पांघरून उघड्या डोक्यांनीं फिरत होते. जवळच थिऑसॉफिकल लॉजमध्यें मिसेस बेझंटचें व्याख्यान होतें. 'भविष्यकाळीं माणसें कशीं होतील ?' याविषयीं विवेचन चाललें होतें. व्याख्यानामधून उठून 'रामकृष्ण आश्रमां'त आलों. तेथें ब्रह्मचारी चंद्रशेखर म्हणून एक साधू होते. त्यांनीं आमचें स्वागत केलें. पुष्कळ ब्रह्मचारी संस्कृत शिकत होते. सेवाश्रमाची व्यवस्था पाहून मी खूष झालों. एवढ्यांत दोघेतिघे बंगाली शहरांतून तंबोरा आणि तबला घेऊन आले. तंबोरा आणि तबल्याच्या साथीवर त्यांनीं गायन सुरू केलें. संतकवि रामप्रसादाचें पद होतें तें. गाणारे अद्भुत होते. संध्याकाळीं घरीं गेलों तेथें सुद्धां गायनाचे सूर माझ्या कानांत घुमत होते.

 

शेवटच्या दिवशीं आम्ही काळभैरवाच्या देवळांत गेलों. तेथें हातांत आणि गळ्यांत काळ्या रेशमाचा दोरा बांधून घेतला. देवळांत जाऊन –

“ तीक्ष्णदंष्ट्र महाकाय कल्पान्तदहनोपम ।
भैरवाय नमस्तुभ्यं अनुज्ञां दातुमर्हसि ॥ ”

म्हणून काशीच्या या कोतवालाची आम्हीं रजा घेतली; आणि त्रिस्थळीची यात्रा पूर्ण करण्यासाठीं गयेला जाण्यासाठीं निघालों. गयेचे गयावळ यात्रेकरूंना फार हैराण करतात हें मला माहीत होतें; म्हणून गयेंत करावयाच्या सर्व विधींची दक्षिणा आणि खर्चाचे पैसे अनंतभटजींना देऊन त्यांची मी पावती घेतली होती. टॉमस कुक कंपनीला प्रवासाचा सारा खर्च देऊन कूपन-बुक घेऊन ठेवण्याइतकी सोय यांत होती.

प्रत्येक हिंदवासियानें आयुष्यांत एकदां तरी वाराणसीचें दर्शन घ्यावेंच.

# गयेचें श्राद्ध

१२

दुनियेंत प्रत्येक वस्तूला मरण आहे. फक्त एक मरत नाहीं तो भूतकाल. भूतकाल चिरंजीवी आहे. महासागराला ओहटी लागते, चंद्राचा क्षय होतो, कुबेर निर्धन बनतो, पर्वत धुऊन जातात, साम्राज्यें स्मृतिपटावरूनहि पुसलीं जातात; पण भूतकालाला क्षय नाहीं. भूतकाल दिवसेंदिवस समृद्धच होत जातो. पण तुम्ही त्याला राखून ठेवूं शकणार नाहीं. कारण तुम्ही वर्तमानकाळांत आहां. भूतकाळाचा वृक्ष तुमच्या अंगणांत लावावयाचा असेल, तर तुमच्या-जवळ अमाप स्मृतिजळ असलें पाहिजे.

प्रत्येक मनुष्याची इच्छा असते, कीं माझीं मुलें सुद्धां भूतकाळांत असावींत. आपल्या संततिद्वारां मनुष्याला भविष्यकाळांत पाय पसरतां येतात; पण भूत-काळांत प्रवेश करण्यासाठीं भुताप्रमाणें उलटे पाय असले पाहिजेत. तरी पण माणसानें एक युक्ति शोधून काढली आहे. दरवर्षीं एक वेळ मनुष्य भूतकाळांत वास करीत असलेल्या आपल्या पिता, पितामह, प्रपितामह यांचें स्मरण करून श्रद्धांजलि अर्पण करतो आणि भूतकाळावरहि आपला वारसा-हक्क शाबीत करतो.

तसा तर भूतकाळ सर्वत्र आहेच; पण जसा विष्णु सर्वव्यापी असूनहि वैकुंठांत रहातो, तसा भूतकाळ गयेंत रहातो. आज इतक्या वर्षांनीं गयेंत मी फिरून प्रवेश करीत आहें, तोहि भूतकाळांत थोडासा प्रवेश करण्यासाठींच. प्रत्येक हिंदु गयेंत जाऊन आपल्या पूर्वजांचें श्राद्ध करीत असतो. आज गयेचेंच श्राद्ध करावें, असें माझ्या मनांत आलें आहे.

आम्ही रात्रीं गयेला पोंचलों. पूर्वीं एक वेळ तेथें गेलों असल्यामुळें या खेपेला कसलीहि अडचण पडण्याजोगी नव्हती. गया हें तीर्थस्थळ असल्यामुळें हजारों-लाखों माणसें एकदम आलीं तरी तेथें अडचण होत नाहीं. प्रत्येक घरांत किती माणसें राहूं शकतील, याची नोंद म्युनिसिपालिटीकडून करण्यांत आली आहे. आपल्या लोकांना फारशा सुखसोईची आवश्यकता नसते, तेव्हां दक्षिणेसंबंधीं जर कांहीं तक्रार नसेल, तर यात्रा सुखानें होऊं शकते. तुम्ही स्टेशनवर उतरलांत कीं लागलेच गयावळांचे आडती तुमच्यापुढें येऊन उभे रहातात; आणि तुम्ही कुठले, कुठून आलां वगैरे प्रश्न हिंदुस्थानच्यां एकूण एक भाषांतून विचारतात. तुम्ही ज्या भाषेंत उत्तर द्याल, त्या भाषेंत संभाषण सुरू होतं. हे आडती ( दलाल ) कोणत्याहि विद्यापीठांचे स्नातक न होतां सुद्धां हिंदुस्थानच्या साऱ्या भाषा जाणतात, आणि व्याकरणाची हरकत बाजूला ठेवलीत, तर त्या भाषांत अस्खलित बोलतात सुद्धां.

आमच्या वांट्याला कोण पंड्या आला होता, त्याची मला आठवण नाहीं, आणि मला वाटतें त्याचें दर्शनहि झालें नाहीं. त्याच्या मुनीमाचा मुनीम मला स्टेशनवर भेटला व तेथून एका मुक्कामाच्या ठिकाणीं घेऊन गेला. त्याच्या वाचाळतेला बळी पडावें लागूं नये म्हणून मीं प्रथमच जरा करडेपणानें त्याला सांगितलें, हें पहा बुवा, मी एक वेळ येथें येऊन गेलों आहें. यात्रेचे सर्व पैसे मीं अनंतभटांना बनारस येथेंच दिले आहेत. त्यांच्याकडून तुम्हांला मिळतील. आतां मला या या सवलती पाहिजेत, त्यांचे पैसे हे घ्या. मला उद्यां श्राद्ध करायचें आहे, पण तें कर्णाटकच्या नृसिंहाचार्यांमार्फतच करायचें आहे. त्यांना उद्यां सकाळीं आठ वाजण्यापूर्वीं इकडे पाठवून द्या. दुपारीं श्राद्ध संपल्यानंतर तुमचा चोपडा घेऊन या. त्यावर सही करून देईन. आतां अधिक बोलण्याची जरूरी नाहीं. जा, सांगितलेलें काम करा आणि आतां आराम घेऊं द्या. " माझा हा रुबाब बघून तो बिचारा चकितच झाला. असा अवतार जर मीं धारण केला नसता, तर या माणसानें आपल्या आशाळभूत गोष्टींत नाहीं म्हटलें तरी माझा अर्धा तास खाल्ला असता.

दुसऱ्या दिवशीं फल्गु नदीच्या कांठीं श्राद्ध करण्यासाठीं गेलों. फल्गु नदी जमिनींत आहे. तिला सीतेचा शाप आहे. वाळूंत खोदावें तेव्हां पाणी मिळायचें. नदींत नेहमीं यात्रेकरूंची गर्दी असते आणि या गर्दीमधून पुष्ट

आणि रूपवान् गयावळ पोळाप्रमाणें दक्षिणेच्या आशेनें फिरत असलेले दिसतात. मीं गर्दींत स्नान केलें. शेणकुटें आणून त्यावर चरु तयार केला. नृसिंहाचार्य आले. त्यांना सर्व मंत्र माहीत होते. उच्चारहि चांगले होते. म्हणूनच मीं त्यांना पत्करलें होतें.

नदीच्या पात्रांत बसून करण्याची क्रिया पुरी करून आणि पिंड घेऊन मी गदाधराच्या देवळांत गेलों. तेथें शेंकडा यात्रेकरू ठिकठिकाणीं रांगेनें बसले होते आणि श्राद्धाची कवायत करीत होते. श्राद्धासारख्या अत्यंत पवित्र भावनामय धार्मिक क्रियेला इतकें यांत्रिक स्वरूप दिलेलें पाहून मला फार वाईट वाटलें. पावलोपावलीं दक्षिणेसाठीं झगडून गरीब अडाणी यात्रेकरूंनीं मागितलेली दक्षिणा दिली नाहीं, तर त्याच्या मेलेल्या आतेष्टांना शिव्या देणाऱ्या गयावळांना पाहून हिंदु धर्माबद्दल कुणाला निराशा वाटली, तर त्याला फारसा दोष देता येणार नाहीं. पिंड अर्पण करण्यासाठीं आम्ही धर्मशीलेवर जाऊन बसलों. धर्मशीलेवर श्रीविष्णूचें पाऊल आहे. या विष्णुपदावर लोक पिंड ठेवीत जातात आणि गायी येऊन ते खाऊन टाकतात. असा क्रम सतत चालत असतो. पिंडदान-क्रिया पुरी झाल्यानंतर गयापुत्रांकडून यात्रेचें सुफळ मिळवायचें असतें. या वेळीं गयापुत्रांना मनाला येईल ती दक्षिणा काढतां येते. त्याच्यापुढें हात जोडून आपण उभे राहिलों, म्हणजे तो फुलांची माळ घेऊन आपले हात बांधून टाकतो; आणि तृप्ति होईल इतकी दक्षिणा मिळेपर्यंत ते सोडीत नाहीं. खिसा भरला कीं मग तो माळ तोडून टाकतो, पाठीवर थाप मारून यात्रा सफळ झाली असें जाहीर करतो आणि सारे पूर्वज थेट स्वर्गाला पोंचल्याची खात्री देतो.

मीं सर्व दक्षिणा बनारसलाच चुकती केल्यामुळें येथें सुद्धां मी वांचलों. आमच्या मुनीमानें एका गयापुत्राला आमच्यापुढें आणून उभें केलें. तो वीसएक वर्षांचा असेल. तो रेशमी सोवळें नेसला होता. वर रेशमी सदरा आणि जाकीट होतें. केस इंग्लिश फॅशनचे राखलेले आणि पोमेडनें चांगले चकचकीत केलेले होते. माझी सर्व श्रद्धा महा मेहनतीनें एकत्र करून मीं त्याच्यापुढें हात जोडले आणि माळेनें बांधूं दिले. गयापुत्र रुसण्याच्या तयारींत होता, इतक्यांत मुनीमानें त्याला सांगितलें, ‘ दक्षिणेचे पैसे जमा झाले आहेत. ’ गयापुत्रानें माळ तोडली आणि तो चालता झाला. तो गयापुत्र मला विसरला असेल; पण मी त्याला विसरलेलों नाहीं.

आमचे उपाध्याय महाराज म्हणाले कीं, "गयेला येऊन श्राद्ध करणें हें माणसाचें गृहस्थजीवनांतील शेवटचें कर्तव्य आहे. तें पुरें झालें; तेव्हां तुम्ही आतां काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूंचा त्याग केला पाहिजे; पण या कलियुगांत तसें होऊं शकत नाहीं, म्हणून त्याऐवजीं तुम्ही कोणत्या तरी एका वस्तूचा त्याग करावा." मी विचारलें, "साखरेचा त्याग केला तर?" आसपास उभे असलेले दहापंधराजण हें ऐकून थक्क झाले. ते म्हणाले, "साखर कशी काय बुवा सोडतां येणार?" मीं म्हणालों, "आज पांच वर्षें झालीं, मी साखर खात नाहीं." भटजी महाराजांनीं सुचविलें, "कारलीं किंवा भोपळा असें कांहीं सोडा." मीं म्हटलें, "धर्माशीं अशी प्रतारणा मी नाहीं करणार. मी षड्रिपूंपैकीं क्रोधाचाच त्याग करण्याचा प्रयत्न करीन." आणि मनांत म्हटलें, – 'आणि अंधश्रद्धेचाहि!'

गदाधराचें देऊळ सुंदर आहे. नदीच्या पात्रापासून तें पुष्कळ उंचीवर असल्यामुळें त्याची शोभा खूप वाढली आहे. दुपारीं आम्ही नृसिंहाचार्यांकडे भोजन केलें, गयामाहात्म्य श्रवण केलें, आणि लागलीच बोधिगयेला जाण्याचें ठरविलें.

# बुद्धगया

१३

'ह्या आसनावर बसून बसून माझें शरीर सुकून गेलें तरी चालेल, माझ्या कातडीची व हाडांमांसाची माती झाली तरी बेहत्तर; पण अनेक कल्पांमध्येंहि मिळण्यास कठीण असें तें मोक्षदायी ज्ञान जोंवर मला मिळणार नाहीं, तोंपर्यंत या आसनावरून हा देह चळणार नाहीं' – अशी भीषण प्रतिज्ञा करून शाक्यमुनि सिद्धार्थ एका पिंपळाच्या झाडाखालीं बसले. देव, यक्ष व गंधर्व या अलौकिक लोकनायकाला पहाण्यासाठीं आकाशांत गोळा झाले. 'मार' – मनुष्य जातीचा शत्रु मार – स्वतःचें कर्तव्य समजून ही प्रतिज्ञा मोडवण्यासाठीं कटिबद्ध झाला. घनघोर युद्ध झालें. मारानें भीति, माया आणि प्रलोभन सगळें दाखवून पाहिलें. परंतु सिद्धार्थाच्या दृढनिश्चयापुढें त्याचें कांहींच चाललें नाहीं. सिद्धार्थ 'मार-जित' बनला, कृतार्थ झाला. तो बोधीचा आनंद इतका कांहीं उत्कट होता कीं, कित्येक दिवस बुद्ध भगवानांना या समाधींतून उतरण्याची इच्छाच झाली नाहीं.

परंतु शाक्यमुनीचा गृहत्याग केवळ बोधीचा आनंद प्राप्त करण्यापुरताच नव्हता. जगाचें दुःख निवारण करण्याच्या विराट् संकल्पानें ज्यानें तपश्चर्या आरंभिली त्याला असें स्वसुख-समाधींत बसून रहाणें कसें परवडणार? समाधीच्या अंतीं एक आवाज अंतःकरणांतून उठला – 'या दुःखी जनांच्या वेदनांचें काय?' लगेच शंका उत्पन्न झाली, 'वेदनांवर औषध तर सांपडलें, पण तें घेणार कोण? माझी साधना जगावेगळी आहे. ती कोण ग्रहण करणार? वळचणीचें पाणी आढ्यावर कसें चढणार?'

'हाय ! तर मग ही अलौकिक तपश्चर्या, हें दिव्य ज्ञान व्यर्थच जाणार का ?' आकाशांत देवांचीं विमानें थरथर कांपूं लागलीं. सृष्टि स्तंभित झाली. साधुसंतांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु वाहूं लागले. या क्षणीं जर लोकांचा उद्धार झाला नाहीं, तर मग पुढें तो केव्हां होणार ? घोर निराशेचें साम्राज्य पसरलें. इतक्यांत चतुर्मुख ब्रह्मदेव तेथें अवतरले. त्यांच्या चारहि मुखांचीं निरनिराळीं नांवें आहेत – मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा. या चार मुखांनीं सिद्धार्थाच्या हृदयांत ब्रह्मदेव बोलले : "गौतमा उठ. तूं बुद्ध झाला आहेस. तथागत आहेस. तूं मार-जित झाला आहेस, आतां लोक-जित हो. सारें जग तुझी वाट पहात आहे. तूं शोधून काढलेला मार्ग जरी अपूर्व असला, प्रतीप असला, तरी तो व्यर्थ जाणार नाहींच. कांहीं लोक असे आहेत कीं, जे तुझा मार्ग स्वीकारतील, तुझी शिकवण जगभर पसरवतील. त्यांच्यावर श्रद्धा ठेव आणि आपल्या हृदयांतील गंभीर करुणा कृतार्थ होऊं दे."

तथागत उठले आणि धर्मचक्र चालविण्यासाठीं या भूमीवर विचरूं लागले. जेथें जेथें त्यांचें पाऊल पडलें तेथें तेथें अवैर, अहिंसा, प्रेम, करुणा यांचीं कमळें उमलूं लागलीं आणि त्यांच्या विहाराची विहारभूमि त्यांच्या मंगल उपदेशानें सुगंधित झाली.

सनातन इतिहासालाहि सानंदाश्चर्यांत बुडवून टाकणारी ही घटना घडून आज अडीच हजार वर्षें होऊन गेलीं. पण धर्मचक्र चालूच आहे. ज्याच्या हृदयांत या महाउपदेशाचा पडसाद उमटतो तो दुःखमुक्त होतो आणि पुन्हां एकदां 'मारा'ला पराभूत व्हावें लागतें.

* * *

'भारतवर्षाच्या मोक्षाचा रस्ता मला सांपडला आहे. तो सरळ आहे, धर्म्य आहे, सर्वोदयकारी आहे.' असा उपदेश करीत करीत वायुवेगानें ज्या महात्म्यानें भारतवर्षांत भ्रमण केलें त्याचा उपदेश भारतवर्षाला मान्य आहे किंवा नाहीं हें ठरविण्यासाठीं आम्ही यंदां या प्राचीन बोधिभूमीवर जमलों होतों. कॉंग्रेसची स्वराज्यपुरी 'अक्षयवट' व 'बोधिगया' यांच्या मधोमधच विराजली होती. पुष्कळ लोक गाड्यांतून किंवा चालत बोधिगयेला जात होते. कोणी फल्गु नदीच्या रेताड आणि विशाल पात्राच्या सौंदर्याची वाखाणणी करीत होते. कोणी गगनविहारी तालवृक्षांच्या मर्मरध्वनीचें काव्य ऐकत होते.

कोणी सस्यशामला अन्नपूर्णेच्या समृद्धीचा विचार करीत होते. तर कोणी दूर-दूरचे डोंगर पहारेकऱ्याप्रमाणें ललकारून आपापसांत काय बोलत आहेत हें ऐकण्याचा प्रयत्न करीत होते. हिमालय आणि विंध्याचल यांच्यामध्यें पसरलेल्या विशाल मैदानांत घडलेल्या अनेक ऐतिहासिक घटनांचे हे डोंगर साक्षी बनले असतील. गयासुराचा प्राणसंन्यास आणि शाक्यमुनीचा गृहसंन्यास तर त्यांनीं कालच पाहिलेला आहे. महावीराचें पहिलें वहिलें स्वागत त्यांनीं येथेंच केलें होतें. चीन आणि मध्य आशियांतील मुनींना त्यांनीं उभ्या उभ्या मार्ग दाखविला होता. ते आज काय म्हणत असतील ? स्वराज्यपुरीची तुलना ते जनकाच्या ज्ञानसत्राशीं करीत असतील कीं, 'आहे एक आठ दिवसांची गंधर्वनगरी झालं' म्हणून तुच्छता दर्शवीत असतील ? ज्यांनीं याज्ञवल्क्य आणि जनक यांच्यांतला संवाद ऐकला आहे, त्यांनाच सत्यमूर्ति व श्रीनिवास अय्यंगार, रंगा अय्यर व श्यामलाल नेहरू, शिवप्रसाद गुप्त व सुंदरलाल यांचीं व्याख्यानें आठ आठ दिवस ऐकावीं लागलीं आहेत ! !

कित्येक बिहारच्या भूमीची सुपीकता आणि लोकांचें दारिद्र्य यांतील विरोध पाहून आश्चर्यचकित होत व म्हणत, "अन्नपूर्णेचीं लेकरें जेथें उपाशी मरतात आणि नेहमीं दीनवाणी होऊन बोलतात, तेथें केवढा घोर अन्याय चालत असला पाहिजे !"

गया स्टेशनपासून बोधिगया सुमारें सहा-सात मैल आहे. रस्ता फल्गु नदीच्या कांठाकांठानें जातो. बौद्धकाळांत या नदीला नेरंजरा म्हणत आणि या प्रदेशाचें नांव होतें उरुवेल. सहा-सात मैलांचा रस्ता कापून झाल्यावर मोठ-मोठ्या वृक्षांची दाटी दिसून येते. आणि डाव्या हाताला किल्ला किंवा गढी-सारख्या इमारतीची भिंत दिसून येते. या इमारतींत बुद्धगयेचा महंत आपल्या शिष्यांसमवेत रहात असतो. तो बौद्धधर्मी नाहीं, तरीहि बुद्धगयेच्या मंदिराची मालकी भोगतो. मंदिराच्या मालकीचें बरेंच जडजवाहिर त्याच्यापाशीं आहे असें म्हणतात. ब्रह्मदेशच्या राजानें तें मंदिराला अर्पण केलें होतें. या मंदिराच्या मालकीबाबत कित्येक वर्षांपूर्वी तंटा उत्पन्न झाला होता, तेव्हां कोर्टानें मंदिरावर महंताची मालकी ठरवली होती. कलकत्त्याच्या महाबोधि सोसायटीनें या मंदिराचा कब्जा मिळविण्याबाबत कॉंग्रेसकडे इन्साफ मागितला आहे.

महंताची गढी मागें टाकून उजवीकडे चढलें म्हणजे समोरच एक खोल आणि रुंद खड्डा दृष्टीस पडतो. आणि त्यांतच बुद्धगयेचें इतिहास-मंदिर आहे. या मंदिराचा खालचा आणि आसपासचा भाग मातींत दबला गेला होता, तो सरकारी पुरातत्त्व खात्यानें सुमारें चाळीस वर्षांपूर्वी खणून काढून साफसूफ केला आहे. मंदिर खूप उंच आणि भव्य आहे. मंदिराच्या आसपासचा कठडा दगडी होता. आज त्याचा फारच थोडा भाग शिल्लक राहिलेला आहे. परंतु जो शिल्लक आहे त्याच्यावरील सुंदर कारागिरी आणि भावपूर्ण चित्रें पाहून मूळच्या सौंदर्याची चुणूक मिळते. मंदिराच्या भव्यतेच्या मानानें खुद्द मंदिराची कारागिरी तितकीशी आकर्षक नाहीं. भारतवर्षातील स्थापत्यकलेचा पहिला बहर ओसरल्यावर हें मंदिर बांधलें गेलें असावें असें वाटतें. तें पांचव्या शतकांत बांधलें असावें असें पाश्चात्य संशोधकांचें मत आहे. तें बांधविणारा महापुरुष अमरसिंह होय. अमरकोषाचा रचयिता अमरसिंह तो हाच अमरसिंह जर असेल आणि हाच अमरसिंह जर भोजराजाच्या दरबारांतील एक रत्न असेल तर त्यावरून या मंदिराचा काळ सहज निश्चित होण्यासारखा आहे.

मंदिराच्या बांधणींत कोरीव कामाचे बारकावे दर्शविण्यांत आले नसले, तरी हें मंदिर इतकें प्रमाणशुद्ध आहे कीं, तें एखाद्या समर्थ स्थपतीनेंच कल्पिलें असावें असें वाटतें. त्यागी, संयमी आणि विरागी बुद्ध भगवानांच्या मंदिरांत लक्ष्मीपति विष्णूची चारुता शोभणार नाहीं या विचारानेंच या मंदिरांत कलेचा इतका संयम बाळगण्यांत आला असावा.

मंदिरांत प्रवेश करतांच बोधिगुरु बुद्ध भगवानांची विशाल मूर्ति दृष्टीस पडते. तिच्या मुद्रेवरील मुदिता आणि दृढता आपलें लक्ष वेधून घेतात. पुजारी मूर्तीच्या गळ्यांत वस्त्र किंवा पडदा बांधतात, नाहीं तर मूर्तीचें सगळें स्वरूप मनावर पूर्ण प्रभाव पाडल्याशिवाय रहाणार नाहीं. बाजूचे जिने चढून गेलें म्हणजे दोन्ही बाजूला उभ्या असलेल्या दोन बोधिसत्वांचें दर्शन घडतें. येथून गोपुराच्या आसपास फिरल्यानें मंदिराच्या प्रांगणाची शोभा पहावयास मिळते. मंदिराच्या मागच्या बाजूला एक पिंपळाचें झाड आहे. आणि त्याच्याखालीं एक मोठी शिला आहे. या झाडाखालीं आणि या शिलेवर बसून भगवान् बुद्धांनीं आपली तपश्चर्या पुरी केली होती असें मानतात. हें झाड फार जुनें नाहीं. दहा वर्षांपूर्वी मी येथें आलों होतों, तेव्हां तें फारच लहान होतें. मूळ

झाड नाश पावल्याचें इतिहास सांगतो. या मूळ बोधिवृक्षाची एक फांदी लंकेंत नण्यांत आली होती. ती अनुराधापूर येथें अद्याप जिवंत आहे. तेथील बौद्ध लोक त्याची पूजा करतात. मंदिराची प्रदक्षिणा पुरी करतांना मंदिराच्या डाव्या बाजूला एक लांबलचक ओटा दिसतो. त्याच्यावर उठावदार कमळें बनवलेलीं आहेत. दयामय प्रभूचे पवित्र चरण जिथें जिथें पडत, तिथें तिथें कमळें उगवत, ही पौराणिक मान्यता अशा प्रकारें व्यक्त करण्यांत आलेली आहे. बुद्ध भगवान् अंतर्मुख वृत्तीनें या ठिकाणीं येरझाऱ्या घालीत असत, ज्याला बौद्ध परिभाषेत 'चंक्रमण' म्हणतात. आसपासच्या बगीच्यांत पाषाणांतून कोरलेले सुंदर स्तूप व मूर्ति आहेत. अनेक भक्तांकडून भेट म्हणून या येथें स्थापन करण्यांत आल्या असाव्यात.

* * *

बिचाऱ्या बोधिवृक्षानें जगाचें काय नुकसान केलें होतें ? ना त्यानें कुणाला विष पाजलें होतें कीं ना कुणाच्या हत्येचा तो साक्षी बनला होता. रंजल्या-गांजल्यांचें दुःख निवारण करण्यासाठीं आपल्या शरीराला सर्व प्रकारें कष्टविणाऱ्या गौतमबुद्धावर त्यानें आपल्या तरल पर्णांची छाया केली, वारा घातला, तरीहि धर्मवेड्या अशोकाच्या – होय, अशोकाच्या क्रोधाला तो बळी पडला होता. बौद्धधर्माची दीक्षा घेण्याआधीं अशोकाची त्या धर्मावर करडी नजर होती. हृदयपरिवर्तन झाल्यावर त्याच अशोकानें त्या जागेवर दुसऱ्या वृक्षाचें बीजारोपण केलें. ख्रिस्ती धर्माचा नायनाट करावयास निघालेल्या संत पॉलनें ज्याप्रमाणें आपलें सारें जीवित अखेर ख्रिस्ती धर्माच्या प्रचारार्थ वेंचलें, तसेंच त्याच्यापूर्वी अशोकाचेंहि झालें. इतिहास सांगतो कीं, अशोकानंतर आणखी दोन वेळां हिंदु राजांचे क्रूर प्रहार या बोधिद्रुमाला सहन करावे लागले. बुद्धगयेंतील बोधिद्रुम अनेकदां कापला गेला; परंतु त्याची जी एक डहाळी भारतीय जहाजांतून प्राचीन काळीं लंकेला गेली ती अजूनहि तेथें अनुराधापुरांत पुन्हा जोमानें पसरलेली आढळून येते.

मंदिराला उजवीकडे टाकून सरळ पुढें गेल्यास तलावाचा एक घाट दिसतो. तलाव फार मोठा नाहीं, पण घाट व्यवस्थित आहे. किती तरी बौद्ध भिक्षूंनीं आणि श्रमणांनीं या तलावाच्या कांठावर बसून जलमंडलाचें ध्यान धरलें असेल !

* * *

इतिहासापासून शहाणपण शिकून आपण प्राचीन कारागिरी आणि मान्यतांचा शोध करण्यासाठीं हिंडत असतों आणि प्रत्येक वस्तूचा काळ व शिल्पपद्धति निश्चित करण्यांत पुरुषार्थ मानतों. परंतु हीं मंदिरें म्हणजे कांहीं एखाद्या शरीरशास्त्रज्ञाच्या टेबलावर पडलेले कुणातरी अज्ञात, ख्यातिविहीन जातीचे प्राचीन सांगाडे नव्हत. आपल्याच पूर्वजांच्या हृदयाचें व उत्साहाचें तें स्मारक आहे. आपल्यामध्यें प्राचीन पण सचेतन असा प्राण फुंकणारा हा आपला पवित्र वारसा आहे. कितीहि खंडित झालेलीं, पडलीं झडलेलीं तरी हीं मंदिरें आपल्याला निष्प्राण, निरग्नि राखेसारखीं वाटूं नयेत. भारतवर्षासाठीं या मंदिरांत अमृत-संजीवनी भरलेली आहे. आपण श्रद्धापूर्वक त्यांचें दर्शन करावें, त्यांचा आशीर्वाद घ्यावा आणि हिंमत असल्यास बुद्ध भगवानाप्रमाणें त्याग करून त्या त्यागाला शोभेल असें आर्यजीवन कंठावें. शाक्यसिंहाची कीर्ति अमरसिंहानें जी अमर केली, ती केवळ आपण कौतुक करावें म्हणून नव्हे तर आपल्या जागृतीसाठीं, आपल्या कल्याणासाठीं केली आहे.

# निर्वाणधाम कुशीनारा

१४

स्वतः बुद्ध भगवानांनीं म्हटलें असेल किंवा त्यांच्या एखाद्या शिष्यानें त्यांच्या तोंडीं घातलें असेल, परंतु त्रिपिटक ग्रंथांत आहे कीं, तथागत जेथें जन्मले, ज्या ठिकाणीं त्यांना बोधिज्ञान प्राप्त झालें, ज्या स्थळीं त्यांनीं आपल्या साथीदारांना पहिला-वहिला उपदेश करून धर्मचक्र सुरू केलें, आणि जेथें तथागतांचें परिनिर्वाण झालें तीं स्थानें बुद्ध भगवानाच्या दृष्टीनें अत्यंत पवित्र समजलीं जातील आणि देशदेशांतरांतील लोक या स्थानांच्या यात्रेला येतील.

बुद्ध भगवानांना जेथें 'बोधि' प्राप्त झाली तें स्थान – म्हणजे बुद्धगया मी सगळ्यांत आधीं पाहूं शकलों होतों. वैराग्याच्या धुंदींत घर सोडल्यावर हिमालयाला जातांना मधें जी त्रिस्थळीची यात्रा केली होती, त्या वेळीं बुद्धगयेला गेलों होतों. बोधिवृक्षाखालीं किंवा त्याच्या एखाद्या उत्तराधिकारी रोपट्याखालीं उत्कट भक्तिभावानें जेव्हां साष्टांग प्रणिपात केला तेव्हां दैवी वाणी ऐकूं आली कीं, 'त्याग करणें त्या मानानें सोपें आहे. परंतु त्या त्यागाला साजेसें जीवन व्यतीत करणें कठीण आहे.'

जेथें बुद्ध भगवानांनीं आपणाविषयीं अश्रद्धा बाळगणाऱ्या चार साथीदारांना उपदेश केला होता, तेथें जो मी गेलों तो या दीक्षावचनानें प्रभावित होऊनच. सारनाथ हें या ठिकाणचें अर्वाचीन नांव आहे. पूर्वीं त्याला मृगदाव किंवा ऋषिपत्तन म्हणत असत. हें ठिकाण बनारसहून फारसें दूर नाहीं. सम्राट अशोकानें अत्यंत सुंदर असा एक शिलास्तंभ तेथें उभारला

होता.* आज याच ठिकाणीं स्वर्गस्थ अनगारिक धर्मपालसारख्यांच्या पुरुषार्थामुळें मूलगंध कुटिविहार स्थापन झालेला आहे. आणि या विहारांत बुद्ध भगवानांच्या अस्थींचे अवशेष ठेवण्यांत आले आहेत.

ऐशीं वर्षें अखंड सेवाकार्य करून अखेर बुद्ध भगवानांनीं जेथें आपला देह ठेवला आणि जगांतील साऱ्या जीवांच्या अखंड कल्याणाची कामनाच आपल्या मागें उरूं दिली तें स्थान कधींपासून बोलावीत होतें. बुद्धशिष्य दिव्य-चक्षू अनिरुद्धाशीं मला त्या ठिकाणीं सत्संग करावयाचा होता.

तथागतांच्या परिनिर्वाणाचें स्थान म्हणजे कुशीनारा होय. तें गोरख-पुरच्या पूर्वेस तीस-पस्तीस मैलांवर आहे.

उत्तर प्रदेशांत गंगामातेच्या समृद्धीमुळें मोठमोठालीं शहरें पुष्कळ आहेत. त्यांतहि गोरखपूरचें आकर्षण विशेष आहे. रामगड नांवाच्या एका विशाल तलावाच्या कांठीं वसलेलें हें शहर कुणाहि सम्राटाची राजधानी म्हणून शोभण्यासारखें आहे. गोरखपुरहून कुशीनाराचा रस्ता बालकाच्या हृदयाप्रमाणें सरळ आणि यौवनाच्या उल्लासासारखा उज्ज्वल आहे. भाताच्या शेतांचा समुद्र चहूंबाजूंस पसरला आहे आणि मधें मधें वृद्ध आंबरायांचीं बेटें दुरूनच एकमेकांशीं गोष्टी करीत आहेत. एक एक आंबराई म्हणजे जणुं एक एक धर्मपरिषदच! एके ठिकाणीं शें-दोनशें कुमार आम्रवृक्षांमध्यें आचार्याप्रमाणें एक वृद्ध वृक्ष होता. हे लोक बौद्ध धर्माची चर्चा करीत असतील का? कीं हिंदु धर्मांत बौद्ध धर्माचें स्थान काय आहे याचा निर्णय करीत असतील?

कुशीनारांत पहाण्यासारखीं तीन-चार स्थानें आहेत. नवीन स्थानांत श्री. जुगलकिशोर बिर्ला यांनीं नुकतीच बांधलेली भव्य धर्मशाला आणि चंद्रमणि नांवाच्या अराकानच्या साधूनें बांधलेला स्वतःचा मठ हीं बघण्यासारखीं आहेत.

चंद्रमणि साधु हिंदी बरी बोलूं शकतो. बौद्धसाहित्य त्यानें भक्ताच्या निष्ठेनें वाचलें आहे. आणि जेव्हां कानाला विचित्र लागणाऱ्या आपल्या हिंदींत तो बुद्धजीवनांतील प्रसंग वर्णूं लागतो तेव्हां जणुं काय एखादा बुद्धकालीन

*शाक्यसिंहाच्या प्रथम उपदेशाच्या स्मरणार्थ जो शिलास्तंभ येथें उभारण्यांत आला त्या स्तंभावरील सिंह आज स्वतंत्र भारताचे राजचिन्ह बनले आहेत.

भोळा साधूच पुन्हां जन्म धारण करून स्वतः पाहिलेल्या गोष्टी सांगत असावा अशा रसवत्तेनें व शैलीनें तो आपल्याला भारावून टाकतो.

त्याच्या मठांत जी बुद्धाची मूर्ति आहे तिचाहि एक मनोरंजक इतिहास आहे. एका स्कॉटिश अंमलदारानें हिंदुस्थानांतील कारागिरीचा नमुना म्हणून ती मूर्ति विलायतेला नेली होती. त्याच्या मुलाच्या मुलाला वाटलें कीं, असली ही पूजेची मूर्ति आपल्या घरीं केवळ एक शोभेची वस्तु म्हणून आपण ठेवावी हें बरें नाहीं. त्यानें विवेकपूर्वक ती मूर्ति हिंदुस्थानांत परत पाठवून दिली आणि आतां ती कुशीनारा येथें देशदेशान्तरींच्या बौद्ध यात्रेकरूंना कल्याणधर्माचे आशीर्वाद देत असते. हिंदुस्थानांतून परदेशांत गेलेल्या अप्रतिम वस्तु जर अशा रीतीनें परत स्वदेशांत येऊं लागल्या, तर इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या-मध्यें आध्यात्मिक बंधुत्व सहज स्थापन होऊं शकेल. ती मूर्ति परत करणाऱ्या बंधुभगिनींचें पत्र जेव्हां मीं वाचलें, तेव्हां इंग्लंडविषयीं वाढत जाणारी माझ्या मनांतील निराशा कांहींशी कमी झाली खरी.

कुशीनारा येथील प्राचीन वस्तूंत एक जुनी सुंदर मूर्ति आहे. तिला स्थानिक लोक माथाकुंवरची मूर्ति म्हणतात. माथाकुंवरचा कांहीं अर्थ लागत नसल्यामुळें आणि हें ठिकाण बुद्ध भगवानाच्या निर्वाणासाठीं प्रसिद्ध असल्या-मुळें कोणी तरी अर्थ लावला – माथाकुंवर म्हणजे मृतकुमार !

अशी ओढूनताणून लावलेली व्युत्पत्ति गळीं उतरणें कठीण आहे. मीं सुचविलें कीं, माथाकुंवर हा मायाकुंवरचा अपभ्रंश असावा. बुद्ध भगवानाच्या मातेचें नांव मायादेवी होतें हें सर्वांना ठाऊकच आहे.

मूर्तीच्या आसपासच्या प्रभावळीवरून वाटतें कीं, मूर्ति मध्यकालीन असावी. माथाकुंवर नामक एखाद्या बुद्धाच्या चाहत्यानें ही बौद्ध-मूर्ति येथल्या संघाला अर्पण केली असावी. आज तिचा कांहींच इतिहास उपलब्ध नाहीं.

कुशीनारांत विशेष अशा दोनच गोष्टी आहेत. ज्या ठिकाणीं बुद्ध भग-वानांनीं देह ठेवला, त्या ठिकाणीं प्राचीन काळीं एक स्तूप होता. तो भग्न झाला होता. ब्रह्मदेशांतील एका दानशूर गृहस्थानें हा स्तूप नव्यानें बनवून सोन्याच्या वर्खानें त्याला मढवलें आहे. आज तो स्तूप सूर्याच्या किरणांत जेव्हां चमकूं लागतो, तेव्हां बौद्ध पुनरुद्धाराविषयीं अनेक आशा निर्माण होतात.

ह्या स्तूपासमोर बुद्ध भगवानांची सिंहशय्येंत पहुडलेली एक विशाल मूर्ति आहे. ती मूर्तीहि फुटून तिचे अनेक तुकडे झाले होते. मथुरेच्या लाल दगडांची ती बनवलेली असल्यामुळें तिचे विखुरलेले तुकडे सहज एकत्र करतां आले. एका इंग्रज मूर्तीच्या सर्जनानें ते सगळे खंडित अवशेष एकत्र जोडून टाकले आणि बौद्ध यात्रेकरूंनीं तिच्यावर सोन्याचा वर्ख चढवून तिला पूर्ववत् अखंड बनविलें.

सिंहशय्या हें बुद्ध भगवानांचें झोंपण्याचें आवडतें आसन होतें. उजव्या हाताचें उसें करून कुशीवर झोंपलें आणि उजव्या पायावर डावा पाय व त्याच्यावर डावा हात ठेवला म्हणजे त्याला सिंहशय्या म्हणतात. या शय्येवर झोंपल्यानें अल्पनिद्रा घेऊनहि शरीराला संतोष मिळतो आणि वैद्यकीयदृष्ट्याहि ह्या आसनाचे अनेक उत्तम गुण वर्णिलेले आहेत.

ज्या ओट्यावर मूर्तीला ठेवण्यांत आलें आहे, त्याच्या बाजूवर तीन मूर्ति खोदलेल्या आहेत. त्यांपैकीं एक आहे बुद्धकालीन देशविख्यात वैद्य जीवकाची; मधली आहे त्रिदंडी संन्यासी सुभद्र याची. तो बुद्ध भगवानाच्या अखेरच्या घडीला त्यांच्याकडे शंका-निवृत्तीसाठीं आला होता. पायाच्या बाजूला उदास चिंताक्रांत अशी जी मूर्ति आहे ती बुद्ध भगवानांच्या अंतेवासी आनंदाची आहे. या तिघांविषयीं जाणून घेण्यासारखें पुष्कळ आहे. बौद्धसाहित्यांत या तिघांविषयीं बराच विस्तृत मजकूर आहे.

हा स्तूप आणि ही पहुडलेली मूर्ति पाहून अडीच-तीन हजार वर्षांपूर्वीचें वातावरण एकाएकीं सजीव होतें खरें. पण चित्ताला विषण्ण करून पुनः शांति देणारें स्थान मात्र कुशीनारापासून सुमारें एक मैल दूर असलेला भग्न स्तूपच होय. या ठिकाणीं बुद्धाच्या अनुयायांनीं बुद्धशिष्य अनिरुद्धाच्या सूचनेप्रमाणें तथागतांची काया कापडांत गुंडाळून तेलाच्या डोणींत ठेवली होती, आणि ते कश्यपाच्या आगमनाची प्रतीक्षा करीत बसले होते. एखाद्या चक्रवर्तीला साजेशा थाटामाटांत कलेवराचें दहन केल्यावर अग्नि आणि राख यासाठीं त्या शिष्यांनीं एकमेकांचीं डोकीं फोडलीं नाहींत आणि त्यांनीं तिचे आठ-नऊ भाग केले. सारनाथ येथें अलीकडे जें सोन्याचें पात्र स्थापित केलें आहे त्यांत या भागांतीलच कांहीं अवशेष आहेत असें सिद्ध झालें आहे.

ज्या ठिकाणीं तथागतांच्या शवाला अग्नि देण्यांत आला तेथें एक असाधारण उंच असा स्तूप बांधण्यांत आला होता. त्याचाच भग्नावशेष आज एका

टेकडीच्या रूपांत दिसतो. आणि तिच्या माथ्यावर एक विस्तीर्ण व खूप उंच पिंपळाचा वृक्ष बौद्ध धर्माचें स्मारक म्हणून तेथल्या वाऱ्याशीं खेळत असतो. त्या वृक्षाकडे पाहून कुणालाहि गीतेंत वर्णिलेल्या अश्वत्थवृक्षाचें स्मरण व्हावें. त्याच्या ऊर्ध्व आणि अधःशाखा इतक्या विपुल आहेत आणि त्या एकमेकींत अशा कांहीं गुंतल्या आहेत कीं, त्याला हिंदूंच्या समाजशास्त्राचीच उपमा देतां येईल. या वृक्षाखालीं एक चिनी साधू रहातो. त्याचें नांव सूर्य अथवा असेंच कांहीं तरी आहे. सरकारी पुरातत्त्व खात्यानें त्याला तेथून काढून लावण्याचा बराच प्रयत्न केला, परंतु त्या पिंपळाच्या आश्रयानें रहाणाऱ्या सर्पाप्रमाणें या चिनी साधूला तेथून हटविण्याची कुणाची हिंमत नाहीं. पिंपळाच्या फांद्यांवर ठिकठिकाणीं बैठकी बनवून या साधूनें आपली निवृत्त रसिकता सिद्ध केली आहे आणि तुलसीरामायणाचें अखंड पारायण चालवून बौद्ध आणि हिंदु धर्मांची अभिन्नता तितक्याच उत्तम प्रकारें सिद्ध करून दाखविली आहे.

बुद्ध भगवानांचा उपदेश, त्यांचें जीवन, त्यांची प्रेरणा व तिचा विस्तार हा मानवी इतिहासाच्या सर्वांत महत्त्वाचा व सर्वांत मोठा खंड आहे. त्याचें प्रतीक म्हणून जीं स्थानें आपल्याकडे आज उरलीं आहेत त्यांचें महत्त्व शेंकडों आणि हजारों वर्षें झालीं तरी आपण पुरतें उमजूं शकलेलों नाहीं.

बुद्ध भगवानांचें जन्मस्थान लुंबिनीदेवी मी अद्याप पाहूं शकलों नाहीं. त्यामुळें त्याविषयीं आतांच कांहीं लिहीत नाहीं. बुद्धमातेच्या स्मरणानें जें स्थान पवित्र झालें आहे, त्याचें महत्त्व माझ्या दृष्टीनें उपरोक्त तिन्ही स्थानांहून अधिक आहे.

येशू ख्रिस्ताच्या येरुशलेमसाठीं ख्रिस्ती आणि मुसल्मान दीर्घकालपर्यंत लढले. बुद्ध भगवानाच्या जीवनाशीं संबद्ध हीं चार स्थानें मानवी विग्रहाचें स्थान होण्याऐवजीं तमाम आशियांतील लोकांनाच नव्हे, तर साऱ्या मानवजातीला अखेर प्रेम व विश्वकुटुंबत्वाचा संदेश देणारीं साधनें बनतील असा विश्वास बाळगून त्या कल्याणधामांना आणि त्यांच्यामार्फत व्यक्त होणाऱ्या कल्याणधम्माला कोटिशः प्रणाम.

ग्रंथसंग्रहालय १२८८

# सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

पांच संच

बत्तीस पुस्तकें

मूल्य रु. २०-२४

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केन्द्रांचें
सचित्र भाविक दर्शन

★

१ : पंढरपूर, सज्जनगड, आळंदी, पैठण, जेजुरी, देहू.

२ : त्र्यंबकेश्वर-नाशिक, चिंचवड, कोल्हापूर, वाडी-औदुंबर, तुळजापूर आणि नेवासें.

३ : कवळें व श्रीमंगेश (गोमंतक); भीमाशंकर, परशुराम, शिखरशिंगणापूर-हरेश्वर, गाणगापूर.

४ : विदर्भ परिसर – मुक्तागिरी, रामटेक, अमरावती, कौंडण्यपूर, सालबर्डी, चन्द्रपूर (चांदा), शेगांव, कळंब.

५ : मराठवाडा परिसर – माहूर, वेरुळ-घृष्णेश्वर, आंबें जोगाई, परळी वैजनाथ, औंढ्या नागनाथ, दौलताबाद.

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी, मुंबई २

REFBK-0012988

REFBK-0012988